# अमात्य माधव

हें नाटक


नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्एल्. बी.

संपादक ‘केसरी’ आणि ‘मराठा’


‘आयर्लंडचा इतिहास’ ‘सुभाषित आणि विनोद’ ‘गारीबाल्डीचें चरित्र’

‘तोतयाचें बंड’ ‘चंद्रगुप्त’ ‘कृष्णार्जुनयुद्ध’ ‘श्रीसंतभानुदास’

‘सरोजिनी’ ‘नवरदेवाची जोडगोळी’

या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें


GENERAL LIBRARY
181 BUDHWAR



शंकर नरहर जोशी यांनीं

८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर येथें

ळा’ छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( आवृत्ति पहिली )

सन १९१५

हें पुस्तक १८६७ व १९१४ च्या आक्टाप्रमाणें नों

सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

फ्रान्स देशामध्यें होऊन गेलेला धर्माधिकारी मुत्सद्दी **रिचिलिओ** आणि विजयनगरचा संस्थापक ब्रह्मचारी मुत्सद्दी अमात्य **माधवाचार्य-ऊर्फ विद्यारण्य** यांचें साम्य अनेक दृष्टींनीं मनाला पटण्यासारखें वाटल्या वरून, **लॉर्ड लिटन** याच्या '**रिचिलिओ**' नामक सुप्रसिद्ध नाटकाच्या आधारें प्रस्तुतचें नाटक लिहिलेलें आहे. मूळ इंग्रजी नाटक ज्यांनीं वाचलें असेल त्यांना त्यापैकीं कोणते भाग घेतले आहेत, कोणते वगळले कोणते नवीन घातले आहेत हें कळून येईलच.

याचा प्रथम प्रयोग मुंबई येथें **चित्ताकर्षक नाटक मंडळीकडून** ८ जानेवारी १९१४ रोजीं झाला. पुस्तकांत घालण्याकरितां लागणारे दिल्याबद्दल सदर नाटक कंपनीचा मीं आभारी आहें.

पुणें,
मंगळवार श्रावण शु॥ ७ शके १८३७
तारीख १७ आगष्ट १९१५.

**न० चिं० केळकर.**

' चित्रशा

# नाटकातील पात्रें.

हरदेवराय—विजयनगरचा राजा.

माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य—अमात्य.

वीरविजय—राजघराण्यांतला एक सरदार.

रुद्रदाम—राजाचा आवडता दरबारी.

कृष्णदेवराय—राजाचा शालक.

हनुमान }
शामभट } —माधवाचार्यांचे शिष्य.

भीमासिंग—माधवाचार्यांचा फितुरी शिपाई.

मिलिंदाचार्य—शृंगेरीमठाचा सर्वाधिकारी.

सेनापति—राजाचा सेनापति.

सुभेदार—तुरुंगाचा वरिष्ठ अधिकारी.

दरोगा—" दुय्यम "

याशिवाय शिपाई, गुप्त हेर वगैरे.

राणीः—हरदेवरायाची स्त्री.

हंसेश्वरी—माधवाचार्यांची धर्मकन्या.

मीनाक्षी—राजदरबारची कलावंतीण.

कंचम्मा—मीनाक्षीची वडील बहीण.

# अमात्य माधव

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

**स्थळ:**—विजयनगरच्या बाहेरील चंडिकेचें देवालय.

[हनुमान प्रवेश करितो.]

हनु०:—(गंभीरपणानें) दुर्जनांच्या संगतीनें तोटा होतो असं नेहमीं म्हणतात. (हंसून) पण मला तर या बाबतींत थोडासा उलटच अनुभव आला! अमात्यमाधवाचार्यांच्या आज्ञेवरून दुर्जनांच्या या जोडी-वर पाळत ठेवण्याचें काम माझ्याकडे आल्यामुळं या चंडिकेचं दर्शन मला रोज घडतं. या अधमांच्या संगतीपासून मला हा एक लाभच घडला म्हणायचा. (विचार करून) हे दोघेजण या एकांतवासांत रोज येऊन कांहीं तरी खलबत करतात यांत शंका नाहीं. पण या खलबतांतलं नांवगांव कांहीं कळल्याखेरीज गुरुमहाराजांना बातमी तरी काय सांगू? छे! तें कांहीं उपयोगाचं नाहीं. रोजच्याहून आज अधिक लगट केली पाहिजे. (इकडेतिकडे पाहून) लांब उभा न राहतां देवळाच्या थेट गाभाऱ्यांत जाऊन आज दडून राहतों. म्हणजे या कटवाल्यांच्या अगदीं जवळ राहून काय बोलतात तें चांगलं ऐकायला सांपडेल. ही पहा! ही जोडी देवळाच्या सभामंडपाकडंच निघाली; तर चला आपण अघाडी मारून देवीचाच आश्रय करून बसावं. [हनुमान जातो.]

[कृष्णराय व रुद्रदाम हतांत हात घालून प्रवेश करितात.]

कृष्ण०:—(भिऊन) मित्रा, रुद्रदामा, काय वाटेल तें म्हण. पण हें चंडिकेचं देवालय पाहून मला तर बुवा फारच भीती वाटते.

रुद्र०:—ती काय म्हणून ? आपली मसलत फार गुप्त म्हणून तर हें निवांत स्थळ मी मुद्दाम पसंत केलं.

कृष्ण०:—पण या स्थळाचा निवांतपणा पाहूनच माझ्या मनांत मोठा झंझावात सुटल्यासारखी चलबिचल होते याचं काय कारण !

रुद्र०:—चलबिचल कसली ! खळबळ म्हणा !

कृष्ण०:—खळबळ ! ती कसली !

रुद्र०:—युवराज, अहो विचारतां काय ! आपण योजलेली मसलत यशस्वी झाल्याबरोबर या विजयनगरींत आपण राज्यक्रांतीची जी प्रचंड खळबळ करून सोडणार तिचंच हें पूर्व चिन्ह, दुसरं काय !


कृष्ण०:—पण आपली मसलत म्हणजे बोलून चालून राजद्रोहाची ! म्हणून भीति वाटते.

रुद्र०:—राजद्रोह कसला घेऊन बसलां आहांत ! विजयनगरच्या गादीवर स्वतः तुमचा—म्हणजे तुमच्या वहिणीचा—कांहीं थोडा अधिकार नाहीं. राज्याची गादी हरप्रयत्नानं आपल्या हातीं आणणं हें कुणाहि पुरुषाचं कर्तव्यच आहे. हें पहा, साधला तर हाच पराक्रम ठरेल, आणि न साधला तर मात्र हा द्रोह खरा ! पण आपली ही मसलत साधायची नाहीं असं मुळींच होणार नाहीं. मग द्रोहाची भीति कां ! मग काय झालाना आपला निश्चय ? असेल तर खलिताहि माझ्या खिशांत तयार आहे. आपली सही झाली कीं, आजच्या आज मलिककाफराकडं रवाना करितों.

[ खिशांतून खलिता काढतो. ]

कृष्ण०:—(भिऊन) छे ! छे ! निदान या चंडिकेला साक्ष ठेवून असलं कृत्य करायची माझी छातीच होत नाहीं !

रुद्र०:—(खलिता आपटून) मला तरी इतकं लांब यायची कुठं हौस होती ? पण त्या दुष्ट माधवाचार्यानं, त्या कपटी जोगड्यानं, आपल्या हेरांकडून सगळं नगर कसं अगदीं पोखरून टाकलं आहे. नगरांतल्या



**कृष्ण०:**—(भिऊन) छे! छे! निदान या चंडिकेला साक्ष ठेवून असलं कृत्य करायची माझी छातीच होत नाहीं.

[पृ० २

निर्जीव भिंतींनाहि कान फुटले आहेत कीं काय असं वाटतं. आणि म्हणून तर मी आपल्याला इकडे येण्याची विनंति केली.

कृष्ण०:—(खलिता हातांत घेऊन) छे, छे, मला अमात्याची भीति वाटते. खचित या माधवाचार्याला हजार डोळे असले पाहिजेत. मित्रा रुद्रदामा, खरोखर खुद्द हरदेवराय महाराजापेक्षां मला त्यांच्या अमात्याचीच भीति ज्यास्त वाटते. खाचित अमात्याला हजार डोळे असले पाहिजेत. आणि त्याच्या या डोळ्यांपैकीं एखादा डोळा, इथं दुसरं तिसरं कुणी नाहीं तरी, या राजद्रोही खलित्याकडं पहात असावा अशी मला भीति वाटते.

रुद्र०:—कसले हजार डोळे आणि काय! माशीच्या वाघालाही हजार डोळे असतात म्हणून त्याची कसली भीति बाळगायची!

कृष्ण०:—पण तो माशीचा वाघ माशीवर झडप घालतो तसा हा अमात्य तुला मला नकळत केव्हांच झडप घालील ती कळणारही नाहीं म्हणून म्हणतों नको. मलीक काफराकडं खलिता पाठविण्याचा हा प्रसंग नको.

रुद्र०:—(स्वगत,) यावेळीं जुळेलसं दिसत नाहीं. पण या वेळींचसं काय! हा नंदीबैल शुद्धीवर असेल तोंपर्यंत हें केव्हांच जुळणार नाहीं. या राजश्रीच्या निशेंतच हें काम करून घेतलें पाहिजे. (उघड) बरं नको तर राहिलं. आपल्या इच्छेविरुद्ध मला मुळींच जायचं नाहीं. असो चला. देवीचं दर्शन तरी झालं सहज. तेवढंच आपलं पुण्य पदरांत पडलं!

कृष्ण०:—बरं तर मी पुढं होतों जरा. तूं मागून ये. [जातो]

---

## प्रवेश दुसरा

स्थळ—विजयनगर. राजवाडा

[रुद्रदाम व भीमसिंग प्रवेश करितात.]

रुद्र०:—काय माझ्या शब्दावर तुझा विश्वास नाहीं! तुझ्यासारखे बेइमानी लोक सगळ्या जगाला आपल्यासारखे बेइमानी समजणारच!

(मान हालवून) काय! तुला लेखी हुकूम पाहिजे? (खिशांतून हुकूम काढून भीमसिंगाच्या अंगावर फेकतो) हा लेखी हुकूम घे. हुकुमाचं अक्षर हुकमाची सही, शिक्का, मोर्तब, सगळं नीट पाहून घे. तुझ्या बापाची सरदारकी अमात्य माधवाचार्य तुला देत नव्हता नव्हे का! ठीक आहे. ती तुला दिली अशीं स्पष्ट अक्षरं आहेत त्यांत? कीं आहे कांहीं शंका अजून?

**भीम०**:—(हुकूम पाहून) होय रुद्रदाम, तुम्ही मला अगदीं निरुत्तर केलंत.

**रुद्र०**:—तूं निरुत्तर होणारच! पण तूं कांहीं मोठा पंडित नव्हेस, किंवा मी कांहीं तुझ्याशीं सभेंत एखादा मोठा वाद करित नव्हतों कीं तुला निरुत्तर केल्यानं माझी मोठी कीर्ति होईल. या हुकमानं मला तूं निरुत्तर व्हायला नको आहेस, उलट तुझी जीभ चलाख आणि चवचाल व्हावी हेंच मला पाहिजे. मी सांगेन तीं व सांगेन तशीं अक्षरं तुझ्या जिभेनं उच्चारलीं पाहिजेत.

**भीम०**:—कबूल. ही जीभ आतां या पुढं तुम्हांलाच वाहिली असं समजा.

**रुद्र०**:—नाहीं, मी तसं नुसतं समजून राहणार नाहीं. मीं सांगितल्याबाहेर जर ती या पुढं एक अक्षरहि बोलली तर ती मला वाहिलेली म्हणून छाटून टाकीन. एवढंच नव्हे पण, तुझ्या जिभेचं साहाय्य तुझ्या हातानं केलं पाहिजे. आणि जर का त्याच्याकडून माझ्या मनासारखी वागणूक घडली नाहीं, तर मला वाहिलेला नसला तरी तुझा हातहि तुटेल, लक्षांत ठेव.

**भीम०**:—तुम्ही काय वाटेल तें म्हणा. मी आतां तुमचा झालों! हा सर्व देहच तुमच्या सेवेला वाहिला—नुसती जीभ आणि हाचसा काय?

**रुद्र०**:—ठीक आहे. तर पहिली कामगिरी सांगतों ऐक. खरी लढाई अद्यापि दूर आहे. पण आधीं तुला एक खोटी लढाई करायला सांगतों. ती कशी पार पाडतोस ती पाहूं! (त्याच्या कानांत कुजबुजून खुणांनीं सांगतो.) हं चुकूं नको बरं!

**भीम०**:—नाहीं. चुकणार नाहीं.

**रुद्र०**:—संध्याकाळची वेळ तर होत आलीच आहे. आणि चंडिकेच्या देवळामागची आंबराई हीच ती जागा. ही नाटकी लढाई पण अशी उत्तम वठली पाहिजे कीं, केवळ माझ्या पराक्रमामुळं आपला जीव बचावला अशी तूं वीरविजयाची खात्री करून दिली पाहिजेस!

**भीम०**:—तें तर होईलच. पण या खोट्या लढाईनं माझं समाधान होणार नाहीं. रुद्रदाम, काय वाटेल तें करा, पण त्या दुष्ट अमात्याचा प्राण घेण्याचं काम मला सांगाहो! त्याशिवाय मला कशानेंही आनंद होणार नाहीं. माझी सरदारकी यानंच घालविली!

**रुद्र०**:—शाबास, द्वेष करावा तर असाच करावा. खऱ्या रक्तपाताशिवाय तुझे डोळे निवणार नाहींत तर तोहि प्रसंग लवकरच येईल, तूं असा घाबरतोस का? ठीक आहे जा तर मग. (भीमसिंग मुजरा करून जातो.) वीरविजय माझ्याहातीं आला म्हणजे माझं सगळं काम नीट होईल. पण अशा कपटाशिवाय त्याच्यावर माझी छाप पडून तो माझ्याहातीं कसा येणार? या दुष्ट अमात्याच्या जितक्या म्हणून शत्रूंची गांठ मला एका ठिकाणीं मारतां येईल तितकी मारली पाहिजे. कोल्ह्याच्या शिकारीला वाघाच्या शिकारीची तयारी करावी असं म्हणतात! आणि या माधवाचार्यांची शिकार म्हणजे ती तर प्रत्यक्ष आम्हा माणसांतल्या वाघाचीच शिकार. (पडद्याकडे पाहून) अरे वा:! अमात्याच्या आम्हां शत्रूंपैकीं सर्वांत प्रमुख अशा राणीसाहेबच इकडे येत आहेत.

[ राणी प्रवेश करिते. ]

**राणी**:—काय रुद्रदाम, तुमचं काम कुठवर आलं?

**रुद्र०**:—दहा कोसांवर, राणीसाहेब!

**राणी०**:—म्हणजे! याचा काय अर्थ?

**रुद्र०**:—याचा अर्थ इतकाच कीं, मलिककाफराचं सैन्य जितकं जवळ आलं तितकंच आपल्या कारस्थानाचं यशहि आलं!

**राणी**:—रुद्रदाम, या तुमच्या कारस्थानाची मात्र खरोखरच जराशी भीति वाटते.

**रुद्र०**:—ती काय म्हणून!

राणीः—आपण मलिककाफराला सैन्य घेऊन नगरावर चाल करून येण्याला बोलावलं, आणि इथं आल्यावर तोच शिरजोर होऊन नगर बळकावून बसला म्हणजे मग ?

रुद्र०:—ती भीति व्यर्थ आहे. मलिककाफर उत्तरेकडून दक्षिणेकडं नुसतां दिग्विजय करायला निघाला आहे. कोणचंहि नगर बळकावून बसण्याची कल्पनाच त्याच्या डोक्यांत नाहीं. तो उत्तरेकडून येऊन इकडून दक्षिणेकडे हा जाणारच. तेव्हां वाटेंत आयताच त्याला मोठेपणा देऊन आपण बोलावून आणला म्हणजे त्याला आनंद होऊन आपण योजिलेली सगळी मसलत पार पाडायला त्याच्या सैन्याची मदत होईल. बरं, आम्हांला तरी काय विशेष अदलाबदल करायची आहे ? महाराज गादीवर ते गादी-वरच राहणार. राज्याचीं सर्व सूत्रं हल्लीं मालकीण या नात्यानं आपल्या हातीं आहेत तीं तशींच राहतील. सर्वांचा आवडता कृष्णदेवराय, आज ज्याच्या त्याच्या मनानं युवराजपदावर आहे, तो त्याच ठिकाणीं मात्र यथाशास्त्र बसेल. येऊन जाऊन जो काय फेरबदल व्हायचा तो अमात्यपदापुरता !

राणी०:—( घाईनें ) होय, पण अमात्यराजांचं तुम्ही काय करायचं योजिलं आहे ?

रुद्र०:—( दांतओंठ खाऊन व तरवारीच्या मुठीला हात घालून ) ईश्वर काय बुद्धि देईल तें, किंवा वेळीं काय जरूर पडेल तें. अमात्य-राजांनीं अमात्यगिरी तर यापुढें आपल्या चरणावर वाहिली पाहिजेच. पण त्यांचे प्राण रहावे किंवा जावे हें त्यांचें त्यांच्यावर अवलंबून राहील. तो अधिकार सुखानं सोडील तर त्याचा नुसता अधिकार जाईल, आणि त्यांतहि जर त्यानं विरोध केला तर अधिकाराबरोवर त्याचे प्राणहि जातील. हें माधवाचार्योनं खूप लक्षांत ठेवावं.

राणीः—( हंसून ) रुद्रदाम, बरं ज्यांचं त्यांचं काय व्हायचं तें सर्वांबद्दल तुम्ही सांगितलं. पण तुम्ही स्वतःविषयीं कांहींच बोललां नाहीं !

रुद्र०:—( हंसून ) तें मी मुळींच आपल्याहातीं ठेवलं नाहीं. माझी सर्वतोपरी काळजी करण्याचं काम आपणांसारख्यांनीं पत्करलं; तेव्हां मी

माझी चिंता कशाला करूं ! राजसेवेंत स्वार्थबुद्धीनं तितका व्यत्यय मात्र यायचा.

राणी:—बरं पण हंसेश्वरीच्या आणि कृष्णदेवरायाच्या लग्नाबद्दल तुम्ही गर्गाचार्यांना विचारलंत का !

रुद्र०:—( स्वगत ) हंसेश्वरीचं आणि कृष्णदेवरायाचं लग्न ! मीं वेडाच असेन तें जुळवून द्यायला ! ( उघड ) हो विचारलं—पण ते म्हणतात कीं, हा विवाह होणार नाहीं. शास्त्र म्हणे त्याला आडवं येतं !

राणी:—( रागावून ) आडवं आलं तर कापून काढलं पाहिजे.

रुद्र०:—पण तें कसं होणार ? हंसेश्वरी व कृष्णदेव यांचा सपिंड-संबंध निघतो म्हणतात.

राणी०:—पण तो संबंध आपण बदलून टाकूं. आम्हा श्रीमंत राजघराण्यांतल्या लोकांना हे असले समंध मुळींच बाधत नाहींत. त्यांचं लग्न शास्त्रानं एरव्हीं होत नसेल तर तिला नाहींतर त्याला कोणाला तरी आधीं दत्तक देऊं, आणि मग लग्न लावूं.

रुद्र०:—( मनांत ) राणीसाहेबांच्या कारस्थानाचं घोडं फारच बेफाम धावतं. पण निदान या कामांत तरी माझ्याच घोड्यानं शर्यत जिंकली पाहिजे. ( उघड ) होय. दत्तविधानानं हा अडथळा घालवितां येईल खरा. पण—पण—तें असो. त्याचा आणखी खुलासा मी आपल्याकडनं पुन्हा केव्हां तरी घेईन. मलिककाफराचा तो खलिता आणि भीमसिंगाचा तो हुकूम दोहोंनीं तूर्त तरी आपलं सर्व काम भागलं आहे.

राणी०:—बरं मी जातें तर. हंसेश्वरीचं मन वळवून कोणीकडून तरी तिची समजूत मला केली पाहिजे. [ जाते. ]

रुद्र०:—( तिच्याकडं पाहून ) वः राणीसाहेब, आपण तर मला फारच भोळ्या दिसतां ! आपल्याच पोळीवर सारं तूप ओढून घेण्याचा तुमचा विचार ! पण तो मी बरा साधूं देईन ! हंसेश्वरीसारखं रत्न या कृष्ण-देवासारख्या मर्कटाला घेऊन काय करायचं ? आणि तें रत्न माझ्या-हातून जाईल तर मला नुसत्या अमात्यगिरीची काय किंमत ? या माकडाला युवराजपद मिळावं आणि मी नुसता अमात्य ! माकडाची

अमात्यगिरी करणं म्हणजे कोणीहि मनुष्य मोठंसं भूषण समजणार नाहीं. पण जाऊं दे. वैभव ही एक शिडी आहे. तिच्यावर पायरी पायरीनंच चढलं पाहिजे. पण जो इतक्या लवकर अमात्य होणार त्याला युवराज किंवा राजाहि होण्याला फारसा उशीर लागेल असं नाहीं. [ जातो. ]

---

## प्रवेश तिसरा

**स्थळ**—चंडिकेच्या देवालयाच्या मागील आंबराई.

( डोळे व हात बांधलेला वीरविजय व त्याला चालविणारे दोन शिपाई प्रवेश करितात. )

**वीर०:**—( त्रासानें ) मला तुम्ही चालविणार तरी कितीवेळ व नेणार तरी कुठं तें सांगा. नाहीं तर मी यापुढें पाऊलहि टाकणार नाहीं. आणि मग माझा जो घातपात करण्याची तुम्हांला आज्ञा असेल तो इथंच होऊन जाऊंद्या.


**प०शि०:**—नाहीं महाराज, या पुढं आपणाला अशा स्थितींत चालविणार नाहीं. आमच्या आज्ञेप्रमाणं आपले डोळे सोडून आणि हात मोकळे करून याच ठिकाणीं सोडायचं आहे.

**दु०शि०:**—आपल्याला इकडं असं आणणं आमच्या जिवावर आलं, पण करणार काय ? पोट मनुष्याला याहूनहि वाईट कामगिरी करायला लावील. ( प० शि० वीरविजयाचे डोळे सोडतो व दु० शि० हात सोडतो )

**प०शि०:**—महाराज आतां आपली कैद संपली.

**दु०शि०:**—आम्ही आपली रजा घेतों. ( वीरविजयाला मुजरे करून दोघेहि जातात. )

**वीर०:**—काय हे माझ्या नशिबाचे चमत्कार ! युवराज पदावर मी बसणार तोंच आधीं एक दिवस बंदिखान्यांत जाऊन पडलों कसा ? आणि



रुद्र०:—वाटेल त्याला वाटेल तें विचारण्याचा अधिकार तरवारीला नेहमींच असतो. [ पृ० ९

ध्यानीं मनीं नसतां आज आपोआप सुटका होऊन नगरच्या शिवेवर येऊन फिरून उभा राहिलों कसा ? साराच चमत्कार ! या सर्वांचा अर्थ काय हें त्या एकट्या परमेश्वराला माहीत. पण मी आतां या पुढें पाऊल तरी कोणत्या दिशेनें टाकूं ? ( इतक्यांत वेषांतर केलेला भीमसिंग व दोघे शिपाई तरवार घेऊन येतात. )

**भीम०:**—खबरदार पुढं पाऊल टाकशील तर. कैदेंतून सुटल्याचा परवाना दाखीव नाहींतर मुकाट्यानं आमच्या स्वाधीन हो. हा पहा, अमात्य माधवाचार्यांच्या आज्ञेनें मी तुला फिरून कैद करतों.

**वीर०:**—काय, माधवाचार्य माझा अजून पिच्छा सोडीत नाहीं ! मला माधवाचार्यांच्या आज्ञेवरून बंदिवासांत कोंडण्यांत आलं, हे जें मी बंदिवासांत ऐकलं तें एकूण खरं तर मग !

**भीम०:**—होय अगदी खरं. अमात्य माधवाचार्यांच्या आज्ञेवरून तूं कैदेंत असतां महाराज हरदेवरायाच्या आज्ञेवरून आणि रूद्रदामाच्या मध्यस्थीनें तुझी सुटका झाली. पण ती अमात्यराजांना मान्य नाहीं व फिरून तूं कैदेंत जावंस अशी त्यांची इच्छा आहे. म्हणून मुकाट्यानं तूं आमच्या स्वाधीन हो. नाहींतर तुला पाश घालून फिरून कैद करावं लागेल.

**वीर०:**—( रागानें ) अरेरे, या वेळीं माझ्या हातांत माझी तलवार असती तर मग मी यांच्या वल्गना कशा काय चालतात त्या ऐकल्या असत्या.

**भीम०:**—( हंसून ) कैदेंतून सोडतानां कैद्याच्या हातांत शस्त्र देण्याइतके अधिकारी अजून वेडे झाले नाहींत !

( भीमसिंग तलवार उपसतो; बरोबरचे दोघे शिपाई तसेंच करतात.
इतक्यांत रुद्रदाम २।३ शिपाई घेऊन सशस्त्र प्रवेश करतो )

**रुद्र०:**—कोणरे तुम्ही ? आणि युवराज वीरविजयांना तुम्ही असे घेऊन कुठें चालला ?

**भीम०:**—अमात्यमाधवाचार्यांच्या आज्ञेनं आम्ही काय वाटेल तें करूं. आम्हांला विचारण्याचा अधिकार कुणालाहि नाहीं.

**रुद्र०:**—वाटेल त्याला वाटेल तें विचारण्याचा अधिकार तरवारीला

नेहमींच असतो. तुला सरळ बोलायचं नसेल तर युद्धाला तयार हो. (बरोबरच्या शिपायांना) अरे पाहातां काय ? चालवा आपल्या तरवारी. (ते लढतात. भीमासिंग व त्याचे साथीदार पळून जातात.)

**वीर०:**—कोण रुद्रदाम ? माझ्यावर तुझे फार उपकार झाले. अरेरे! माझ्या करतां तूं लढत आहेस असं पाहूनहि मला तुला साहाय्य करतां आलं नाहींना ?

**रुद्र०:**—वीरविजया, हें भलतंच काय म्हणतोस ? तुझ्या हातीं शस्त्र असतं तर नसतीस का मला मदत केलीस ? (त्याच्या हातांत हात घालतो) तूं मदत न केलीस तरी चालेल. तूं कैदेंतून सुटून जिवंत परत आलेला मला पाहायला मिळाला येवढेंच तूर्त पुरे.

**वीर०:**—पण मी कैदेंत पडलों कां ? आणि पडलों तर जिवंत सुटून तरी कसा आलों ? कांहींच कळत नाहीं. हें सर्व परमेश्वराला माहीत.

**रुद्र०:**—अरे परमेश्वर तर जाणतोच; पण हें सर्व गौडबंगाल परमेश्वराच्या खालोखाल एकटा अमात्यमाधवाचार्य जाणतो खास.

**वीर०:**—एकूण हा सर्व खेळ अमात्यमाधवाचार्यांचा ही जी माझी कल्पना तीच खरी तर ?

**रुद्र०:**—यांत संशय कसला ?

**वीर०:**—मित्रा रुद्रदामा, मला आजपर्यंत घमेंड होती रे—

**रुद्र०:**—ती कोणती ?

**वीर०**—मला आजवर घमेंड होती कीं तरवार ही लेखणी पेक्षां अधिक पराक्रमी म्हणून. पण ही माझी घमेंड व्यर्थ ठरली.

**रुद्र०:**—पण तूं थोडा चुकलास. अमात्यमाधवाचार्यांच्या हातीं तरवार तर नाहींच पण लेखणीही क्वचितच असते. त्याच्या हातांत रुद्राक्षाची माळ मात्र असते खरी. आणि असं असतां तुझ्यासारख्या वीराला तो बाहुलीप्रमाणें खुशाल नाचवूं शकतो. धन्य त्याच्या कारस्थानाची !

**वीर०:**—आणि धि:कार माझ्या तरवारीला !

**रुद्र०:**—(दचकल्यासारखें दाखवून) अरे पण तू आणि मी वेड्या सारखे नगरच्या वेशीजवळ बोलत उभे काय राहिलों आहोंत !

वीर०:—खरंच, मी तुरुंगांत पडण्यापूर्वीचा भावी युवराज कीं अमात्यमाधवाचार्यांचा बंदिवान ? आणि याचा निर्णय होईपर्यंत मी जाऊं तरी कुठें ?

रुद्र०:—तूं वाटेल तिकडे जाशील, फार काय पण तुला मी जाऊं दिला तर तूं असाच माधवाचार्यांच्या आश्रमांत घुसून त्याचा प्राणहि घेशील . हें मला पुरं माहीत आहे. पण तुझ्या हातून असा अविचार होऊं देऊन तुझा जीव मी धोक्यांत घालीन, तर मग मी तुझा मित्र कसला! पण चल, आपण वेड्यासारखे इथंच बोलत काय उभे राहिलों!

वीर०:—कां बरं ? त्याला कुणाची हरकत? आणि खरं म्हणशील तर मला सुद्धां तूं आतां म्हटलंस तसंच करावंसं मनांत येतं. मी असाच जाऊं कां ! आणि दुष्ट माधवाचार्यांचे प्राण घेऊं कां!

रुद्र०:—शुः शुः बोलूं नकोस, मोठ्यानं बोलूं नकोस. तुझा मोकळा स्वभाव तुला नेहमीं बाधतो तो असाच.

वीर०:—मग मी करूं तरी काय म्हणतोस !

रुद्र०:—मी सांगतों काय करायचं तें. कारण योगायोगच असा विलक्षण दिसतो कीं तुझ्या हातून अमात्याचा सूड घेण्याची तयारी आम्ही आगाऊच करून ठेवावी.

वीर०:—ती कशी ?

रुद्र०:—फिरून तेंच ! या सर्व गुप्त मसलती तुला मी चवाठ्यावर सांगूं कीं काय ? शिवाय अमात्यमाधवाचार्य जिवंत असतां तूं उघडपणानं बंधमुक्त होऊन राजमार्गात दिसणं म्हणजे मृत्यूला आमंत्रण पाठविण्यासारखेंच आहे. चल, याठिकाणीं एक क्षणभरहि उभें राहतां कामा नये.

[ त्याचा हात धरून घेऊन जातो.]

---

## प्रवेश चवथा

स्थळः—विजयनगरचा राजवाडा.

[ हरदेवराय प्रवेश करतो. ]

हर०:—काय करूं ! मनाचा निश्चय म्हणून होत नाहीं. अमात्य-माधवाचार्य माझ्या इतकेच वृद्ध आहेत. मग काय ? त्यांचंहि मन माझ्यासारखंच चंचल होत असेल काय ? अमात्य नजरेसमोर असले म्हणजे त्यांचं बोलणं मला खरं वाटतं. आणि ही नजरेसमोर असली म्हणजे हिचंहि बोलणं खरं वाटतं. वयाला साठ वर्षं झाल्यानंच जर बुद्धि दूषित होत असेल तर माझ्यासारखी माधवाचार्यांचीहि स्थिति झालीच पाहिजे. अरे पण ही आलीच. हिच्या दर्शनानं माझ्या मनाला ज्याअर्थी टवटवी येते त्याअर्थी तिची सल्लामसलतच मला हितकर असली पाहिजे असं मी कां न समजावं ? [ राणी प्रवेश करिते. ]

राणीः—मग काय ठरलाना आपला निश्चय ?

हर०:— तो कसला बरं ?

राणीः— अगबाई, इतक्यांत विसरायला तें काय झालं ? मी मघाशीं सांगितलं त्याला कांहीं १०–५ वर्षं झालीं नाहींत.

हर०:—अग, हें चाललंच आहे. म्हातारपणीं हें असंच व्हायचं. मी हल्लीं आपल्या स्मरणशक्तीवर फारसा बोजाच घालीत नसतों.

राणीः—पण मी कुठं म्हणतें आहें आपणाला कीं आपण बोजा घालावा म्हणून ? आपल्या डोक्यावरचा राज्यकारभाराचा बोजा सुद्धां उतरायला मी तयार आहें. पण आपण तसं कुठं करूं देतां ?

हर०:—कां बरं ? तुझ्या संमतीशिवाय हल्लीं मी एक तरी राज्य-कारभाराचं काम करतों कां सांग !

राणीः—आपण माझी संमति घ्यायला तयार आहांत खरे. पण आपले अमात्यराज कुठं आहेत तयार—कारभाराचं एखादं तरी काम इकडं शिल्लक

ठेवायला ? त्यांना तर कारभाराची जशी कांहीं हावच सुटली आहे. म्हातारपणीं म्हटलं तर दगदग नकोशी वाटावी—

हर०:—हो असं खरं. माझी कारभाराची दगदग कमी करायला तिकड अमात्यराज आणि इकड तूं इतकी तत्पर असतां चुकून माकून कुठं एखादं काम माझ्या करण्यावर राहतं त्याची सुद्धां मला किती तरी जिकीर वाटते.

राणी:—पण अमात्यराजांचं म्हातारपण कुठं आहे आपल्यासारखं! ते तर दिवसेंदिवस अधिक तरुणच होताहेत असं वाटतं. पण तें कसंहि असो. म्हाताऱ्यांनीं तरुणांसारखी अधिकाराची हाव धरली म्हणजे अधिकाराच्या निराशेनं तरण्यांनाहि अकालींच म्हातारपण यायचं. मग सांगा आपला निश्चय झाला कां?

हर०:—तो कसला?

राणी:—आपल्याला नसेलच आठवत तर मी पुन्हां स्पष्ट सागतें हो. यांत कुणाच्या काकाची भीड नाहीं, किंवा कुणाच्या देवाची भीति नाहीं. अमात्यमाधवाचार्योंकडून कारभार काढून घेऊन त्यांना आतां घरीं बसवावं असं मी मघाशीं आपल्याला सुचविलं होतं आणि आपण विचार करतों म्हणालां होतां. तेंच फिरून विचारतें. झाला कां निश्चय?

हर०:—झाला–झाला–पण नाहीं–ते पहा अमात्यराजच मला वाटतं इकडं येत आहेत. तर जा जरा दूर हो.

[ सेवक येतो व मुजरा करतो. ]

सेव०:—अमात्यराजांची स्वारी बाहेर आली आहे. आज्ञा होईल तर—

हर०:—(गडबडीनं) हो हो आज्ञा कसली? (राणीला उद्देशून) माधवाचार्य येत आहेत आंत जा. निदान जरा दूर हो.

राणी०:—(हरदेवरायाच्या खांद्यावर हात ठेवून) तें काय म्हणून? मी अशी जवळ उभी राहणार–मला अमात्यांची भीति कसली? आणि अमात्यांना असं भिण्यासारखं तरी यांत काय आहे? आपण मला देवाब्राह्मणांसमक्ष आपल्या अर्ध्या अंगाचा ताबा दिला तो माझा मला घ्यायला

कोणाची चोरी ? अमात्यांसारख्यांनी माझ्या सैभाग्याचं ऐश्वर्य पाहावं हेंच मला भूषण. ह्यांतच मला धन्यता वाटते.

[ माधवाचार्य प्रवेश करतो. ]

**राणी०:**—कां अमात्यराज, मी म्हणतें तेंच खरं आहे कीं नाहीं ?

**माध०:**—राणीसाहेब काय म्हणत होत्या तें मी ऐकलं नाहीं.

**राणी०:**—आपण ऐकलं नाहीं तर पुन्हा सांगतें. इकडच्या अर्ध्या अंगाची मी मालकीण आहें कीं नाहीं ? बोला, तुमचं शास्त्र काय म्हणतं ?

**माध०:**—शास्त्र काय म्हणणार ! आपला आणि महाराजांचा संबंध इतका निकट आहे कीं त्यांत शास्त्राला शिरायला जागाच नाहीं.

**राणी०:**—( लाजून ) मग असं जर खरं, तर मी सांगतें त्यांपैकीं इकडनं निम्मंशिम्मं तरी ऐकणं व्हावं कीं नाहीं ?

**माध०:**—त्याला कांहींच हरकत दिसत नाहीं. किंबहुना आपलं सगळंच म्हणणं महाराजांनीं ऐकलं तरीहि त्यांत कांहीं वावगं नाहीं. कारण आपण झालं तरी कोणतंही सांगाल तें महाराजांच्या आणि राज्याच्या हिताचंच सांगाल. शिवाय वृद्धपणीं राज्यकारभाराचं ओझं डोक्यावरून कोणी हलक्या हातानं उतरलं तरी तें इष्टच असतं. निदान मला तरी तसं वाटतं.

**राणी०:**—मी इकडच्या डोक्यावरचं कारभाराचं ओझं तें काय उतरणार ? मी किती केलं तरी बायको मनुष्य. अल्पवयी अप्रबुद्ध. इकडं राज्यकारभारांत मदत करायला म्हणून गेलें आणि अनुभव नसल्यामुळं कांहीं भलतंच करून ठेवलं तर कसं होईल ?

**माध०:**—भलतं केलंच तर भलतं होईल हें खरं. पण तरुणपणीं बुद्धि तरतरीत असते. तिच्याहातून भलतं होणारच नाहीं.

**राणी०:**—अशी जर खात्री आहे तर मी एखादी गोष्ट सांगितलेली ऐकण्याचा अमात्यराजांनीं इकडं सल्ला द्यावा. माझा दुराग्रह दिसेल म्हणून मी कोणत्याहि गोष्टींत आग्रह म्हणून धरीत नाहीं.

**माध०:**—आणि आपण आग्रह धरलात तरी त्यांत वावगं काय आहे ! महाराज आणि मी लहानपणापासून बरोबर वाढलेलों, बरोबरीच्या नात्यानं



**राणी०:**—कां अमात्यराज, मी म्हणतें तेंच खरं आहे कीं नाहीं ? [ पृ० १४

वागलेलों, तेव्हां राणी सरकारच्या इच्छेप्रमाणें महाराजांनीं कारभारांतून लक्ष कमी करावं असं सुचवायला मला कांहींएक हरकत वाटणार नाहीं. एवढंच काय, पण मला तर आपण अजून सुचविलेलं नाहीं ना! असं असून हा पहा मी होऊन आज महाराजांकडं माझंहि कारभाराचं ओझं हलकं व्हावं म्हणून प्रार्थना करायला आलों आहें. आम्ही आतां पिकलेलीं पानं झालों. आश्रमधर्मांप्रमाणें आम्ही आतां संन्यासदीक्षा घ्यावी हेंच योग्य.

हर०:—( स्वगत ) अरेरे, या ब्रम्हचाऱ्याचं हें वैराग्य कोणीकडे! आणि अशा उतारवयांत ही मला जखडून राहिलेली संसारसुखाची आवड कोणीकडे!

राणी०:—मग अमात्यराज संन्यास घेण्याचा केलेला निश्चय इकडं कळवायला आले आहेत असंच मीं समजावं कीं काय!

माध०:—हो हो, यांत काय संशय? तो निश्चय कळविण्याकरितां इकडं आलों आहे हेंच खरं.

हर०:—छे, छे, अमात्यराज हें तुम्ही काय बोलतां! तुम्ही संन्यास घेतल्यावर माझ्या राज्याचं कसं होईल!

राणी:—असं काय बोलावं तें अगदीं-वेड्यासारखं म्हणणार होतें-अगदीं तोंडाला आलं होतं!

हरदेव:—हो, तोंडानं म्हटलं नाहींस म्हणून बरं झालं!

राणी:—हो बरं माझी थट्टा नको कांहीं करायला! आपल्या माणसाला थट्टेनं मनुष्य एखादे वेळीं बोलतंच आहे एखादा शब्द. म्हणून तोच आपला खरा धरून जर त्याचा अर्थ करू लागलं तर मग बोलणंच खुंटलं. हवी तर मी मुळींच बोलत नाहीं कशी! जळलं मेलं हें माझं तोंड; त्याला गप्प म्हणून कसं तें बसवतच नाहीं. ( तोंड फिरवून रागावून बसते. )

हर०:—वेडी कुठची! असं रागवायला काय झालं? हें पहा मी आतां तुला वेडी म्हटलं न कळत. झाली तुझी माझी फिटाफीट. आतां फिरीव तोंड इकडे, आणि काय बोलणार होतीस तें सांग पाहूं. पुरतं बोल.

राणी:—बोलायचं काय? मी इतकंच म्हणणार होत्यें कीं, अमात्य-राज संन्यास घेणार म्हणतात तर त्याला आपण आड येऊं नये. आपल्या

हातून पुण्य होत नसलं, तरी दुसऱ्याच्या पुण्यकर्मात तरी अडथळा करूं नये! राज्याचं काय मेलं, चाललंच आहे. तें कुणाकरतां थांबत का असतं? पण आमच्या राज्याचं काम सुरळीत चालून आम्हाला विश्रांती मिळावी म्हणून आम्ही दुसऱ्याला किती सतवावं! त्याला कांहीं सीमा का आहे?

**माधवा०**:—राणीसाहेब अगदीं बरोबर बोलतात. नदी जशी कुणाककरितां वहावयाची थांबत नाहीं, काळ जसा कुणाची वाट पहात नाहीं, किंवा सूर्य चंद्र जसे उगवण्या मावळण्याला कुणाकरितां अडून बसत नाहींत, तसंच राज्यकारभाराचं आहे. मी आज संन्यास घेणार तो घेत नाहीं असं समजा—

**राणीः**—(भीतीनें व आश्चर्यानें) म्हणजे इतक्यांतल्या इतक्यांत बेत बदलला कीं काय आपला?

**माधवा०**:—राणीसाहेब, आपण भिण्याचं कारण नाहीं. माझा संन्यास घेण्याचा बेत मुळींच बदलला नाहीं. मी इतकंच म्हणत होतों कीं मी आज संन्यास घेणार तो राज्याच्या कल्याणाकरितां घेतला नाहीं असें समजा; तरी मी कांहीं अमर झालेलों नाहीं ना? झालं तर! माझ्या मरणोत्तर दुसऱ्या कुणावर तरी हें राज्य विसंबलंच जाणार कीं नाहीं? जगांत प्रत्येकाला वाटत असतं—मी मेलों कीं माझ्या मागोमाग जग बुडेल. पण जग असं खंबीर आहे, कीं कुणाच्याही मरणानं तें मरण पावत नाहीं. फार काय, पण निराशहि होत नाहीं. आपल्या स्वतःला जगाचा धनी किंवा पोशिंदा मानून बढाई मारणाऱ्या मूर्खाला जग मनांत हसतं मात्र! वाटेनं जातांना मरून पडलेलं कुत्रं किंवा मांजर आपल्या दृष्टीस पडलं तर कींव येऊन त्याच्याकडं आपण एकवार बघतों तरी. पण विभूतींतली महाविभूति जरी मरण पावली तरी जग मागं वळून त्याकडं तितकंसुद्धां ढुंकून पाहत नाहीं. जगानं दशावताराचीं अनेक युगांतरं पाहिलीं आहेत! बरं आहे. मी येतों आतां.

**हर०**:—अमात्य, काय तुम्ही संन्यास घेणार? मग मलाहि कां नाहीं देत संन्यास तुमच्या बरोबर?

**राणी**:—हें काय? हें भलतंच काय बोलणं! मी बरी संन्यास घेऊं

देईन आपणाला? स्त्रीच्या परवानगीशिवाय संन्यास घेतां येत नाहींनाहो अमात्यराज?

माधवा०:—राणीसाहेबांना शास्त्र चांगलंच समजतं (मनांत) येवढ्या-पुरतं!

हर०:—वृद्धपणीं लग्न करण्यापासून इतर तोटे कितीही असोत, पण स्त्रीच्या परवानगीशिवाय संन्यासहि घेतां येत नाहीं हा मात्र सर्वांत मोठा तोटा खरा!

राणी:—(रागानं) अस्सं का? हीं घालून पाडून बोलणीं मला समजतात बरं का? (रडायला लागून) आपणांला माझा जाच होतो ना! ठीकं आहे. आपण वैतागून नको कांहीं संन्यास घ्यायला. मीच आपला जीव देत्यें म्हणजे सुटाल माझ्या जाचांतनं. संन्यास घ्यायला बायकांची परवानगी पतीला लागते, तशी बायकोला जीव द्यायला कांहीं पतीची परवानगी लागत नाहीं, हें आतांच सिद्ध करून दाखवितें आपणाला! (पाय आपटीत निघून जाते).

हर०:—अमात्य, पाहिलीतना! कोण ही माझी दुर्दशा!

माधवा०:—महाराज! झाल्या गोष्टीचा खेद मानण्यांत अर्थ नाहीं. राजे लोकांना ब्रम्हचाऱ्यांच्या स्वातंत्र्यसुखाचा लोभ वाटून काय उपयोग! राजा तो राजा आणि ब्रम्हचारी तो ब्रम्हचारी! राजपद विकत घेण्याला इतर पुष्कळ सुखाची किंमत द्यावी लागते हें खरं, पण पूर्व पुण्याईशिवाय कांहीं राजपद लाभत नाहीं हें लक्षांत आणा. वृद्धपणीं विवाह केल्याचा खेद मानण्यापेक्षां,आहे या स्थितींत राणीसाहेबांचं मन सुप्रसन्न ठेवणं यांतच आतां सुख आहे. त्या बोलल्या त्याचा मला मुळींच राग आला नाहीं. पोर-बुद्धीवर कुणी रागवावं? जा. महाराज! राणीसाहेबांची आपण समजूत करून त्यांनां परत आणा. मी जातों. (जातो)

हर०:—(राणीला हांका मारीत) अग ए खरीच का दूर गेलीस? (कानोसा घेऊन) खरंच रागावून गेली वाटतं. (घाबरून) आतां काय करावं! जीवबीव दिलान तर!

[ घाईनें जातो ]

---

## प्रवेश पांचवा

**स्थळ**—मीनाक्षीचें घर.

**हनु०:**—( प्रवेश करून ) मीनाक्षीच्या घरीं आलं म्हणजे माझ्या सर्व श्रमांचा परिहार होतो. लोक तिचं घराणं अपवित्र मानतात पण लोकांची पर्वा करण्याचं मी केव्हांच सोडलं आहे. आणि लोकमत जेव्हां सर्वस्वी अन्यायमय असतं तेव्हां त्याची पर्वा तरी कोणी कां करावी? मीनाक्षी ही आचरणानं पवित्रपणाची केवळ मूर्ति असं असतां ती कलावंतिणीची मुलगी म्हणून वाईट, आणि नगरच्या राणीसाहेब नखशिखांत अपवित्र असतां सगळे लोक एखाद्या देवीप्रमाणं तिच्या पाया पडण्यांत पुण्य मानतात! अमात्यराजांवरची मीनाक्षीची निःसीम भक्ति पाहून तर माझं तिच्यावरचं प्रेम दुणावलं आहे. आणि अमात्यराजसुद्धां तिच्यावर फार ममता करितात. सगळ्या विजयनगरांत हंसेश्वरीखालोखाल अमात्यराजांचं प्रेम जर कोणावर असलं तर ते मीनाक्षीवरच! ही पहा अमात्यराजांकरितां लोकरीचं आसन विणीत आणि आनंदाच्या भरांत आपणाशींच गुणगुणत बसली आहे. अरे पण ही आली तिची कजाग आणि लोभी बहीण! अशा वेळीं पुढं होण्यापेक्षां आड व्हावं हेंच बरं.

**मीना०:**—(गुणगुणते)

गुरु हा माझा प्राण विसावा
गुरु हा प्रेमधनाचा ठेवा
गुरु भव-तारक गुरु-भय हारक
गुरु मंगलमय गावा ध्यावा

[ कंचम्मा प्रवेश करते ]

**कंच०:**—पोरी हें लोकरीचं आसन काय विणीत बसली आहेस! दिवस मावळलाना! तुझी वेणीफणीसुद्धां अजून झाली नाहीं. अहाहा काय ध्यान दिसतं आहे पण! आणि इतक्यांत जर आलं राजवाड्यांतलं बोलावणं तर मग काय करशील?

मीना०:—काय करायचं ? बोलावणं परत करीन दुसरं काय ?

कंच०:—( रागानं ) अस्सं का ? अग दांडगे ! तूं घराण्याचं वाटोळं करायला बसली आहेस. अवदसा नाहीं तर ! आमच्यासारख्यांना राजाच्या घरचा आश्रय मिळायला शंभर जन्म घ्यावे लागतात आणि तूं माजोरी-पणामुळं हातचा राजाश्रय गमावायला बसली आहेस ?

मीना०:—ताई, तुला राजाश्रय मिळण्यापूर्वी तूं शंभर जन्म घेतलेस ते कसले कसले होते ग ? आठवतात का तुला ?

कंच०:—काय विचारती आहे पहा बोलघेवडी !

मीना०:—मला तर वाटतं कीं तूं शंभर जन्म केलेल्या पापांचं प्राय-श्चित्त म्हणून तुला हा देवानं कलावंतिणीचा जन्म दिला असेल. तेव्हां आतां तरी पाप सोडून दे नी गुरुभक्ती कर.

कंच०:—अग कार्टे राजासारख्याचा आश्रय धरायचा हें पाप आणि त्या भिकारड्या हनुमानाकडं पाहून तुझ्या डोळ्यांत आनंदानं पाणी येतं तें मात्र पुण्य नव्हे का ?

मीना०:—होय ताई तें पुण्यच आहे. कारण मनांत लोभ न धरतां केलेल्या प्रेमासारखं दुसरं पुण्य तें कोणतं ? महाराज हरदेवरायांकड पाहून तुझ्या डोळ्यांत खरोखर कधीं तरी आनंदाच पाणी आलं असतं तरी मी तुझ्या लोभाला दोष दिला नसता. पण—

कंच०:—तुझं हें वेडीसारखं बरळणं कुणी ऐकून घ्यावं ? मेलीच्या जन्माचं काय व्हायचं आहे कुणाला ठाऊक ? नशीबांत असेल तें खरं !

[ फणकाऱ्यानें जाते ]

मीना०:—( हंसून ) खरंच ताई, तूं माझ्या जन्माची काळजी कर-ण्याचं सोडून दे आणि माझ्या नशीबालाही पण कौल लावूं नको. मी वेडी, आणि ही ताई मात्र शहाणी ! राजाश्रयाचं इला काय पण कौतुक वाटतं ! म्हणे हनुमानाकडं पाहून तुझ्या डोळ्यांत आनंदाचं पाणी कां येतं ? येतं खरं. पण तें कां हें इला कोणच्या शब्दांनीं मला सांगतां येईल ? ( फिरून गुणगुणूं लागते ).

[हनुमान पुढें येतो. ]

हनु०:—मीनाक्षी दुसऱ्याचं बोलणं आडून ऐकणाराला कोणतं प्रायश्चित्त असतं सांग पाहूं ?

मीना०:—( त्याला पाहून आनंदानें उभी राहून ) हें काय ? तें मला कसं सांगतां येणार ? मी का राजवाड्यांतली शास्त्रीण आहे की काय ? पण कुणाचं बोलणं जर कुणी आड उभा राहून ऐकलं तर त्याचं मन त्याला खाल्ल्याशिवाय राहायचं नाहीं येवढं मात्र मला कळतं.

हनु०:—मीनाक्षी, हा तुझा अदमास मात्र साफ चुकला. कित्येक माणसं इतकीं निर्लज्ज असतात कीं दुसऱ्याचं बोलणं आड उभा राहून ऐकतात, आणि वरतीं आपण केलं हें फार चागलं केलं अशी स्वतःला शाबासकी घेण्याला तयार होतात. आणि अशा माणसांपैकीं हा पहा मी एक तुझ्यापुढं उभा आहे.


मीना०:—( स्वगत ) माझं आणि ताईचं बोलणं यांना ऐकायला गेलं वाटतं. ( उघड ) दुसऱ्याचं बोलणं चुकून कानावर आलं तर त्याला दोष नसतो.

हनु०:—चुकून ? अग मुद्दाम ! येवढंच काय पण मी आज इतक्या थोड्यावेळांत असला एकच नव्हे तर दोन गुन्हे केले. आणि दोन्ही गुन्ह्यांत मला यशच आलं.

मीना०:—गुन्हा केल्याबद्दल तुम्हांला पश्चात्ताप झाला नसला तर आडून जें काय ऐकलंत त्यानं तरी तुम्हाला दुःख झालं असेल. देव असं ना असं, कसं तरी शासन करतोच करतो.

हनु०:—नाहीं मीनाक्षी, या दोन्ही गुन्ह्यांबद्दल देव मला खचित शासन करणार नाहीं. एक गुन्हा हा आतांच तुझ्या घरीं मीं केला. तुझं आणि तुझ्या ताईचं बोलणं मीं आडून ऐकलं. मीनाक्षी, तुझे प्रेमोद्गार ऐकून मी धन्य झालों.

मीना०:—( हंसून ) अग बाई; आणि आपण दुसरा गुन्हा नुकताच केला म्हणून सांगितलं त्यांतही आपणांला असेच आणखी कुणाचे प्रेमोद्गार ऐकायला सांपडले कीं काय ? तर मग तुम्हीं आज चांगल्याच मुहूर्तावर घरांतनं बाहेर पडलां होतां म्हणायचे !



हनु०:—चुकून ? अग मुद्दाम ! [ पृ० २०

हनु०:—नाहीं. दुसऱ्या गुन्ह्यांत माझ्या कानावर आलेले शब्द प्रेमाचे नव्हते. तर द्वेषबुद्धीचे होते.

मीना०—मग तरीही त्यांत आनंदच ?

हनु०:—होय मीनाक्षी. कारण ते ऐकून गुरुमहाराजांची कांहींतरी चांगलीशी सेवा हातून घडण्याचा प्रसंग आला असं मनानं सांगितलं. मीनाक्षी, तुझं प्रेम आणि गुरुसेवा हे लाभ मला एकाच खेपेंत झाले तेव्हां तूं म्हणालीस त्या प्रमाणं मीं खरोखर घरांतून चांगल्या मुहूर्तावर निघालों होतों यांत शंका कसली ?

मीना०:—पण मला तुम्ही संशयांत किती वेळ ठेवणार ?

हनु०:—तुला संशयांत काय म्हणून ठेवीन ? काय झालं तें तुला सांगावं म्हणून तर मुद्दाम या वेळीं तुझ्या घरीं आलों. हें पहा अमात्य माधवाचार्यांनीं आज्ञा केल्याप्रमाणं रुद्रदाम आणि कृष्णदेवराय यांच्या हालचालीवर पाळत ठेवून मी चंडिकेच्या देवालयांत गेलों आणि तिथं त्यांचं सारं बोलणं मीं आडून ऐकलं.

मीना०:—ते कशाबद्दल बरं बोलत होते ?

हनु०—कशाबद्दल ? विजयनगरचं राज्य ताब्यांत घेण्याबद्दल !

मीना०:—( आश्चर्यानें ) म्हणजे ?

हनु०:—अग अशी घाबरतेस कां ? राज्य घेण्याचा कट केला म्हणजे राज्य मिळतं असं थोडंच आहे ! रुद्रदाम मलिक काफराकडं मदत मागायला खलिता पाठविणार आहे. त्यावर कृष्णदेवरायाची सही तो मागत होता.

मीना०:—त्या वेडप्याची सही ?

हनु०:—अग वेडप्यांकडूनच शहाण्यांनीं कामं करून घ्यायचीं ! बरं असो. तुझी थोडीशी मदत पाहिजे या कामीं मला.

मीना०:—( उत्सुकतेनें ) सांगा काय पाहिजे ती.

हनु०:—या कटांत राणीसाहेबांनाहि रुद्रदाम गुंतविल्याशिवाय बहुधा सोडणार नाहीं. राजवाड्यांत तुझा प्रवेश असतोच तेव्हां—

मीना०:—आलं लक्षांत सगळं माझ्या. ही पहा मी आतां अशीच

जातें राजवाड्यांत, आणि हिकडून तिकडून कांही बातमी मिळते कां पहाते.

**हनु०:**—आणि काय बातमी असेल ती घेऊन अमात्यराजांच्या घरीं ये. कांहीं तरी गुरुसेवा घडावी असं मनांत होतं तो योग आयताच आलेला दिसतो. आणखी हें पहा, मनिाक्षी, हंसेश्वरीची भेट घे आणि गुरुमहाराजांचा लवकरच संन्यास घेण्याचा विचार चालला आहे, असं तिला कळीव.

**मीना०:**—गरीब बिचारी हंसेश्वरी! राजवाड्यांत एकटी तीच काय ती मला माणसासारखी दिसते. बाकीचीं जनावरं नाहीं तर भुतं. तिचा जीव वीरविजयावर आणि तो तुरुंगांत!

**हनु०:**—अमात्यराजांची एक गुप्त लेखी आज्ञा मी नुकतीच वारंगळच्या तुरुंगाच्या सुभेदाराला पोंचवून आलों. मग संन्यास घेण्यापूर्वी त्याची सुटका करण्याचा गुरुमहाराजांचा बेत असला तर बरंच झालं.

**मीना०:**—तसं झालं तर ईश्वराची कृपाच होईल.

**हनु०:**—मीं जातों तर. [ जातो ].

**मीना०:**—मीही निघालेंच राजवाड्याकडं. ( हांका मारून ) ताईग ए ताई– [ कंचम्मा प्रवेश करून ]

**कंच०:**—कां बाई, माझी कां आठवण झाली मध्येंच?

**मीना०:**—हें बघ, मला कीं नाहीं राजवाड्याकडं जायचं आहे आत्तां. माझी तयारी कर.

**कंच०:**—आणि मघाशीं मी म्हणत होतें तेव्हां काय आलं होतं भूत तुझ्या अंगांत?

**मीना०:**—( लडिवाळपणाचं सोंग करून ) जाऊं दे ग ताई, चुकून तुझी थट्टा केली तेंच घेऊन काय बरं बसलीस! राजवाड्याकडं जायचं माझं कामच आहे. मला बोलावणं तरी कशाला पाहिजे?

**कंच०:**—( आनंदानं ) आतां माझी बाळ कशी बोलली! चल मला करूं दे तुझी वेणीफणी!

**मीना०:**—( थट्टेनं ) चल लवकर चल. [ जातात ]

---

# प्रवेश सहावा

**स्थळ**—अमात्य माधवाचार्यांची होमशाळा.

[माधवाचार्य जपाची माळ ओढीत बसला असतां हंसेश्वरी प्रवेश करिते.]

**हंसे०**:—( रडत व डोळे पुशीत ) बाबा, बाबा, हें तुम्ही काय मनांत आणलं आहे ! मी यापुढं कुणाला बाबा म्हणूं ?

**माध०**:—कोण ! माझी लाडकी हंसेश्वरी ?

**हंसे०**:—पण हे असे प्रेमळ शब्द मला शेवटचेच ऐकूं येणार ना ?

**माध०**:—कां ? असे निर्वाणीचे उद्गार कां काढतेस ? माझ्या हातून कांहीं चुकलं कीं काय म्हणून असे हे दुःखाचे उद्गार तुझ्या तोंडून आज येतात !

**हंसे०**:—बाबा, मी तुमची चूक कशी म्हणूं ! या पोरक्या पोरीचा आजवर सांभाळ तुम्ही केला, सख्या आईहून अधिक ममता केली, बापाहून अधिक कोड पुरविले; असें असतां—

**माध०**:—मग असं असतां आज तुझ्या डोळ्यांत हे अश्रु कां ?

**हंसे०**:—पण हें सर्व सुख मला यापुढं अंतरणार म्हणून.

**माध०**:—पण तें काय म्हणून अंतरणार ?

**हंसे०**:—मी आत्तांच अशी दुष्ट बातमी ऐकली कीं, माझे बाब संन्यास घेणार, आणि तसं झालं म्हणजे मी कुणाला बाबा म्हणूं ? 'लाडके हंसेश्वरी ये' असं म्हणून मला कोण जवळ घेईल ?

**माध०**:—अरे वाः ! पोरी, तुला ही बातमी कशी कळली ? आणि ती खरी असली तरी तिच्यांत दुःख करण्यासारखं तें काय आहे ! बाळे, ये. माझ्याजवळ बैस. आणि आतां मला सांग कीं, मीं संन्यास घेतला म्हणून काय झालं ? आजच्या स्थितींत राजाचा मंत्री होऊन मी नगरांत राहिलों तरी मी संन्यासीच नाहीं काय ? आणि पुढें जरी मी प्रत्यक्ष संन्यास घेतला, तरी काय अंतर पडणार ! जसा माझ्या देशमाउलीचा

तसाच ( हंसेश्वरीच्या पाठीवर हात फिरवून ) माझ्या या धर्मकन्येचा लळा मला यत्किंचितहि सुटेल काय? वेडे, तूं अजून अप्रबुद्ध आहेस. तुला माहीत नाहीं कीं, संन्यासदीक्षा ही जरी आश्रमधर्माप्रमाणं वागणाऱ्या आम्हां ब्राह्मणांना वृद्धापकाळीं घेणें जरूर आहे तरी पण संसारांतील सात्त्विक मायापाश संन्याशालाही सुटत नाहींत. ( हंसेश्वरीचे केंस कुरवाळून ) हंसेश्वरी, तुला माहीत आहे ना? कीं माझ्या गृहस्थाश्रमांत मीं फक्त दोनच गोष्टींवर प्रेम केलं. एक ही विजयनगरी व दुसरी तूं. लग्न न करितांहि तुम्हां दोघींवरील ममतेनं माझा गृहस्थाश्रम वत्सलरसानं कसा अखंड ओथंबलेला होता, ही परमेश्वराची माझ्यावर केवढी कृपा!

**हंसे०**:—( माधवाचार्यांचे गळयास मिठी मारून ) पण बाबा, तुम्ही संन्यास घेऊन विजयनगरी सोडून शृंगेरीला जाल तेव्हां मला बरोबर घेऊन जाल काय?

**माध०**:—काय? संन्यास घेऊन मी शृंगेरीला जाणार हेंहि तुला कळलं आहे!

**हंसे०**:—( हंसत ) होय. आणखी मला असंहि कळलं आहे कीं, माझे बाबा आज जे कृतीनें जगद्गुरु आहेत ते उद्यां अधिकारानेंहि जगद्गुरु होणार.

**माध०**:—अरे वा ! हीहि गुप्त बातमी तुला कळली तर! मग वेडे याबद्दल तूं हंसावं तें न हांसतां रडतेस काय म्हणून? शिवाय मीं झालों तरी तुझ्या भावी आयुष्याच्या सुखाची तर्तूद केल्याशिवाय विजयनगरी सोडून जाईन असं का तुला वाटतं! वयपरत्वें संन्यासदीक्षा घेणं हें जसं मला योग्य आहे, तसंच संसारांत तुझा प्रवेश करून देणं हेंही पण माझं कर्तव्यच आहे. तर बोल, आतां लाजूं नको. माझ्याशीं मन मोकळं करून बोल. तुझं मन कुणावर आहे? लाजूं नको. तुझी प्रेमळ आई व मायाळू पिता हीं दोन्हीं मींच ना? पण एवढसंच काय? तुझा विनोदी भाऊ आणि थट्टेखोर वहीणहि मीच असें समज. बाळे, या जगांत एका विजयनगरीखेरीज करून प्रेमाचं स्थान जशी तूं मला आहेस तसाच सर्व जगांत निदान आज तरी तुझ्या प्रेमाचं स्थानहि मीच

आहे कीं नाहीं ? तर बोल, माझ्याशीं मन मोकळं करून बोल. तुझं मन खरंच कुणावर आहे ?

हंसे०:—( लाजून ) हें कायहो भलतंच मला विचारतां बाबा ! विषय बदलायला तुम्हांला कांहीं तरी सबब पाहिजे होती वाटतं ?

माध०:—नाहीं. विषय अद्यापि बदलला नाहीं. तुझा विवाह योग्य वराशीं करून दिल्याशिवाय संन्यास घेण्याला मला अधिकारच पोंचत नाहीं. स्त्रीस्वभावाप्रमाणं ही विजयगनरी आणि तूं दोघीही अबला आहां. तेव्हां दोघींच्याहि सुखाची मला सारखीच काळजी वाहिली पाहिजे. विजयनगरी मीं वसविली म्हणून मी तिला माझी औरस मुलगी म्हणतों.

हंसे०:—( लडिवाळपणानें ) आणि बाबा मी !

माधः—तूं माझ्या स्नेह्याची मुलगी आणि माझी दत्तक मुलगी—

हंसे०:—( रागाचा आविर्भाव आणून ) अस्सं काय ?

माध०:—अग उतावळे पोरी, मला पुरतं बोलूं दे तरी. तूं माझी दत्तक मुलगी, परंतु मला तूं मळ्याहूनही अधिक आवडती आहेस.

हंसे०:—( गळ्याला मिठी मारून ) आहेंच मी लाडकी. पण बाबा, तुम्ही संन्यास घेणार हें ऐकून मला तुमचा असा राग आला कीं काय सांगूं.

माध०:—पण तो राग घालविण्याचा उपाय माझ्या मुठींत आहे. हंसेश्वरी, तूंच माझं बोलणं मूळपदावर आणलंस. तर पोरी, ( तिचे दोन्ही हात धरून ) आतां मोकळ्या मनानं सांग. तुझं मन कोणावर बसलेलं आहे ?

हंसे०:—( उत्तर न देतां मान खालीं घालून उभी राहते. )

माध० —तूं वाटेल तर उत्तर देऊं नकोस. पण मी तरी वेडा तुला प्रश्न विचारतों तो कशाला ? महाराज हरदेवराय यांचं तुझ्यावर प्रेम आहे, हें मी जाणून आहें. मग काय आपण महाराणी होणार ! बोला लवकर. आपला होकार पडल्याबरोबर लग्नाची सिद्धता आहे, आणि तसं झालं तर माझंहि–एका गरीब ब्राह्मणाचं–त्यांतल्या त्यांत कार्य होईल. आज पुष्कळ दिवस मी विचार करीत होतों कीं, माझ्या उत्कृष्ट स्वामी-

भक्तीला शोभेल अशी कांहीं तरी देणगी महाराजांना कोणती द्यावी! आणि हें रत्नच जर महाराजांना मला अर्पण करितां आलं, तर मला वाटतं माझ्या स्वामिभक्तीचं खरं चीज होईल.

हंसे०:—(माधवाचार्यांचे हात रागानें झिडकारून) आग लागो त्या तुमच्या स्वामिभक्तीला! इकडे मजवर इतकं प्रेम दाखवावयाचं, आणि इकडे राजभक्तीच्या यज्ञांत माझी आहुती द्यायची गोष्ट मोठ्या गंभीरपणानं बोलायची. जसं काय कोणी खरंच म्हणेल. पण जाऊं दे. (रडत) मीं तरी तुम्हांला नांव कां ठेवावं! माझं कपाळ फुटलं असेल तर तुम्ही म्हणतां तशी तुम्हांला तरी बुद्धी नाहीं होणार कशावरून? बाबा, दुःखावर डाग देणारं हें बोलणं तुम्हांला शोभतें का?

माध०:— (हंसेश्वरीला जवळ घेऊन) अग वेडे, अशी रागावतेस कां? तुला खुद्द महाराज पसंत नसतील तर सोडून दे. आपल्या राजावर आपली भक्ती असली तरी त्याचं दास्य कबूल करावयाचं नाहीं या ठिकाणीं तुझं आणि माझं जुळतं. मला एकवेळ वाटलं होतं कीं नगरची राणी होण्याचा मान नगरच्या कोणत्या कुमारिकेला हवासा वाटणार नाहीं! पण तुझ्या बाणेदारपणाची मी तारीफ करतों. जसा मी निस्पृह तशीच तूंहि निस्पृह आहेस, हेंहि तुझं माझं जुळलं. तर आतां सांग, राजदरबारच्या एखाद्या मानकऱ्यावर तुझं प्रेम बसलें आहे काय? दरबारांत सुंदर आणि शूर मानकरीही कांहीं थोडे नाहींत. त्यांतला एखादा पसंत केला असशील तर तेंही कांहीं वावगें नाहीं. तूं जशी निस्पृह तशीच स्वातंत्र्यप्रियही आहेस. गरिबाच्या घरीं दैन्यामुळें आणि राजवाडयांत ऐश्वर्याच्या अतिरेकामुळें पारतंत्र्य येतं. हीं दोन्ही टाकून एखाद्या सरदाराच्या घरीं ऐश्वर्याबरोबरच मिळणारं स्वातंत्र्य आपलेसं करायचं असा तुझा विचार असेल तर तोही फारच सूज्ञपणाचा आहे. पोरी, एवढ्या वयांत इतकं शहाणपण तुला कसं आलंग?

हंसे०:— (रागानें) पुरे पुरे मेलं माझ्या शहाणपणाचं वर्णन.

माध०:—आमचे भोळे महाराज जितके प्रेमी तितकेच परोपकारी असल्यामुळं, हंसेश्वरी, ते तुला आपला प्रियमित्र जो रुद्रदाम त्याच्याकरितां

मागणी घालणार आहेत, अशी मीं नुकतीच बातमी ऐकिली आहे. आणि खरोखरच महाराजांच्या कृपेमुळें रुद्रदाम थोडयाच दिवसांत प्रती राजपुत्र बनला आहे. मग कसं काय ? महाराजांच्या मागणीला हूं म्हणूं ?

हंसे०:—(रागानें) पुरे. पुरे. हेंच का तें तुमचं प्रेम ! बाबा, काळ-जांत कट्यारीसारखे घुसणारे हे असले शब्द तुमच्यानं बोलवतात तरी कसे ?

माध०:—बरं राहिलं. तुझा नवरा तूंच पसंत कर आणि ही पसंती झाली म्हणजे तुझं कन्यादान करायचं तेवढं काम माझं तें मी करायला केव्हांही तयार आहें. राजाहि नको आणि रुद्रदामही नको. तर–मग हां. पण मी विसरलों. दरबारी मानकऱ्यांपैकीं रुपानं तुला योग्य असा एक मानकरी आहे–वीरविजय तसाच रूपवान आहे यांत शंका नाहीं. (हंसेश्वरी लाजेनें मान खालीं घालते.) कां मीं म्हटलं त्याप्रमाणें तुझा राग घालविण्याचं साधन माझ्या मुठींत आहे हें खरं कीं नाहीं ? हंसेश्वरी तुझ्या लाजेवरून तुझा अभिप्राय मीं जाणला. पण–पण (सचिंत बसतो.)

हंसे०:—बाबा, इतका वेळ माझ्याशीं विनोद करितांना तुमच्या डोळ्यांत चमकणारं तेज एकदम कां लोपलं ? तुम्ही सचिंत कां झालां ?

माध०:—बाळे, वीरविजय तुझ्या रूपाला योग्य आहे यांत शंका नाहीं. पण तुझ्या गुणांना मात्र तो योग्य आहे कीं नाहीं याची मला जबर-दस्त शंका येते.

हंसे०:—बाबा, तुम्हांला सर्व विजयनगरी न्यायी म्हणते, तुम्हींही स्वतःला न्यायी म्हणवितां, असं असून––

माध:—वीरविजयाला मात्र मी अन्याय करितो असेंच कीं नाहीं तुझं म्हणणं ? मीं इतका वेळ तुझ्याशीं उगाच विनोद केला. तुझं प्रेम वीरविज-यावरच पूर्ण आहे हें मी जाणत नाहीं असें का तूं समजतेस ? वीरविजयही गुणी नाहीं असं नाहीं. देशभक्ती आणि शौर्य यांचा तो मूर्तिमंत पुतळा आहे. यवनांनीं आसपास आज जें काहूर उठविलं आहे, त्यांनीं विध्वंसाचं जें वादळ माजविलं आहे, त्याला तोंड देण्याला या सर्व विजयनगरच्या राज्यांत जर कोणी सरदार योग्य असेल, तर तो एक वीरविजय होय. पण

बाळे, ईश्वर दयाळू असूनही मनुष्याच्या सर्व गुणसंपन्नतेचा तो हेवाच करितो कीं काय असंहि क्षणभर म्हणतां येईल ! वीरविजय देखणा आहे, वीरविजय देशभक्त आहे. पण हंसेश्वरी, वीरविजय मनाचा थोडासा भोळा व चंचल आहे.

**हंसे०**:—पण बाबा, ओघालाच आलं म्हणून बोलतें हो, एका मनाला दुसऱ्या मनाचा आधार मिळाला तर ही उणीव भरून नाहीं का निघणार ?

**माध०**:—पण हंसेश्वरी एवढ्यानंच झालें नाहीं. शिवाय वीरविजय हा माझा वैरी आहे.

**हंसे०**:—(रडत) शिवशिव. बाबा, हें मी काय ऐकतें ? खचित तुमचा कांहीं तरी गैरसमज झाला आहे. तुमच्या सात्विक मनांत त्यांच्याविषयीं वैर असणं हें संभवतं तरी काय ?

**माध०**:—अग वेडे, माझा नव्हे तुझाच गैरसमज झाला. वीरविजयाचं मी वैर करीत नाहीं. पण दुर्दैवानं खरोखर कांहीं कारण नसतां त्याच्याच मनानं माझं वैर घेतलं आहे. आजपर्यंत दुष्ट मानकऱ्यांच्या चिथावणीवरून महाराजांनीं त्याचे जे धिंडवडे केले ते सर्व मींच केले अशी त्याची समजूत झाली आहे व त्यामुळें तो मला पाण्यांत पाहतो. हंसेश्वरी, असला हा तामसी जावई कन्यादानाचे वेळींच सासऱ्यावर हत्यार उपसावयाचा !

**हंसे०**:—पण हा त्यांचा गैरसमज मीं प्रयत्न केला तर दूर नाहीं का होणार ? पण तुम्हीं मात्र त्यांच्याविषयीं आपलें मन शुद्ध ठेविलं पाहिजे.

**माध**:—सर्वांत मोठी अडचण ही कीं, तूं वीरविजयाचा गैरसमज दूर करशील पण तो आज बंदिवासांत आहे—आणि जरी तो तेथून सुटून आला तरी तो राजाचा गुन्हेगार असल्यामुळें त्याचे प्राण सर्वस्वीं महाराजांचे आधीन राहाणार. वीरविजय हें एक रत्न आहे खरं, पण आजच्या घटकेला तें सर्पाच्या मस्तकावरच्या मण्यासारखं होऊन बसलं आहे, त्याला मी काय करूं ? एऱ्हवीं तुम्हां दोघांचे हात एकमेकांचे हातीं घालून हीं दोन रत्नें एका हारांत गुंफून ठेवण्याला मला किती बरं हर्ष होईल ?

(हनुमान घाई घाईनें प्रवेश करतो व माधवाचार्यांच्या कानाला लागतो.) अस्सें. अस्सें. एकूण वीरविजय विजयनगरांत येऊन पोंचला तर!

हंसे०:--(आनंदाश्चर्यानें) बाबा, बाबा, हें मी काय ऐकतें आहें? वीरविजय--

माध०:--होय, तसंच कांहीं आहे. पण चल. अग्निहोत्राच्या अग्नींत निश्याची आहुती देण्याची माझी वेळ झाली आहे. चल. तुला स्वस्थपणानं सर्व हकीगत सांगेन. पण माझ्या होमाची सर्व पूजासामग्री तूं सिद्ध केली आहेस काय?

हंसे०:--नाहीं, पण मी ती आतां एका क्षणांत करून देतें.

माध०:--(हंसत हंसेश्वरीच्या गालाला चिमटा घेत) हो हो. आतां सर्व तयारी करून देशील यांत काय आश्चर्य? [सर्व जातात.]

---

## प्रवेश सातवा.

**स्थळ**—अमात्यमाधवाचार्यांच्या आश्रमाचे बाहेरचें पटांगण.

[शामभट व मिलिंदाचार्य प्रवेश करितात.]

शाम०:—या! असे इकडून या!

मिलिं०:—मग काय अमात्य माधवाचार्यांची गांठ या वेळीं पडणार नाहीं तर!

शाम०:—नाहीं. या वेळीं गुरुमहाराज जपांत गुंतले आहेत. जप संपेतोंपर्यंत ते कुणालाहि भेटत नाहींत. मग तो भेटणारा राव असो कीं रंक असो.

मिलिं०:—अस्सं! ठीक आहे. त्यांचा जप संपेपर्यंत आपण या

ठिकाणींच बसूं. पण हो, बरी आठवण झाली. अमात्यमाधवाचार्यांचा राजवाडा पाहण्याची मला इच्छा आहे. दाखवाल का हिंडून मजबरोबर? वाडा सगळा पहायला फार लांब जावें लागेल नाहीं?

**शाम०:**—छे:, मुळींच नाहीं. आमच्या गुरुजींचा राजवाडा बसल्या बसल्याच पाहून होतो.

**मिलिं०:**—राजवाडाच नसेल पण त्यांचा राहण्याचा वाडा!

**शाम०:**—आपण बसलों आहों हाच त्यांचा राहण्याचा वाडा.

**मिलिं०:**—आणि राज्यकारभार करण्याचा त्यांचा दिवाणखाना?

**शाम०:**—आपण बसलों आहों याच ठिकाणीं राज्यकारभाराच्या कामीं ते भेटी घेतात. फार काय पण खुद्द महाराज हरदेवराय गुरुजींच्या दर्शनाला आले तरी त्यांचंहि स्वागत इथंच होत असतं.

**मिलिं०:**—(स्वगत) आश्चर्य आहे म्हणावयाचं? (उघड) पण काय हो, या होमशाळेशिवाय या ठिकाणीं कांहींच दिसत नाहीं!

**शाम०:**—वः या होमशाळेंतच त्यांचा बहुतेक वेळ जातो. प्रातः-काळपासून पलीकडच्या गढीच्या देवळाच्या गाभाऱ्यांत ते स्नानसंध्येला बसतात. दोनप्रहरीं या होमशाळेंत आले म्हणजे या शिलासनावर बसून नैवेद्य समर्पण करून थोडीं ताजीं कंदमुळें खाऊन वर या धाकट्या कमंडलू-भर दूध पितात. मग या पलीकडच्या वेत्रासनावर पडून थोडीशी विश्रांति घेतात. तिथून उठले म्हणजे मग या इकडच्या हरिणाजिनावर बसून एक प्रहरभर राज्यकारभाराचं काम पाहतात. मग अस्तमानाच्या आधीं चार घटकांपर्यंत या चौरंगापुढं बसून पोथी पुस्तक लिहिण्याचें काम चालतें. संध्याकाळीं गुरुजींचीं धूतवस्त्रं घेऊन मी नदीवर जातों. त्या ठिकाणीं स्नानसंध्या झाली म्हणजे मग देवळांत मंत्रपुष्प करून फिरून या होमशाळेंत येतात. रात्रींहि थोडा फलाहार व दुग्धप्राशन झालं म्हणजे अनेक प्रकारची मंडळी कारभारासंबंधानं राज्यांतल्या गुप्त बातम्या सांग-ण्याला येतात. आणि बारा घटका रात्र झाली म्हणजे त्या लोंकरीच्या आसनावर बसून नामस्मरण करून इथंच गुरुमहाज झोंपीं जातात.

**मिलिं०:**—काय तीन त्रिकाळ सहाहि ऋतु अशीच दिनचर्या?



शाम०:—गुरु महाराज स्वतः एका कवडीलाहि शिवत नाहींत. [ पृ० ३१

शाम०:—हो हो अशीच. एखाद वेळीं फारच पाऊस पडत असला किंवा थंडी पडली असली तर गुरुजींचं निजण्याचं हें आसन होमकुंडाच्या संन्निध निवाऱ्याच्या जागीं आम्हीं घालतों झालं.

मिलिं०:—गुरुमहाराजांचा आणखी परिवार काय काय आहे ?

शाम०:—परिवार ! गुरुमहाराजांना एक मुलगी आहे.

मिलिं०:—काय मुलगी ? आम्हीं तर असं ऐकलं आहे कीं, तुमचे गुरुमहाराज आजन्म ब्रह्मचारी आहेत म्हणून !

शाम:—आणि तेंच खरं आहे. गुरुमहाराजांची हंसेश्वरी या नांवाची एक दत्तक मुलगी आहे. तिच्यावर त्यांचं फार फार प्रेम आहे. हरदेवराय महाराजांनीं गुरुमहाराजांना थोडीशी नेमणूक करून दिली आहे व चार दोन नोकर माणसं सेवेला सोंपविलीं आहेत. पण त्यांचा उपयोग या मुलीकडंच होतो. गुरुमहाराज स्वतः एका कवडीलाहि शिवत नाहींत किंवा राजानं नेमलेल्या कोणा चाकरमाणसाची सेवा घेत नाहींत.

मिलिं०:—मग तुमच्या गुरुमहाराजांचं शिष्यमंडळ तरी केवढंसं आहे ?

शाम०:—आम्ही दोघेजणच काय ते त्यांचे शिष्य आहों. एक मी आणि दुसरा हनुमान या नांवाचा आहे.

मिलिं०:—पण यांपैकीं महाराजांसन्निध नेहमीं कोण असतो ?

शाम०:—मी, मीच असतों. गुरुमहाराजांच्या अगदीं जवळ राहणारा आणि आवडता असा शिष्य मीच आहें. त्याला कारणंहि तशींच महत्त्वाचीं आहेत.

मिलिं०:—( स्वगत ) हा शिष्य घमंडानंदन दिसतो. याला थोडासा खुलविला म्हणजे याचं उद्गार यंत्र आपोआप चालू होईल; ( उघड ) अहो, हें कांहीं सांगायला का लागतं ? गुरुमहाराजांचे आवडते शिष्य तुम्हीच असाल हें मी तुम्हांला पहातांच तुमच्या तोंडावरूनच ओळखलं होतें. तुमच्या तोंडावर तेजच तसं आहे. तुम्हांला फक्त जटाभार आणि दाढी एवढींच कायतीं कमी आहेत. नाहींतर गुरु कोणचा आणि शिष्य कोणचा हें ओळखण्याचीच मला पंचाईत पडली असती. बरं महत्त्वाचीं कारणें म्हणालां तीं कोणतीं ?

**शाम०:**—पहिलं कारण असं कीं, मी अस्सल ब्राह्मण आहें. हनुमान क्षत्रिय आहे. यामुळं गुरुमहाराजांजवळ अष्टौप्रहर माझंच सान्निध्य असतें. हनुमान गुरुमहाराजांची सेवा करतो पण ती दुरून दुरून सांगकामपणाची. गुरुजी सांगतील तेवढं काम तो करणार. गुरुजींचं त्याच्यावर प्रेम नाहीं आणि गुरुमहाराज त्याला फारसं काम सांगतहि नाहींत. गुरुजींच्या छाट्या धुणं मीच करतों. आसन मांडणं मीच करतों. पूजासाहित्य मीच मांडतों. होम करतांना शेकायची समिधा मींच हातीं देतो. जपाची माळ मीच ठेवतों. अग्निहोत्राची राख मीच सावडतों; फार काय गुरुमहाराजांच्या जपाचा हिशेबसुद्धां मीच ठेवतों. त्यांचं ब्रह्मकर्म, त्यांचं जपजाप्य, त्यांचं ग्रंथवाचन ग्रंथलेखन मीं नसलों तर अगदीं अडतं हो ? गुप्त कामांत सुद्धां माझाच सल्ला गुरुमहाराज घेतात ! माझाच घेतात.

**मिलिं०:**—वः मग काय तर आपण भेटल्यानं आपल्या गुरुमहाराजांचा आत्माच मला भेटला म्हणायचा. यामुळं मला त्यांची समक्ष गांठ घेतल्याशिवाय सुद्धां परत जायला कांहीं हरकत नाहीं.

**शाम०:**—हो, हो, कांहीं हरकत नाहीं.

**मिलिं०:**—( स्वगत ) हा मूर्ख हो म्हणायला लागला. ( उघड ) पण म्हटलें इतक्या दूर आल्यासारखा नुसता त्यांना भेटून जावं म्हणतों झालं. पहातां कां जाऊन गुरुमहाराजांचा जप समाप्त झालासा ?

**शाम०:**—ठीक आहे. आपण बसा. मलाच गेलं पाहिजे. सल्लामसलतीप्रमाणें अनुष्ठानाच्या गुप्त जागेंतहि माझ्याशिवाय दुसऱ्याचा प्रवेश होणं शक्य नाहीं. [ जातो ]

**मिलिं०:**—काय ? दक्षिणापथांतील आजकालच्या मुख्य हिंदीसाम्राज्याचा संस्थापक व आधारस्तंभ अमात्य माधवाचार्य आपला सगळा संसार याच टीचभर होमशाळेंत करतो काय ? सरस्वतीचा कंठमणि, अखिलविद्याभूषणमंडित सर्वज्ञ असा माधव या लहानशा आसनावर बसून एवढे प्रचंड ग्रंथ निर्माण करतो काय ? ( इकडे तिकडे हिंडून ) शाबास धन्य धन्य त्याच्या निस्पृहतेची, धन्य त्याच्या स्वहितपराङ्मुखतेची ! अहाहा ! या होमशाळेंत पहावं तिकडे नुसत्या वैराग्याचीच मूर्धाभिषि-

क्त चिन्हं दृष्टीस पडतात. हें भस्म, हे रुद्राक्ष, हीं वेत्रासनं, हे नारळाचे कमंडलु, हीं चंदनाचीं खोडं, ह्या फुलांच्या परड्या, याहून दुसरी वस्तु दिसेल तर शपथ ! कोणी लोभी चोरानं या सर्व चोरून जर विकायला मांडल्या तर कोणीहि संसारी मनुष्य याला एक कपर्दिकहि देणार नाहीं. पण संसारविन्मुख योग्याच्या परमार्थसाधनाचं तें अक्षयसाहित्य ! विजय-नगरीच्या संपत्तीची आणि वैभवाची ख्याती आजपर्यंत फक्त कानांनीं ऐकत होतों. पण या नगरांत प्रत्यक्ष प्रवेश केल्यापासून वस्तुस्थितीच्या मानानं ती ख्याति म्हणजे कांहींच नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. आणि नगरच्या लोकांची सुखोपभोगाची इच्छा आणि अभिलाषबुद्धि ही इथल्या श्रीमंतीबरोबरीनें आहे. काय हे वाडे, काय हीं उद्यानं, काय ही स्त्रीपुरुषांच्या अंगावर वस्त्रालंकारभूषणांची गर्दी ! ही प्रत्यक्ष अमरावतीच भूलोकावर अवतरली असावी किंवा कुबेरानं तरी सुरनगरीचा त्याग करून आपल्या सर्व भांडारासहवर्तमान या विजयनगरीचा आश्रय केला असावा असं वाटतं. पण या नगरच्या संपत्तीची माझी कल्पना एकपट चुकली तर तिच्या सामर्थ्याचा व ऐश्वर्याचा मध्य मेरू जो अमात्य माधवाचार्य त्याच्या-विषयींची माझी कल्पना दसपट चुकली. कारण या होमशाळेंत आल्या-पासून मला असं वाटूं लागलें आहे कीं, या सर्व लोकांच्या संसारलोलुपतेचं पाप त्यांच्या सन्निध राहणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा हा आर्य माध-वाचार्य आपल्या वैराग्यजलानं धुऊन टाकण्याला एकटा समर्थ आहे. अहाहा ! प्रत्यक्ष धर्मगुरु जे शंकराचार्य त्यांच्या संन्निध नित्य वास करणा-रालाहि त्याची कल्पना होणार नाहीं, असलं वैराग्य या होमशाळेंत पाहून मी धन्य आणि पुनीत झालों. खरोखर आचार्यपीठावर बसण्याला आणि गुरु-त्वाची परंपरा चालविण्याला आर्य माधवाचार्यांसारखा दुसरा मनुष्य मिळणं कठीण आहे. अमात्यमाधवाला शिष्यत्व अंगीकारण्याची विनंती करण्याची आमच्या स्वामींना जी बुद्धि झाली ती खचित खचित परमे-श्वराची व आद्य आचार्यांची प्रेरणाच म्हटली पाहिजे. [ जातो ].

---

## प्रवेश आठवा

**स्थळः**—अमात्यमाधवाचार्यांची होमशाळा.

[ माधवाचार्य जपाची माळ ओढीत बसला आहे.
जवळ हनुमान हात जोडून उभा आहे. ]

**माध०:**—हं, समजलों; समजलों. हनुमान, एकूण हे दुष्ट लोक मला सुखाचा सन्यास घेऊं देत नाहींत तर? तूं काय बातमी आणलीस सांग पाहूं? कृष्णराय आणि रुद्रदाम हे यवन सरदाराकडं संधान बांधून विजनगरचा घात करणार?

**हनु०:**—होय गुरुमहाराज, असे त्यांचे बेत चालले आहेत खरे.

**माध०:**—ठीक आहे. चालूं देत. जसे हेतु तशींच फळं हे दुष्ट लोक भोगतील. काय म्हणतोस? त्यांच्या तोंडचे शद्ब काय होते?

**हनु०:**—गुरुमहाराजांना अपमानकारक असे ते शब्द माझ्या तोंडून कसे निघतील!

**माध०:**—अरे तूं वेडा आहेस. ज्यांना राज्यसूत्रं हातीं ठेवावीं लागतात त्यांना दुष्ट लोकांकडून होणारी आपली निंदा ऐकून घेण्याला कानहि उघडे ठेवावे लागतात. पण तूं हें लक्षांत ठेव कीं अधिकाराचा अहंकार जसा मला शिवत नाहीं, तशीच लोकनिंदेची बाधाहि मला होणार नाहीं. ऐकण्याचा धर्म कानांचा आहे तो कानानीं केलाच पाहिजे. बोल बोल, त्या निर्बुद्ध कृष्णरायाच्या आणि घरबुडव्या रुद्रदामाच्या तोंडून काय काय मुक्ताफळं पडलीं तीं मला ऐकूं देच.

**हनु०:**—मी त्यांना बोलतांना ओझरतं ऐकलं. तो नीच रुद्रदाम म्हणाला— [ अडखळतो ]

**माध०:**—असा अडखळूं नको. ते शब्द कांहीं तुझे नाहींत.

**हनु०:**—तो म्हणाला, या नवीन कटाच्या सांपळ्यांत हा म्हातारा कोल्हा सांपडलाच पाहिजे.

**माध०:**—( हंसून ) कोल्हा जितका वृद्ध होतो तितकी त्याची धूर्त-

ताहि वाढते, हे या गाढवांना कसं कळणार ? ठीक आहे, सांपळा तर तयार होऊं द्या. त्यांत कोण सांपडतो हें मग पहातां येईल. या कटाचं आधिपत्य कुणाकडं आहे ?

हनु०:—कृष्णरायाकडं.

माध०:—वः तर मग हा बिनभांडवली व्यापारच म्हणावयाचा. पाण्यावर बांधलेली ती इमारतच म्हटली तरी चालेल. कृष्णदेवरायासारखा अकलेचा खंदक कटवाल्यांनीं आपला पुढारी केला म्हणजे त्यांत कितपत यश येणार हें विजयनगरींतलं एखादं पोरसुद्धां सांगूं शकेल !

हनु०:—कृष्णराय हा कटवाल्यांचा फक्त नांवाचा पुढारी दिसतो; या सर्व कारस्थानांची सूत्रं रुद्रदामाच्याच हातीं आहेत.

माध०:—त्याचा मीं केव्हांच तर्क करून ठेवला आहे. हरदेवराय-महाराजांच्या तोंडापुरतं गोड गोड बोलून त्यानं महाराजांची मर्जी अलीकडे थोडी संपादन केली आहे खरी. महाराजांनीं त्याच्यावर विश्वास टाकतांना थोडासा विचारच करायला पाहिजे होता. पण राजा आणि तो स्तुतिप्रिय नाहीं असं कधीं झालं आहे काय ?

हनु०:—शिवाय महाराजांकडून युवराज कृष्णरायाकरितां हंसेश्वरीताईंना लवकरच उघडपणें मागणी घालण्यांत येणार आहे अशी कुजबूज चाललेलीहि मीं ऐकली.

माध०:—आहे, तेंहि माझ्या लक्षांत आहे. आमचे महाराज पडले भोळे. आणि कृष्णरायानं तर या लग्नाच्या उठाठेवींत न पडावं हेंच चांगलं. त्याच्या गुणाला आतां एकच नवरी मला योग्य दिसते; ती गळफासाची दोरी; तिची तयारी आतां होऊं घातलीच आहे. अरेरे ! कृष्णराय आणि रुद्रदाम ह्यांच्यासारखे घातक नगरकंटक या विजयनगरींतून उपटून टाकीपर्यंत मला संन्यास कसा घेतां येईल ? असो; तूं जा, आणि मीं सांगितल्याप्रमाणं उद्यांचा दिवस फिरून त्या दोघांवर चांगली नजर ठेव. ( हनुमान नमस्कार करून जातो. ) ( गुप्त हेर प्रवेश करतो ) काय तूंहि कांहीं बातमी आणल्यासारखी दिसते. सांग पाहूं ?

गु० हे०:—काल मी गुप्त वेषानं हिंडत असतांना रात्रीं युवराजांच्या

बागेंतल्या मंडपांत चौघे इसम हळूच एकांतांत बोलत बसले होते तें मीं ऐकलं. एक म्हणाला, अमात्यमाधवाचार्यांचा घात करण्याचं उद्यां रात्रीचचं नक्की ठरलं आहे. दुसरा विचारतो, पण हें अवघड काम घडून कसं येणार ? त्यावर तिसऱ्यानं उत्तर केलं कीं, इतकं खोल पाण्यांत शिरण्याचं आपल्याला काय कारण ? युवराजांनीं आणि रुद्रदामांनीं सर्व व्यवस्था योजून ठेवली असेलच. तेव्हां चौथा म्हणाला, येऊन जाऊन आपलं काम रात्रीं दहाव्या घटकेला बागेच्या तोंडीं येऊन जमायचं तेवढं आपण करूं; मग पुढं काय करायचं तें आपोआप समजेलच.

**माध०**:—( स्वगत ) वः तर मग हे चांगलेच जाळ्यांत सांपडणार ! ठीक आहे. तूंहि जा. ( गुप्त हेर जातो. ) ( मीनाक्षी प्रवेश करिते ) मीनाक्षी ! तूंहि आलीस ?

**मीना०**:—होय गुरुमहाराज, मी आपल्या पायांपाशीं हजर आहे.

**माध०**:—बोल तुझी काय बातमी आहे ?

**मीना०**:—राजवाड्यांत कांहीं तरी गुप्त कट चालला असावा असं मला वाटतं. काल कृष्णदेवरायांना काय लहर लागली कुणाला ठाऊक ! त्यांनीं मला चार चार वेळां खोदून विचारलं कीं, मीनाक्षी, गुप्त बातमी मनांत ठेवणारा आणि जीव गेला तरी मनांतली गोष्ट बाहेर न बोलणारा एखादा शूर धाडसी आणि द्रव्यलोभी असा मनुष्य तुझ्या माहितीचा आहे काय ? असला तर त्याच्याकडं मला एक नाजूक काम सोपवायचं आहे. आणि तें त्यानं नीट पार पाडलं तर तुला आणि त्याला चांगलंच बक्षीस मिळेल.

**माध०**:—पहा पहा या युवराजांची अक्कल. असली महत्त्वाची गोष्ट तुझ्यासारख्या स्त्रीजवळ उघड करून बोलायची ! आणि हा म्हणे कटाचा पुढारी ! बरं मीनाक्षी त्यावर तूं काय म्हणालीस !

**मीना०**:—मी म्हणालें माझ्या भावाच्या अंगांत हे सर्व गुण आहेत.

**माध०**:—मग तो काय म्हणाला ?

**मीना०**:—तेव्हां मग असं ठरलं कीं, उद्यां रात्रीं दहा घटकांच्या



माधव०:—तुझ्याकरितां मी एक उत्तम भाऊ शोधून काढतों. [ पृ० ३७

अमलांत माझ्या भावानं चिलखत घालून जामानिमा करून हत्यारबंद असा घोड्यावर स्वार होऊन युवराजांच्या बागेच्या दाराशीं रहावं.

माध०:—आणि त्याजजवळ दिलेला मसलतीचा गुप्त लखोटा यवन सरदाराकडं पोहोंचवावा असंच कीं नाहीं ?

मीना०:—माझा तर्क असाच आहे.

माध०:—तुझा तर्क बरोबर आहे. पण मीनाक्षी असला हा घातक भयंकर लखोटा तुझा भाऊ शत्रूकडं नेणार ? या कटांत तो सामील होणार ?

मीना०:—गुरुमहाराज, त्याची मला मुळींच काळजी नाहीं.

माध०:—( आश्चर्यानं ) कां ?

मीना०—( हंसून ) मला जर भाऊच नाहीं तर तो असल्या कामावर जाणार कसा ?

माध०:—पण तुझा भाऊ ही कामगिरी करील असं तूं युवराज कृष्णरायाला सांगितलं आहेस.

मीना०:—( हंसून ) होय गुरुमहाराज, पण—

माध०:–( हंसून ) नको, अधिक सांगण्याचं कारण नाहीं. मीं सर्व ओळखलं. शाबास ! मीनाक्षी शाबास ! जिला स्वत:चा भाऊ नाहीं तिला अर्थात् जगांतला वाटेल तो मनुष्य भाऊच आहे. ठीक आहे. तुझ्याकरितां मी एक उत्तम भाऊ शोधून काढतों. तर मग हें ठरलं ? तुझ्याबरोबर ज्याला मी पाठवणार त्याला तू आपला भाऊ करणार ! मीनाक्षी, खुद्द महाराजांना ह्या विजयनगरचं जें हित आज कळत नाहीं तें तुझ्यासारख्या स्त्रीला कळतं ही केवढी गोष्ट ! ठीक आहे. मीनाक्षी तू जा आतां. [ मीनाक्षी नमस्कार करून जाते. ] [ सेवक प्रवेश करतो. ]

सेव०:—( मुजरा करून ) बाहेर सेनापतींची स्वारी आली आहे.

माध०:—जा लवकर घेऊन ये त्यांना आंत. ( सेवक जातो. ) आमचे सेनापतीसाहेब आज अशा अवेळीं इकडं कसे ! मला वाटतं राणीसरकाराविरुद्ध कांहीं तक्रार असेल त्यांची. पण हल्लीं राणीसाहेबांविरुद्ध तक्रार नाहीं कुणाची ? आमच्या महाराजांना इतक्या उतारवयांत लग्न करण्याची बुद्धि झाली तेव्हांच या राज्याला अपशकून झाला. या घातक

दुर्बुद्धीरूपी विषवल्लीला आतां येतील तितकीं फळं थोडींच ! नव्या राणीसाहेब कडकडीत रेशमी वस्त्र नेसून दिमाखानं इकडून तिकडं फिरूं लागल्या म्हणजे, त्यांच्या त्या वस्त्राचा आवाज ऐकून मला तर ' दिवसाचं आयुष्य संपलं, रात्र आली संभाळा, ' असं सुचिवणारीं घुबडाचीं पंखंच फडफडताहेत असा भास होतो.

[ सेनापति प्रवेश करतो. ]

**सेना०:**—( तरवार काढून पुढें ठेवून व हातातर हात मारून ) अमात्यराज, बोला या तलवारीचं मी आतां काय करूं ?

**माध०:**—सेनापति, तुमच्या आवेशावरून तिचा अपराध फार मोठा दिसतो. बोला तिनं तुमचा असा कोणता अपराध केला ?

**सेना०:**—काय ? अपराध ! तिच्या अपराधाला सीमाच उरली नाहीं. यापुढं कमरेला न लटकावतां तिला गुडघ्यावर मोडून दोन तुकडे करून दूर फेंकून द्यावी असं राहून राहून वाटतं.

**माध०:**—सेनापति, ज्या तलवारीनं वारंगळच्या लढाईत तुम्हीं शेंकडों शत्रूंचे बळी घेतले ती तरवार हीच ना ?

**सेना०:**—होय आचार्य.

**माध०:**—अरण्यामध्यें शिकारीला गेलां असतां नित्य जिनं तुमचे स्वत:चे प्राण रक्षण केले ती तलवार हीच ना ?

**सेना०:**—होय अमात्यराज.

**माध०:**—आणि अनागोंदीच्या वेढ्यांत आपले हरदेवरायमहाराज यांचा जीव बचावून तुम्हाला स्वामिभक्तीची अखंड जोड जिनं मिळवून दिली तीहि तलवार हीच ना ?

**सेना०:**—होय, तीच ही तलवार; आणि म्हणूनच तिचे तुकडे करण्यापेक्षां तिला अधिक कडक शिक्षा मला करतां येत नाहीं.

**माध०:**—सेनापति, तुम्ही आपलं औदार्य माझ्या निदर्शनाला आणलंत खरं; पण तुमच्या तलवारीचा अपराध काय तो अद्यापी सांगितला नाहींत.

**सेना:**—शिव, शिव. तिच्या अपराधाचं वर्णन करण्यापेक्षां या जिव्हेचे तुकडे तुकडे होतील तर फार बरं !

माध०:—बोला, बोला, बिचाऱ्या निर्जीव तलवारीवर इतके रागावूं नका.

सेना०:—ऐका अमात्यराज. काल मी हरदेवराय महाराजांच्या दर्शनाला गेलों असतां युवराजपदावर कुणाला बसवावं असा राणीसाहेबांनीं मला हंसत हंसत प्रश्न केला.

माध०:—अस्सं ! पण राणीसाहेबांना अलीकडे ज्या त्या दरबारी मनुष्याला हाच प्रश्न हंसत हंसत विचारावासा वाटतो. बरं, त्यावर तुम्ही काय उत्तर दिलंत. ?

सेना०:—प्रथम मीं कांहींच उत्तर दिलं नाहीं.

माध०:—कां बरं ? मनांत आलं तेंच सांगून टाकायचं होतंत कीं नाहीं ?

सेना०:—तसं केल्यानं राणीसाहेबांना बरं वाटणार नाहीं असं दिसलं. त्यांची अदबी रहावी म्हणून प्रथम मी कांहींच बोललों नाहीं.

माध०:—तुम्हा सेनापति लोकांना एक घाव आणि दोन तुकडे करण्याची संवय असते असं म्हणतात ? राणीसाहेबांना तोंडातोंडीं खडखडीत उत्तर न देऊन तुम्ही आपल्या ब्रीदाला बट्टाच लावलात म्हणायचा ! पण खचित राणीसाहेबांनीं तुम्हाला इतक्यावर कांहीं सोडलं नसेल.

सेना०:—नाहीं. 'तुम्हाला तो राजद्रोही वीरविजयच युवराज व्हायला पाहिजे असेल म्हणून तुम्ही बोलत नाहीं' असा त्यांनीं मला टोला दिला.

माध०:—आणि या अशा स्पष्ट प्रश्नाला तुम्ही बळी पडला वाटतं ?

सेना०:—नाहीं अमात्यराज, राणीसाहेबांनीं असल्या प्रश्नानं माझा हेतु अंत:करणाच्या किल्ल्यांतून बाहेर मोकळ्या मैदानावर भुलवून आणण्याचा प्रयत्न केला त्यालाहि मी हार गेलों नाहीं.

माध०:—सेनापति, शिपाईगिरी सोडून तुम्ही असे मुत्सद्दी कधींपासून बनलां ?

सेना०:—पण उपयोग काय ? राणीसाहेबांनीं माझा पिच्छा येवढ्यानंहि सोडला नाहीं.

माध०:—काय ? तर मग त्यांनीं आपला वेडपा भाऊ कृष्णराय याला युवराज करण्याचा सवाल सुद्धां तुम्हाला उघडाउघडी टाकला म्हणतां ?

**सेना०**:—होय अमात्यराज. आणि मग मात्र मला आपली नापसंती स्पष्ट स्पष्ट शब्दांनीं सांगणं भाग पडलं!

**माध०**:—अस्सं! एकूण तुमचं मनोगत अखेर ओंठाच्या तटबंदींतून बाहेर आणून राणीसाहेबांनीं आपलं नैपुण्य अधिक दाखवलं तर!

**सेना०**:—आणि या विजयसंपादनाचा उत्सव करण्याकरतांच कीं काय, उन्मत्तपणानं त्यांनीं माझ्या राजभक्तीला धिक्कारलं, आणि राजमहालांतून जळफळ करीत जातां जातां माझ्या तलवारीला त्यांनीं लाथ मारली.

**माध०**:—मग यांत राणीसाहेबांनीं घोर अपराध केला, तुमच्या तलवारीनं कसा?

**सेना०**:—राणीसाहेबांची लाथ मुकाट्यानं सोसून! अरेरे या तलवारीनं माझ्या हाताचा आश्रय करून त्या मस्तवाल पायांची मस्ती जिथल्यातिथंच जिरवायला पाहिजे होती. राणी झाली म्हणून काय झालं? माझ्या राजभक्तीची आणि माझ्या तलवारीची अब्रू घेईल कीं काय? राणीसाहेबांनीं खुद्द महाराजांचा वाटेल तर हवातसा अपमान करावा. आणि अशा म्हातारपणीं संसारसुखाची इच्छा त्या प्रदीप्त ठेवतात म्हणून महाराजांनीं वाटेल तर तो सोसावा. मी गादीचा नोकर झालों म्हणून काय झालं? माझ्या तलवारीला स्त्रीची लाथ? ( तलवार उचलून घेऊन ) ही पहा, अमात्यराज! विजयनगरच्या गादीच्या सेवेंत झिजलेली पण आजवर असा अपमान न पावलेली ही तलवार तुमच्यादेखत मोडून टाकतों!

**माध०**:—हां, हां, सेनापती असा अन्याय करूं नका. तुमच्या तरवारीला वाचा फुटेल तर तीहि तुम्हाला हेंच सांगेल.

**सेना०**:—लाथ खाल्लेल्या तलवारीचा आतां मला विटाळहि सोसणार नाहीं.

**माध०**:—नाहीं, सेनापति, तिची तुम्हाला अद्यापि फार गरज आहे. राणीसाहेबांच्या लाथेनं तिला लागलेला डाग लवकरच राणीसाहेबांचे अश्रू धुऊन टाकतील. आज दरबारांत फंदफितूर सुरू आहेत. न जाणो परचक्रहि कदाचित् नगरावर येईल. म्हणून तुमच्या तलवारीला अद्यापि स्वामीकार्य करायचं आहे. तिला टाकून दिल्यावर तुम्ही राजकार्य कसं कराल?

सेना०:—पण अमात्यराज, यापुढं या दरबारांत राहून राजकार्य करण्याला मला उत्साहच वाटत नाहीं. राणीसाहेबांनीं दरबारांत अब्रू म्हणून कुणाचींच ठेवली नाहीं. अपमानाची खालून वरून आंच लागलेल्या राज-सेवेच्या तापलेल्या तव्यावर उभा राहणारा कोणता स्वाभिमानी सेवक राजनिष्ठेचा पण जिंकील ? पण आपणच सांगतां म्हणून आणखी कांहीं दिवस मी दम धरतों. [ जातो ]

माध०:—सेनापतींची तरवार मीं सेनापतींच्या हातीं राहूं दिली. पण वास्तविक मला तिच्या मदतीची मुळींच अपेक्षा नाहीं. हनुमानानं तो राजद्रोही लखोटा माझ्या हातीं आणून दिला म्हणजे बस झालं. अधम उपद्व्यापी मनुष्याचा हात हाच त्याला यमपाश होतो. [जातो].

## अंक पहिला समाप्त.

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

**स्थळ**—कृष्णदेवरायाचा महाल.

[ मीनाक्षी प्रवेश करिते. ]

**मीना०:**—(हंसून) मी दरबारची कलावंतीण नव्हे का? मग ठीकच आहे. राजांची गादी जशी वंशपरंपरेनं जाते तशीच आम्हां दरबारी कलावंतिणींची! माझ्या ताईच्या गादीचे धनी हरदेवरायमहाराज होते. आणि आतां माझ्या गादीचे धनी कोण होणार? जे कोणी युवराजपदावर बसतील ते! मग कृष्णदेवराय बसो नाहीं तर रुद्रदाम बसो. महाराज युवराजपद कुणालाहि देवोत, मला आपली नुमती हातांत माळ घेऊन बसलं पाहिजे; जो कोणी युवराज म्हणून मान पुढं करील त्याच्या गळ्यांत ती घातली पाहिजे; प्रेमानं त्याच्याकडं पाहून हंसलं पाहिजे; आणि त्याच्या कामकुंडांत आपल्या देहाचा बळी दिला पाहिजे! व: खासा न्याय! पण प्रेम असल्या न्यायाला थोडीच भीक घालणार! आणि म्हणूनच युवराजाची नेमणूक जशी सरकारी तसंच आमचं प्रेमहि सरकारी! पण हें सरकारी प्रेमसुद्धां मी भावी युवराजाला लाभू द्यायची नाहीं. देहाची विक्री आणि विटंबना करण्यापेक्षां तो खर्चीं घालून मी या राजकुळाला शहाणपण तरी शिकवीन. ( कंबरेचा खंजीर काढून ) दरबारी कलावंतिणी आजवर ओंठावरचे विड्याच्या रसाचे ओघळ टिपायला कंबरेला रेशमी हातरुमाल लावून राजवाड्यांत गेल्या. ही दरबारी कलावंतीण म्हणावं ( आपल्या छातीला हात लावून ) कंबरेला कट्यार लावून जात असते, आणि वेळ पडली तर अपमान करणाऱ्या कुणाहि दरबारी पुरुषाच्या रक्ताचे पाट वाहावायला मागं घेणार नाहीं. अरे पण हें कोण येत आहे इकडं? कृष्ण-

देवराय वाटतं ? भावी युवराज ? अहाहा काय पण ध्यान आहे ! नव्या घराला दृष्ट लागूं नये म्हणून चिंध्यांचं भावलं बांधतात तसं विजयनगरच्या राजवंशाला हें कुलक्षण पोर ! आणि हे माझे भावी यजमान ! पण याची जरा गम्मत करून याच्याकडनं कटाची बातमी कांहीं लागते का पाहूं. [ पुढं होऊन मुजरा करते.]

**कृष्ण०:**—कोण तें ? मीनाक्षी !

**मीना०:**—होय महाराज, आपल्याच पायाची दासी !

**कृष्ण०:**—आणि इकडं कुणीकडं तूं या वेळीं ?

**मीना०:**—आपल्याच दर्शनाला महाराज ! आपल्या दर्शनाला अवेळ तीच वेळ. आपलं दर्शन झालं म्हणजे तिथपर्यंतचा दिवस बरा गेला असं होतं. आपण आतां लवकरच युवराज होणार ! आणि माझं दैव उदयाला येणार !

**कृष्ण०:**—( मिशांना पीळ भरून हंसून ) मीनाक्षी, ही गुप्तबातमी तुलासुद्धां कळली अं ?

**मीना०:**—महाराज, असली बातमी गुप्त कशी राहणार ! सगळ्या विजयनगरच्या तोंडांत झाली आहे ( बाजूला ) मेल्या तुझी निंदा. पण महाराज दुसरीहि एक बातमी मला समजली आहे.

**कृष्ण०:**—ती कोणती ?

**मीना०:**—मलिक काफर–मुसलमान सेनापति–तो येणार आहे म्हणे आपल्या पायाशीं लोटांगणं घालीत ! आपलं शौर्य आणि पराक्रम ऐकून तो अगदीं भिऊन गेला आहे म्हणतात. आपण म्हणे रागावून त्याला खूप चरचरीत पत्र पाठविलं आहे.

**कृष्ण०:**—होय ग मीनाक्षी, नाहीं होय म्हणतां म्हणतां घेतलीन रुद्रदामानं माझी त्याच्यावर सही. मींहि मग म्हटलं, काय लेका सहीच कीं नाहीं–घे एक सोडून दहा.

**मीना०:**—हो आपल्याला काय ? वेळ आली तर मीं सही केलीच नाहीं म्हणून मोकळे व्हा. आणि केली असं झालं तरी काय ? आपल्याला कोण काय म्हणणार ? आपली बहीणच राणी मग काय ? आपण भावी युवराज !

उद्यां विजयनगरचं राज्य बुडवायचं आपण मनांत आणलं तरी तसं करायला आपणाला अधिकारच आहे.

**कृष्ण०:**—( मिशा पिळून ) हो, कारण मी राणीचा भाऊ आहें.

**मीना०:**—हो, आणि वाटेल तर राज्य बुडवायला खुद्द राणीसाहेबांना कुठं नाहीं अधिकार ? पण राणीसाहेबच आल्या वाटतं.

[ राणी व हंसेश्वरी येतात. ]

**राणी:**—( कृष्णदेवास ) कां बाळा भाऊराया, काय चाललं आहे ? आणि ही मीनाक्षी आहेच जवळ.

**मीना०:**—राणीसाहेब, मी युवराजांच्या जवळच असणार. दूर कशी होईन !

**राणी:**—हंसेश्वरी, पाहिलंस का माझा भाऊराया कसा प्रेमळ स्वभावाचा आहे तो ? त्याला बायकांशिवाय एक क्षणभर सुद्धां चैन पडत नाहीं. उद्यां तुझं आणि त्याचं लग्न होऊं दे. म्हणजे मग पहा तुझ्यावर तो कित्ती कित्ती प्रेम आणि तुझं कसं कौतुक करील तें !

**हंसे०:**—( रागानें )राणीसाहेब असल्या गोष्टी बोलायला कां आपण मला आणली इकडं ! असल्या बोलण्यांनीं माझं कपाळ दुखायचं थांबेल असं का वाटलं आपल्याला ?

**राणी:**—यांत कपाळ दुखायला काय ग झालं ?

**मीना०:**—काय तरी बाई. माझं कपाळ दुखत होतं तें भावी युवराजांच्या बरोबर दोन शब्द बोलायला मिळाल्यानं थांबलं. आणि यांचं कपाळ दुखूं लागलं ! डोकं दुखण्यावर मी तर तें एक औषध म्हणून ठरविलं आहे. ( स्वगत ) कारण युवराजांना पाहून खूप हंसायला लोटतं.

**राणी:**—बाळ कृष्णदेव, तूं तरी या हंसेश्वरीची समजूत कर. ती तुझी उद्यां बायको व्हायची—

**मीना०:**—बायकोचं कपाळ दुखूं नये म्हणून सरकारांना आधींपासून जपायला पाहिजे. कपाळशूळाचं दुखणं फार वाईट असतं बर कां !

**राणी:**—काय ग मीनाक्षी, बाळ कृष्णदेवराय आणि ही हंसेश्वरी यांचा जोडा कसा काय शोभतोसं तुला वाटतं !



**राणीः**—यांत कपाळ दुखायला काय ग झालं ?　　[ पृ० ४४

मीना०:—( स्वगत ) गोष्ट लवकर निकराला आणली म्हणजे बिचाऱ्या हंसेश्वरीची सुटका होईल या संकटांतन. ( उघड ) सरकार नवराबायकोनां जोडून पाहिल्याशिवाय जोडा कसा दिसतो तें काय सांगावं कुणी ?

राणी:—( आनंदानें ) हां बरं सुचविलंस मीनाक्षी ! आपण जोडून पाहूंच यांना ! बाळ कृष्णदेव ये इकडं असा. तुला आणि हंसेश्वरीला जोडून पाहूं या बरं कशीं शोभतां तुम्हीं एकमेकांना तीं !

हंसे०:—( रागानें ) हें काय हो राणीसाहेब ! ही काय मांडली आहे थट्टा तुम्ही ? मी अशीच जातें महाराजांकडं आणि सांगतें त्यांना सारं !

[ फणकाऱ्यानं निघून जाते. ]

राणी:—पाहिलंस कां मीनाक्षी ? ही कशी तऱ्हेवाईक मुलगी आहे ता !

कृष्ण०:—अक्का ग मी जाऊन तिला धरून आणूं कां आत्तां—हो, मला काय ? आणि ती माझी बायको व्हायची नां ? झालं तर माझी बायको मीं ओढून आणली तर मला कोण काय म्हणणार आहे ?

[ जाऊं लागतो ].

मीना०:—( स्वगत ) आपण आतां मध्यें पडावं हेंच बरं. नाहीं तर बिचाऱ्या हंसेश्वरीवर प्रसंग गुदरायचा ! ( उघड ) सरकारांना कशाला तसदी घ्यायला पाहिजे. मी जातें आणि आत्तां समजूत करून आणते त्यांची ! माझं तें कामच आहे ! [ जाते ].

राणी:—बाळ कृष्णदेव, रुद्रदामानं तुला खलिता दाखविलान कां ? त्यांत भलतंसलतं कांहीं लिहिलंन नाहीं नां ?

कृष्ण०:—दाखविलान अक्का. पण कागद वाचून सही करणं हें युवराजाला शोभत नाहीं. म्हणून मीं तो न वाचतांच सही केली. अग, मी जर कागद वाचून सही करूं लागलों तर मला उद्यां सारा दिवस तरी पुरेल का सह्या करायला ? म्हणून कागद पुढं आला की सही करायची असं मीं ठरवून टाकलं आहे.

राणी:—अरे पण सही करायच्या आधीं कागद वाचून पहावा.

**कृष्ण०:**—अहाहा! तें नको मला शिकवूं तूं. मी काय कारकून आहे वाटतं कागद सबंध वाचायला? मी युवराज आहे—

[ मिशांना पीळ भरीत जातो ].

**राणी०:**—रुद्रदामाला बोलावून आणून खलित्याचं काय तें विचारलंच पाहिजे! नाहीं तर घोंटाळा होऊन राहायचा एखादा. [ जातं ].

---

## प्रवेश दुसरा

**स्थळ:**—राजवाडा.

( हंसेश्वरी आणि मीनाक्षी प्रवेश करितात. )

**मीना०:**—ताईसाहेब पुरे करा हें रडणं–

**हंसे०:**—मीनाक्षी! मीं सुखानं थोडीच रडतें आहे.

**मीना०:**—पण आपणाला इतकं दुःख काय वाटतं तें तरी मन मोकळं करून सांगा! मीं तुमचं दुःख थोडंच दूर करणार! पण मन मोकळं केल्यानं कुणाचंहि दुःख हलकं होतं.

**हंसे०:**—मीं काय बोलूं? तूं आत्तां इतक्यांतच पाहिलंस ना? राणीसाहेबांनीं काय काय केलं तें?

**मीना०:**—पाहिलं. पण त्याचं इतकं वाईट तें वाटून घ्यायला कशाला पाहिजे? राणीसाहेब झाल्या तरी त्या कोणच्या झाडाचा पाला? मगाशीं त्यांना झिडकारलंत तसंच फिरून एक दोन वेळां झाडून टाका म्हणजे त्या फिरून नाहीं जाणार तुमच्या वाटेला!

**हंसे०:**—अपमान झाला म्हणजे राग यायला कुणाला सांगायला कां लागतं? पण मीनाक्षी, राणीसाहेबांनीं जर माझा असाच दुस्वास आरंभला तर माझं रक्षण कोण ग करील? या अवघ्या राजवाड्यांत माझा पाठीराखेपणा करणारा कुणीच नाहीं!

**मीना०:**—इतकंच कां? मला वाटलं कीं इतकं डोळ्याला पाणी

आणल्यासारखं मोठंच कांहीं तरी दुःख असेल! यांत हो काय? ताई-साहेब हत्तीवर अंबारींत बसणारानं उन्हांत चालणाऱ्या घोडेस्वाराकडं पाहावं, आणि घोडेस्वारानं उन्हांत पायीं चालणाराकडं पाहावं.

हंसे०—म्हणजे काय होतं?

मीना०ः—दुःखाचं सुख होतं! आणखी दुसरं काय व्हायचं?

हंसे०ः—पण हा दाखला मला कसा लागतो?

मीना०ः—सांगतें कसा तो! तुम्हांला आईबाप नाहीं याचं दुःख वाटतं ना?

हंसे०ः—होय मीनाक्षी. ती सावली ज्याला नाहीं तो जगाच्या प्रखर उन्हांत माझ्यासारखाच होरपाळायचा!

मीना०ः—पण ताईसाहेब! पोरक्यापोराची काळजी ईश्वराला असते. त्यानं तुम्हांला आईबापाचं सुख दिलं नाहीं हें खरं, पण इकडं खुद्द हरदेव-राय महाराजांच्या ओट्यांत त्यानं तुम्हांला घातलं. माझ्याकडं पहा बरं! मला रक्षण करणारं कोणी तरी आहे का?

हंसे०ः—मीनाक्षी पूर्वीं महाराज माझ्यावर ममता करीत होते. पण त्यांनीं हें लग्न केल्या पासनं सगळंच चक्र फिरलं आहे.

मीना०ः—होय ताईसाहेब, पण इतके दिवसांचा प्रेमाचा झरा अगदींच आटणार नाहीं. शिवाय ताईसाहेब, आपण अमात्यराजांना अगदींच विसरलासं दिसतं. ते असतांना आपल्या केंसालाहि कुणाकडून धक्का लागणार नाहीं. हें खरं ना?

हंसे०ः—होय मीनाक्षी! अमात्यराज असते तर मला सगळ्या जगाचीहि भीति नव्हती. पण तूंच मला सांगितलीस ना बातमी कीं बाबा संन्यास घेऊन जाणार म्हणून! मीनाक्षी, बाबा विजयनगर सोडून गेले म्हणजे माझं कसं ग होईल?

मीना०ः—अमात्यराज वेडेच असतील तुम्हांला अशा टाकून जायला!

हंसे०ः—तर ते काय करतील माझं?

मीना०ः—( हसून ) सांगूंच का? रागावणार नाहीं ना? ते तुमचं लग्न करतील आणि मग जातील!

**हंसे०**:—मीनाक्षी, तुरुंगांत फांशी द्यायच्या जागा असतात असं सांगतात. पण तुरुंगांत लग्नमंडप घालतात असं मीं ऐकलेलं नाहीं! ( दुःखानें ) मीनाक्षी—तूं माझ्या दुःखावर डाग दिला नाहींस—पण तो बसला खरा. मला नको होती ती आठवण झाली!

**मीना०**:—पण मीं ती आठवण मुद्दामच करून दिली! वीरविजयांचा तुरुंगवास संपला असंच समजा ना!

**हंसे०**:—( आश्चर्यानें ) मीनाक्षी, तूं कशावरून म्हणतीस हें?

**मीना०**:—मीं वाटेल त्यावरनं म्हणतें, तुम्हांला काय त्याचं! ( स्वगत ) अमात्यराजांचं पत्र घेऊन हनुमान वारंगळच्या तुरुंगांत जाऊन आले ही बातमी फार गुप्त ठेवायची आहे. ती मीं यांना झालं तरी कशी सांगूं? ( उघड ) मला आपलं कोण कां सांगे ना? पण वीरविजयांचा तुरुंगवास लवकरच संपणार ही आपली तुम्ही पदराला गांठ मारून ठेवा कशी! ( हंसून ) वीरविजयांच्या आणि तुमच्या शेल्याच्या पदरांना गांठ मारायची वेळ लवकरच येईल तेव्हां मात्र आत्तांच्या गांठीची आठवण ठेवा म्हणजे झालं!—पण मी सांगायला विसरलेंच. अमात्यराजांनीं फिरून नुकतीच आठवण केली होती तुमची.

**हंसे०**:—आणि त्यांनीं आठवण केली नसती तरी मी त्यांच्याकडं जाणारच होतें. राजवाड्यांत राणीसाहेबांची आतां मला भीति वाटूं लागली आहे. चल मीनाक्षी येत असलीस तर—तूं नि मीं मिळूनच जाऊं आश्रमाकडं!

**मीना०**:—काय ताईसाहेब तुम्ही आणि मी मिळून?

**हंसे०**:—कां बरं?

**मीना०**:—लोक काय म्हणतील!

**हंसे०**:—काय म्हणणार?

**मीना०**:—काय म्हणणार त्याचा उच्चार तरी कशाला हवा! ताईसाहेब मी कलावंतीण ना? मीं तुमच्याबरोबर जाऊन तुमच्या अब्रूच्या बावनकशी सोन्याला लोकनिंदेचा डाक कशाला घालूं? या तुमच्या परीटघडीवर माझा शाईचा डाग कशाला? जा तुम्हीच एकट्या!

हंसे०:—मीनाक्षी तूं कलावंतीण असशील. पण तुला नांवं ठेवणारांच्या जिव्हेला किडेच पडतील! या अवघ्या राजवाड्यांत आचरणानं तुझ्या इतक्या पवित्र अशा कुलीन स्त्रिया किती सांपडतील? निदान नव्या राणीसाहेब राजवाड्यांत आल्यापासनं असला प्रश्न विचारायला मुळींच हरकत राहिली नाहीं. मीनाक्षी, आईबाप नसल्यानं तूं आणि मी समदु:खी नाहीं का? म्हणून तूं आणि मी बहिणीच! अमात्यमाधवाचार्य तुझ्यावर मुलीप्रमाणं ममता करतात तशीच माझ्यावर म्हणूनहि तूं आणि मी बहिणीच. चल मीनाक्षी तुझ्याकरितां मला निंदा सोसावी लागली तर मला आनंदच होईल! [ मीनाक्षीच्या हाताला धरून घेऊन जाते. ]

---

## प्रवेश तिसरा

**स्थळ—अमात्यमाधवाचार्यांची होमशाळा.**

[ माधवाचार्य प्रवेश करितो. ]

माध०:—मध्यरात्रीच्या अशा या शांत वेळीं भजन पूजन केल्यावरहि आज चित्त व्हावं तसं शांत कां बरं होत नाहीं? अनेक संशय मनांत येऊन ते मधून मधून मनावर अंधकार कां पाडतात कळत नाहीं. (हंसून) पण मी तरी कां ह्मणून काय विचारतों? राजकारणाची उपाधी मागं लावून घेतल्यावर त्याच्या अंगभूत असलेलीं संकटं आणि दु:ख येऊं नये ह्मणून कसं चालणार? वास्तविक मी मुख्य राजमंत्र्याचं काम करित असतांहि आपले दिवस केवळ सन्याशाप्रमाणेंच काढले कीं नाहीं? आणि संसाराची जी अणुमात्र उपाधी उरली तीहि तोडून टाकून ब्रह्मानंदाच्या प्रवाहावर आपले प्राण एखाद्या नावेप्रमाणें सोडून देण्याला मी केव्हांहि तयार असल्यामुळें मरणाची भीति मला वाटत नाहीं. पण राजभक्ति आणि देशभक्ति यांचा पक्षपात अजून सोडवत नाहीं. ब्रह्मानंदांत निमग्न

झालेलं मन राजभक्ति फिरून संसारांत खेचून ओढून आणते. हे अविद्ये महामाये, तूं धन्य आहेस. (हनुमान घाईघाईनें प्रवेश करतो) हा पहा हनुमान आला. त्याला पाहतांच मी फिरून संसारी बनलों. राजकारणांतील कारस्थानांचा आनंद ब्रह्मानंदाहून गोड वाटण्याचा क्षण फिरून आला. (उभा राहून हात पुढं करतो) आण, हनुमान तो राजद्रोही कागद कुठं आहे तो आधीं आण. त्या चिटोऱ्यावर या क्षणीं विजयनगरचं सर्व सुखदुःख अवलंबून आहे. (हनुमान गुडघे टेंकून तरवार माधवाचार्यांचे पायापाशीं ठेवतो.)

हनु०:—स्वामिराज! माझ्या संशयाचं दुष्ट स्वप्न अखेर खरं ठरलं! त्या लखोट्यांत जे माझे प्राण होते ते दुसऱ्याचे हातीं गेले. मी आतां जिवंत राहण्याला खचित योग्य नाहीं. ही तरवार घ्या आणि या अधम सेवकाचं शीर धडापासून वेगळं करा.

माध०:—(त्रासानें) बस, बस. तुझं वाक्पांडित्य नको. आण, तो खलिता कुठं आहे तो आण.

हनु०:—स्वामिराज मी अपराधी आहे. खलिता माझ्या हातून गेला.

माध०:—हातून गेला? तो कसा? त्यांना तुझा संशय आला कीं काय? त्यांनीं तुझ्या हातांत लखोटा दिलाच नसेल.

हनु०:—नाहीं महाराज, माझ्या हातीं दिला; खुद्द रुद्रदामानं तो माझ्या हातीं दिला.

माध०:—(उतावळेपणानें) शाबास. रुद्रदामानं लखोटा तुझ्या हातीं दिला. आण तर मग कुठं आहे तो.

हनु०:—महाराज, माझी हकीगत ऐकून घ्या. म्हणजे मला देहांत शासन करण्याला आपल्याला मुळींच शंका वाटणार नाहीं.

माध०:—ठीक आहे सांग तुझी हकीगत.

हनु०:—आपण सांगितल्याप्रमाणें मी घोड्यावर स्वार होऊन बागेच्या मागच्या दरवाज्याजवळ उभा राहिलों. दहा घटका रात्रीच्या सुमारास कटवाले जमूं लागले. आणि त्यांच्या घोड्यांचं खिंकाळणं आणि तरवारीच्या म्यानांचा खणखण आवाज ऐकूं येऊं लागला. माधवाचार्यांची



हनुमानः—स्वामिराज, मी अपराधी आहें. खलिता माझ्या हातून गेला ! [ पृ० ५०

इतिश्री आज होणार अशी कुजबूज त्यांच्यामध्यें सुरू झाली. थोड्या वेळानं रुद्रदाम व कृष्णदेवराय बागेच्या दाराशीं आले रुद्रदामानं मला हलक्या आवाजानं इकडून तिकडून बरेच प्रश्न विचारले. घोगऱ्या आवाजानं मीं त्याला उत्तरें दिलीं. रुद्रदामाचा संशय लवकर दूर होईना. अखेर कृष्णदेवरायाचा आग्रह पडून रुद्रदामानें तो लखोटा माझ्या उजव्या हातांत देऊन मला बजावून सांगितलं 'संभाळ याला प्राणासारखा जतन कर' आणि डाव्या हातांत ही मोहोरांची पिशवी दिली.

[ पिशवी काढून पुढें ठेवितो.]

माध०:—(त्रासानें) मोहोरांची पिशवी हा कांहीं लखोट्याचा पुरावा नव्हे. तिनं माझी जरी खात्री झाली तरी महाराजांची कशी होणार?

हनु०:—हातांत लखोटा पडल्याबरोबर घोड्याला टांच देण्याकरितां मीं रिकिबीवर जोर देऊन याय हलविणार इतक्यांत तोंडावरून फेटा बांधलेला एक शिपाई माझ्या अंगाला बिलगला; त्याचा रोंख लखोट्यावर आहे असें पाहून तो मीं उजव्या हातांतून डाव्या हातांत घेऊन उजवा हात तरवारीच्या मुठी[ला] घातला. इतक्यांत त्यानें चपळाई करून तो लखोटा माझ्या हातून हिसकावून घेतला. आणि तो खोल आवाजानं म्हणाला, अरे चोरा, असं कसब केलंस काय! पण चोरावरहि मोर असतो हें तूं विसरलास वाटतं. तुझ्या विश्वासघाताबद्दल याचक्षणीं तुला या तरवारीनं कंठस्नान घातलं असतं, परंतु तुझ्या धन्याच्या रक्ताची तिला तहान लागलेली आहे, तें मिळेपर्यंत मला ती दुसऱ्यावर चालवितां येत नाहीं.' मी तरवार उसपून वार करणार तोंच इतकं बोलून तो नाहींसा झाला. आसपास बराच शोध केला, पण पत्ता लागला नाहीं. तेव्हां निदान कटाची बातमी सांगून स्वामिराजांनीं आपला प्राण वांचविण्याची तजवीज करावी, धाडस करूं नये, अशी विनंति करण्याकरितां मी तसाच निघून इकडं आलों. स्वामिराजांची आज्ञा अंमलांत आली नाहीं, याकरितां माझा शिरच्छेद व्हावा. त्याला मी तयार आहें.

माध०:—बस, बस. किती बोलतोस? तुझे प्राण घेऊन मला काय मिळणार? आणि माझ्या प्राणाची तरी तुला पंचाईत कां? तूं इमानी

असलास तरी माझा हुकूम अमलांत येईपर्यंत मला तोंड दाखवायला तुला शरमच वाटली पाहिजे. ( तोंड फिरवितो ). तुझं अपेशीं तोंड मी पाहणार नाहीं. जा, याच पावलीं परत जा. आपल्या इमानाला यशाची जोड मिळेल तेव्हांच मला फिरून तोंड दाखीव. जा. खलित्याचा तपास लाव. कृष्णदेवराय. रुद्रदाम यांच्याजवळ लखोटा परत गेला असेल तर तो हरप्रयत्नानं मिळीव लक्षांत ठेव कीं, हा लखोटा परत मिळण्यावर तुझे प्राण, तुझं इमान, माझी इभ्रत आणि नगरचं हित अवलंबून आहे. पूर्वीं मनांत शंका धरून तूं निघालास त्याचं हें फळ तुला मिळालं. फिरून सांगतों, तरुण मनुष्याला अशा शंका कुशंका शोभत नाहींत. जा. यश मिळेल. तुला माझा आशिर्वाद आहे.

हनु०:—अहाहा, या आशीर्वादानं मला किती तरी धीर आला. [ जातो. ]

माध०:—हनुमान, आतां लखोटा घेतल्याशिवाय परत येणार नाहीं असा मला पुरा भरंवसा वाटतो. [ जातो ].

---

## प्रवेश चवथा.

स्थळ:—माधवाचार्यांच्या आश्रमाची पुढची बाजू

[ भीमसिंग व वीरविजय प्रवेश करितात.]

भीम०:—( इकडे तिकडे पाहून ) काय तो दुष्ट जोगडा या ठिकाणीं नाहीं ? तर मग सगळी मसलत फसणार कीं काय ?

वीर०:—माधवाचार्य इथं नसला; तर आंत असेल जातो कुठं ? भीमसिंगा, जा तुला या जागेच्या सर्व खाणाखुणा चांगल्या माहित आहेत. तूं आपले लोक घेऊन पक्की नाकेबंदी कर. अमात्यराजाचे शिपाई अडथळा

करतील तर त्यांचा बंदोबस्त तूं ठेव. खुद्द माधवाचार्यांचा समाचार मी घेतों आणि मी तुला इशारा देईपर्यंत सोडूं नको.

**भीम०:**—पण वीरविजय, तुम्हाला मदत असलेली बरी नव्हे कां ? अशा कामाला एकाला दोन असलेले फार चांगले.

**वीर०:**—( हंसून ) काय करायचे ? तो दुबळा म्हातारा, त्याचा समाचार मी एकटा खचित घेईन. शिवाय त्यानं तुम्हां सर्वांपेक्षां माझाच अपराध विशेष केला आहे म्हणून तो माझ्या तरवारीलाच बळी पडणं योग्य आहे. तूं जा जलदी कर.

**भीम०:**—ठीक आहे. मी जातों आश्रमाच्या दरवाजावर. [जातो].

**वीर०:**—( इकडे तिकडे पाहून ) इथं नसला तर आंत असेल. जातो कुठं ? आज हा होमशाळेंत नाहीं तर मग आम्ही येणार याचा याला सुगावा लागला कीं काय ? पण सुगावा लागून तरी जाणार कुठं ? माधवाचार्य दोन पायांनीं धावेल तर माझा सूड शंभर पायांनीं त्याचा पाठलाग करील. ज्या जिभेनं हंसेश्वरी कृष्णदेवरायाला देण्याचं या जोगड्यानं कबूल केलं ती जीभ आणि ज्या हातानं त्यानं महाराजांच्या हातावर या कामीं वचन दिलं तो हात या तरवारीनं छाटल्याशिवाय माझं समाधान होणार नाहीं. होमशाळा तर मोकळी दिसते. आंत जाऊन तो कुठं दडून बसला आहे कीं काय पाहिलं पाहिजे. [ जातो ].

[ दुसरीकडून माधवाचार्य प्रवेश करतो]

**माध०:**—( आकाशाकडं पाहून ) कोण हा दुर्दिन ! आणि अकालीं पर्जन्यवृष्टि ? मला वाटतं हे ढग नव्हेत तर विजयनगरींत चाललेल्या राजद्रोही कटाचं काळं निशाणच कीं काय ! कोण हा अधमपणा. परमार्थ तर राहोच पण खरा स्वार्थ म्हणजे काय याचीहि यांना कल्पना नाहीं. निर्बुद्धि आणि दुर्बुद्धि या मला तर सख्या बहिणी दिसतात. दोघींचंहि कपाळ सारखंच फुटलेलं !

**वीर०:**—( आंतून ) अरे अधमा, दुसऱ्याच्या डोळ्यांतलं कुसळ तुला दिसतं पण स्वतःच्या डोळ्यांतलं मुसळ सुद्धां दिसत नाहीं. दुसऱ्याचा राजद्रोह तुला दिसतो पण स्वतःचा मित्रद्रोह तुला दिसत नाहीं. तुझ्या

राजद्रोही शत्रूंना तुझ्या शिव्याशाप जाऊन बाधण्याला अद्यापी अवकाश आहे. पण तुझ्या मित्रद्रोहाच्या पातकाचं प्रायश्चित्त मात्र घेण्याची घटका भरली असं समज.

**माध०:**—( शांतपणानें ) एकूण मला दुष्ट स्वप्न पडलं तें खोटं नव्हतं तर ! अशा अवेळीं भलत्याच मार्गानं घरांत शिरून माझा उपमर्द करणारा कोण तूं !

**वीर०:**—( आंतूनच ) ही वेळ कृतीची आहे बोलण्याची नव्हे. मी कोणीका असेना. तुझ्या मित्रद्रोहाचं प्रायश्चित्त देण्याकरितां अवतरलेला मी यमदूत आहें.

**माध०:**—तूं यमदूत असलास तर तुला आपल्या यजमानाकडं पाठविण्याची लवकरच तजवीज होईल. कोण आहे तिकडे !

**वीर०:**—मार हाका. खुशाल मार–प्राणाचं प्रस्थान ठेवण्याकरितां तुझे द्वारपाल पुढें निघून गेले. दुष्टा जादुगारा, तुझा बीरमंत्र संपला. तूं आतां आपल्या भुतांना हांका मारल्यास तरी त्यांतून कोणी एकहि तुला तोंड दाखविणार नाहीं. एक पाऊल मागं टाक कीं तें यमलोकांत पडलंच समज. [ माधवाचार्यांचा हात धरतो ].

**माध०:**—( शांतपणानं ) तुझ्या वल्गना तुझ्या दुष्टपणाला शोभत नाहींत. मी वृद्ध असलों तरी तुझ्या गमजा न चालूं देण्याइतकं सामर्थ्य माझ्या अंगीं अजून आहे. ( वीरविजयाचा हात झिडकारून टाकतो ). माधवाचार्य इच्छामरणी आहे. त्याला शत्रूच्या हातून मरण कधींच येणार नाहीं. माझे ग्रह असेच बळवान् आहेत. तुझ्या एकट्याच्या हातून हें कर्म होत नसेल तर आपल्या सर्व गळेकापू हरामखोर साथीदारांना बोलाव. माझ्या राजभक्तीच्या आणि मित्रभक्तीच्या तपश्चर्येचं बळ तुला अद्यापि माहीत नाहीं असं दिसतं.

**वीर०:**—ज्याला आपले द्वारपाल आपल्या ताब्यांत ठेवतां येत नाहींत त्यानं आकाशांतल्या ग्रहांच्या बळांचा दिमाख कशाला मिरवावा ? तुझे प्राण आतां कोण वाचवायला येतात तें मी पहातों.

**माध०:**—मी तुझा आवाज बहुतेक ओळखला. पण तुझं नांव

तुझ्याच तोंडून ऐकण्याची इच्छा आहे. तुझ्या पापकर्मावर तुझ्या तोंडून स्वतःच्या नामोच्चाराचा शिक्का पडला म्हणजे मग पश्चातापाची शिक्षा तुला द्यायला कांहीं हरकत नाहीं.

**वीर०:**—( हंसून ) मरणाच्या द्वारीं टेकलेल्या मनुष्याची इच्छा कितीहि वेडगळपणाची असली तरी ती पुरवावी असं म्हणतात. मग मी तरी तुझी इच्छा कां न पुरवावी ? ऐक—मी कोण तें ऐक. ज्याला युवराज-पदाचा अभिषेक होण्याची वेळ आली असतां तुझ्यामुळं तुरुंगांत जावं लागलं तोच मी. हंसेश्वरीचं ज्याच्यावर व ज्याचं हंसेश्वरीवर प्रेम असतां ती गुणसुंदरी राणीच्या पदावर चढलेल्या एका कुलटेच्या वेडगळ भावाला देण्याचं वचन देऊन ज्याच्या वैराचा तूं कळस केलास तोच मी.

**माध०:**—एकूण मी कल्पना केली ती बरोबर तर ? कोण तूं वीर-विजय ! मग तोंडावरून हा फेटा काय म्हणून बांधून घेतलास ? निदान असलं अविचारी दुष्कृत्य करतांनां आपलं तोंड मला दाखवूं नये इतकी जरी तुला लाज वाटली असली तरी चालेल. तूं अगदींच टाकाऊ झालास असं मी मानणार नाहीं.

**वीर०:**—( तोंडावरचा फेटा काढून ) तूं आपल्या वैऱ्याला बरोबर ओळखलंस. पण तुझ्या दुष्कृत्याचा असा पाढा वाचल्यावर तुला माझी ओळख पटली तर त्यांत नवल कसलं ?

**माध०:**—( तुच्छतेनं हंसून ) अरेरे ! वीरविजया, मला तुझी कींव येते.

**वीर०:**—काय माझी कींव ? प्राण जाण्याच्या वेळीं स्वतःची कींव करायची सोडून प्राण घेणाराचीच कींव करतोस ! अरे ढोंग्या ! परोपकाराच्या आणि राजभक्तीच्या सोंगाची तुझी आजवर झाली एवढी बतावणी पुरे नाहीं का झाली ?

**माध०:**—वीरविजया, आटप. एक शब्दहि अधिक न बोलतां आधीं माझे पाय धर आणि क्षमा माग. नाहीं तर मग विलंब लावल्याबद्दलच तुला इतका पश्चात्ताप होईल कीं ही तरवार माझ्यावर चालविण्या ऐवजीं ती तुला आपल्यावरच चालवावीशी वाटेल. ज्यानं तुला हरदेवरायमहा-

राजांच्या इच्छेविरुद्ध स्वतःच्या जबाबदारीवर सोडवून आणलं, ज्यानं राणीसारख्या जादुगारिणीची जादू परतवून तुलाच युवराजपद देण्याचा सत्याग्रह धरिला आणि हंसेश्वरीशीं तुझा विवाह ताबडतोब करण्याचं ठरविलं त्या तुझ्या उपकारकर्त्यांचे तूं चांगले उपकार फेडतोस. तुम्ही शिपाई बाण्याचे लोक जसे शूर तसेच कृतज्ञहि असतां अशी माझी समजूत होती ती खोटीच म्हणायची. पण थांब. तुझी फजीती पुरी करण्याचा याहून एक अधिक चांगला मार्ग आहे त्याचाच अवलंब केला पाहिजे. म्हणजे तुझी फजीति तुझ्या पुरी लक्षांत राहील. हंसेश्वरी—

**वीर०:**—काय–हंसेश्वरी—

**माध०:**—हंसेश्वरी, बाळे, हंसेश्वरी ये इकडं आधीं. माझा हा कृतज्ञ जांवई माझे पांग फेडण्याकरितां अधीर होऊन आला त्याला लिंबलोण करण्याकरितां तयार होऊन राहायचं ते सोडून निजलीस काय अशी ?

**वीर०:**—काय हंसेश्वरी या वेळेस या ठिकाणींच आहे ?

**माध०:**—बाळे हंसेश्वरी चल. तुझ्या प्रियपतींचं हें असं विलक्षण ध्यान तुला पुन्हां केव्हांही पाहायला मिळायचं नाहीं. चल लवकर !

[ हंसेश्वरी प्रवेश करिते ]


**माध०:**—हा पहा माझा साक्षीदार आला.

**वीर०:**—हें काय मीं पहातों आहें ? हंसेश्वरी महाराजांच्या राजवाड्यांत होतीनां ? मग ती इथं कशी आली ? हंसेश्वरी बोल माझ्याशीं.

**हंसे०:**—( दु:खानें ) मीं काय बोलूं ? आपल्या हातांत ही तरवार कां ? या अपरात्रीं एकदम नकळत आपण या ठिकाणीं कसे आलां ?

**माध०:**—वेडे पोरी हें काय विचारतीस ? माझ्या जावयाचं आपल्या सासऱ्यावर इतकं प्रेम आहे कीं खुद्द सासऱ्याच्या गोड रक्ताशिवाय जांवईबुवांना दुसरा कसलाच मधुपर्क आवडत नाहीं ! काय वीरविजया, मी म्हणतों असेंच नां ?

**हंसे०:**—( दु:खानें ) हायहाय ! आतां मीं समजलें; (वीरविजयास) महाराज हें घोरकर्म आपल्या मनांत आलं तरी कसं ? ( वीरविजय तरवार फेंकून देतो ) महाराज आपणहि त्या दुष्ट अधम देशद्रोह्यांना अनु-



**चारु०:**—काय! हंसेश्वरी या वेळेस या ठिकाणींच आहे ? [पृ० ५६

कूळ झालां कीं काय ? आपल्याला असा हा बुद्धिभ्रंश कसा झाला ? तुम्ही तुरुंगांत असतां महाराजांकडं ज्यांनीं तुमच्या सुटकेची रदबदली केली, ज्यांनीं संन्यास घेऊन हें विजयनगर सोडण्यापूर्वीं तुम्हाला सेनापति-पद देण्याची प्रतिज्ञा केली, ज्यांनीं तुमच्या बंदिवासांत माझ्या मनाला दु:ख होऊं नये म्हणून तळहाताच्या फोडाप्रमाणें वागविली, त्यांच्यावर—माझ्या बाबांवर—तुम्हीं हत्यार उचललं ? [माधवाचार्याला मिठी मारते]

माध०:—ऐक ऐक, वीरविजया माझ्या साक्षीदाराची साक्ष ऐक. आपली खात्री परस्पर करून घे.

वीर०:—हंसेश्वरी—एकूण राजवाड्यांत तूं गेली नव्हतीस ? माधवाचार्यांनीं तुला देण्याबद्दल महाराजांना वचन दिलं तें खोटं तर मग !

हंसे०:—शिव शिव महाराज काय हा संशय ? उलट माझ्या बाबांनीं आपलं उग्र तेज दाखविलं नसतं तर त्या नीच रुद्रदामाचं कपट साधून, महाराज, मी तुमच्या आज दृष्टीस तरी पडलें असतें का ?

वीर:—( कपाळावर हात मारून ) हाय हाय सर्वस्वी घात झाला ! कोण अधम चांडाळ पापी मी !

माध०:—कां वीरविजया तुझ्या पश्चातापाला सुरवात झाली तर मग !

वीर०:—हाय हाय ! हें आकाश कोसळून कां माझ्यावर पडत नाहीं या वेळीं ! हें लाजीरवाणं तोंड महाराज आपणाला, हंसेश्वरी तुला, आतां मी कसं दाखवूं ? कोण मतिमंद मी. मी पोराहूनही पोर कसा बनलों ? ( माधवाचार्यांचे पाय धरतो ). हंसेश्वरी तुझ्या प्रेमाला मी दुष्ट खचित पात्र नाहीं. या महाभागानं मला क्षमा केली असं एकवार आपल्या तोंडानं म्हटलं म्हणजे तुझं शेवटचं दर्शन घेऊन याच पावलीं परत फिरेन. हें लाजीरवाणं तोंड मी याउपर तुला कसं दाखवूं ?

हंसे०:—( रडूं लागते ) महाराज—खरोखर आपण मोठं घोर कर्म करायला तयार झालां होतां—मी तरी आतां बाबांना कोणच्या तोंडानं तुमच्याकरितां क्षमा मागूं !

माध०:—अरे वः तुम्हीं दोघंही मला सारखींच वेडीं दिसतां ! (वीर

विजयास उठवून) ऊठ, वीरविजया ऊठ–तूं उतावळा आणि अविचारी तर खराच, पण तुझा विश्वास त्या अधम रुद्रदामाच्या बोलण्यावर बसल्यामुळं तूं माझ्यावर रागावलास. पण तुझ्या अपराधाचं मूळ तरी माझ्याहंसेश्वरी वरील तुझं प्रेमच ! ऊठ ऊठ, मी तुला वाजत गाजत हंसेश्वरीच्या विवाहा-करितां वाड्यांत आणणार होतों. पण तुम्ही तरुण लोक फारच बुवा उतावळे आणि अधीर. माझ्या सरंजामाची वाटसुद्धां तुला पाहायला झालं नाहीं. पण झालं तें झालं. तुझं लग्न सरंजामाशीं थोडच लागायचं आहे ! तर ऊठ, आण तुझा हात इकडं. आणि हा घे माझ्या या लाडक्या हंसेश्वरीचा हात आपल्या हातांत. (त्यांचे हात एकमेकांच्या हातांत घालतो) हंसेश्वरी, वीरविजयाचा अपराध विसरून जा व त्याच्यावर पूर्वीप्रमाणं प्रेम कर. तुम्हां दोघांना संसाराच्या चक्रांत गुंतवून मग संन्यास घेण्याचं माझं वचन हंसेश्वरी आतां पुरं झालं ना ! मीं वचनमुक्त झालों नां ! (दरवाज्याबाहेर ठोठावण्याचा आवाज ऐकूं येतो) कोण दार ठोठावतं तें !

वीर०:—(हंसेश्वरीचा हात सोडून पडलेली तरवार उचलून हातीं घेतो.) महाराज हाय हाय ! आपल्या या भाषण प्रसंगांत बाहेरच्या कट-वाल्यांचं मला विस्मरणच पडलं ! महाराज–हंसेश्वरी, आपणां सर्वांवर मीं अधमानं किती घोर प्रसंग आणला आहे याची आपल्याला कल्पनाही नाहीं ! आतां या संकटांतून आपला बचाव कसा होणार ?

माध०:—वीरविजया असा घाबरूं नको. मगाशीं तुला जें मीं सांगितलं तेंच फिरून सांगतों. माधवाचार्यांचा घात करण्याची कोणाही मनुष्याची छाति नाहीं !

वीर०:—पण महाराज बाहेर पांच पंचवीस हत्यारबंद लोक आपला घात करण्याच्या उद्देशानं मजबरोबर आले ते उतावळे झालेले दिसतात.

हंसे०:—काय बाबांचा घात. हाय हाय ! [मूर्छित पडते]

माध०:—अरे हिला मूर्छा आली. वीरविजया चल हिला घेऊन आपण आंतल्या दिवाणखान्यांत जाऊं. बाहेर भीमसिंग पहारा करीत उभा आहे त्याचा खून पडेपर्यंत आपल्याला भीति नाहीं—

वीर०:—नाहीं महाराज आपली आशा व्यर्थ आहे. आपल्या देवडी-

वरचे सर्व पहारेकरी फितूर झाले आहेत. भीमसिंगानंच हा फितूर केला. तो स्वत: माझ्याबरोबरच आंत येणार होता–पण–सुदैवानं मीं त्याला बाहेर पहारा करीत ठेवून एकटाच आंत आलों.

**माध०:**—बरं पण भुयारांतली वाट तरी आपली आहे. तिनं गढीपार झालों म्हणजे—

**वीर०:**—महाराज तीही आशा आतां फुकट आहे. भीमसिंगाला सर्व चोरवाटांची माहिती असल्यामुळं त्यांचा बंदोबस्त करायला मींच त्याला सांगितलं.

**माध०:**—( हंसून ) अस्सं एकूण माझा असा कोंडमारा केला अं !

**वीर०:**—महाराज–माझी ही तरवार हातांत असेपर्यंत व देहांत प्राण असेपर्यंत आपल्या केंसाला धक्का लागणार नाहीं.

**माध०:**—( हंसून ) वाहवा वाहवा ! काय मौज झाली. वीरविजया असा घाबरू नको. हे महाराजांच्या पदरचे सर्व दरबारी गद्धे मला म्हातारा कोल्हा म्हणून माझी थट्टा करतात नव्हे ? ठीक आहे. यांना म्हाताऱ्या कोल्ह्याची करामत तरी पहा म्हणावं एक वेळ ! अरे ! सिंहाचं कातड आंग झाकायला पुरं पडलं नाहीं तर वेळीं कोल्ह्याचंही घ्यावं लागतं हें चाललंच आहे. सिंह काय आणि कोल्हा काय—पराक्रम न चालेल तर वेळीं कपटही करावं लागेल, पण कसंही झालं तरी गाढवांची आंतडीं हीं बाहेरं निघालींच पाहिजेत. वीरविजया–तुझ्या हातांत तरवार राहूं दे –पण तिचं आतां फारसं काम उरलं नाहीं–माझ्या जावयाला इतका शीण देणं बरोबर होणार नाहीं. पाहूं तुझ्या या म्हाताऱ्या सासऱ्याला कांहीं युक्ति सुचते कां ती ! ( वीरविजय व माधवाचार्य मूर्छित अशा हंसेश्वरीला घेऊन आंत जातात )

---

# प्रवेश पांचवा

**स्थळ**—आश्रमाच्या बाहेरचा दरवाजा.

[ भीमसिंग प्रवेश करितो. ]

**भीम०:**—वीरविजयाला आंत शिरून जवळ जवळ एक घटका झाली. अद्यापि तो कां बरं बाहेर येत नाहीं ? किंवा वीरविजयालाच कांहीं दगाफटका झाला ? पण वीरविजयाचं कांहींही होवो. मला त्याच्याशीं काय करावयाचं आहे ? माझ्या सरदारकीच्या आड येणारा माझा शत्रु माधवाचार्य जगांतून नाहींसा झाला म्हणजे मला सर्व कांहीं मिळालं. पण म्हटलं तर वीरविजयाला इतका वेळ लागूं नये. नाहीं माझ्यानं धीर धरवत. आंत शिरून शोध केला पाहिजे. ( वीरविजय नागवी तरवार घेऊन प्रवेश करितो. )

**वीर०:**—दोस्तहो फत्ते झाली. सर्व मिळून आनंदीआनंद करूं या ! आपल्या सर्वांचा वैरी दुष्ट माधवाचार्य या जगांतून नाहींसा झाला. भीमसिंग चल तूं एकटा चल मजबरोबर; कारण सर्व काम गुप्तपणानं झालं पाहिजे. चल इकडून आंत प्रवेश करूं. [जातात.]

[ पडदा उघडतो. ]

[ माधवाचार्य एका पलंगावर मृतवत् अस्ताव्यस्त व निश्चल पडला आहे. वीरविजय आणि भीमसिंग हळू हळू इकडे तिकडे पहात प्रवेश करितात. ]

**वीर०:**—तो पहा, ( बोटानें दाखवून ) जन्मभर कपटी कारस्थानं करून शिणलेलं डोकं तें पहा त्या मऊ उशीवर कसं सुखानं विश्रांति घेत पडलं आहे. घे बाबा, आतां सुखानं विश्रांति घे. आणि यावच्चंद्रदिवाकरौ त्या विश्रांतीचा भंग न होवो! ज्या पाणीदार डोळ्यांनीं आमच्या सत्यनिष्ट महाराजांवर इतकी भुरळ घातली ते सिंहासारखे डोळे भीमसिंगा कसे झांकले गेले आहेत ते आतां फिरून केव्हांही उघडणार नाहींत !

भीम०:—पण काय हो वीरविजय! या ठिकाणीं गडबड वगैरे झाल्याचं कांहीं चिन्ह दिसत नाहीं. रक्ताचा एक थेंबही सांडलेला नाहीं! त्यानं मरतांना मुळींच धडपड केली नाहीं?

वीर०:—माझ्यापुढं तो कसली धडपड करणार! शिवाय अपराधी मनुष्याचं मन भित्रं असतं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. माधवाचार्यांनं माझे अक्षम्य अपराध केलेले असल्यामुळं मला पाहतांच, भीमसिंगा, काय सांगूं माधवाचार्यांनं मानच खालीं टाकली! शिकारीच्या नियमाप्रमाणं मीं त्याला त्याच्या नांवानं हांक मारली; मी कोण हें त्याला सांगितलं. त्याच्या अपराधाची त्याला आठवण करून दिली. आपला बचाव करावयाचा असेल तर सिद्ध हो नाहीं तर आपल्या सेवक लोकांना हांक मार असं मीं सांगितलं. पण अर्धांगवायु झालेल्या माणसाप्रमाणं त्यानं मला पाहतांच जें अंथरूण धरलं तें प्राण जाईपर्यंत फिरून सोडलंच नाहीं.

भीम०:—पण तुमच्या तरवारीला रक्ताचा एक थेंबदेखील लागला नाहीं हें कसं काय?

वीर०:—हां ठीक विचारलंस. हें म्हातारं बकरं मारायला तरवार तरी कशाला? माधवाचार्य ब्राह्मण, यज्ञकर्मांचा अभिमानी, तेव्हां त्याला यज्ञांतल्या बोकडाप्रमाणं बुकलून अर्धमेला करून मारताना यज्ञाची आठवण करून दिली. आणि मग त्याच्याच शालजोडीचा त्याच्या गळ्याभोंवतीं फांस घालून यज्ञपशुप्रमाणं त्याला स्वर्गाला पाठवून दिला.

भीम०:—अहाहा, माझ्या सरदारकीच्या आड येणाऱ्या माझ्या या शत्रूला मेलेला पाहून मला सरदारकी मिळाल्याचं सुख आधींच झालं आहे.

वीर—आणि प्रत्यक्ष सरदारकीचीं वस्त्रं मिळतील तेव्हां हें सुख द्विगुणित होईल असंच कीं नाहीं! हें काय सांगायला पाहिजे? मीं झालं तरी हेंच तुला म्हणणार होतों. माधवाचार्यांच्या मरणाची बातमी जो येऊन प्रथम सांगेल त्याला सरदारकीचीं वस्त्रं आणि दहा हजार मोहरा देववीन असं रुद्रदामानं कृष्णदेवरायाकडून वचन घेतल्याचं तुला माहीत आहेच. शिवाय तुझी सरदारकी वाडवडिलांपासूनची आहे. तेव्हां तुला आयता दुजोरा मिळालाच. आतां असली बातमी

ज्यानं हातानं घडवून आणली त्यालाच जाऊन ती रुद्रदामाला कळवितां आली तर फारच चांगलं झालं असतं. पण जसा माधवाचार्याला मीं आपल्या हातांनीं मारला तसाच त्याला आपल्या हातानं चितेवर ठेवल्या-शिवाय मला समाधान वाटणार नाहीं. त्याच्या शरिरावर अग्नीचा भडका जेव्हां मी पाहीन तेव्हांच माझ्या क्रोधाचा भडका शांत होईल.

**भीम०**:—( स्वगत ) मला तरी बक्षिसांत भागीदार कशाला ? तूं त्याला चितेवर ठेव नाहीं तर स्वतः जाऊन चितेंत पड. मला दोन्हीं सारखींच आहेत. ( उघड ) ठीक आहे; वीरविजय, आम्हां सर्व कटवाल्यांची एवढ्या महत्त्वाची कामगिरी तुम्हीं बजावल्यावर येवढ्याशा क्षुल्लक गोष्टीनं जर तुम्हाला समाधान होत असेल तर तिच्या आड मी कशाला येऊं ? मीं होतों पुढं तर. तुम्हीही मागाहून लवकर यालच.

**वीर०**:—हो हो हो, मला तरी इथं अधिक वेळ राहून काय करावयाचं आहे !

[ भीमसिंग जातो ].

**माध०**:—( अंथरुणावर उठून बसतो ) वीरविजया, या ब्राह्मणाच्या क्षणभर परिचयानं तुला कारस्थान चांगलंच कळूं लागलं. आणि तूं बतावणीही चांगली केलीस. शाबास तूं अमात्य माधवाचार्याला जांवई शोभतोस खरा. म्हातारा कोल्हा सांपळ्यांत अडकला होता त्याचं काय झालं हें लवकरच कळेल या देशद्रोही अधमांनां ! चला हंसेश्वरीकडे जाऊं. या सर्व भयंकर प्रसंगानं तिचं चित्त बावरल्या सारखं झालं आहे तिचं समधान आपल्याला आधीं केलं पाहिजे.

[ जातात ].

---

## प्रवेश सहावा

**स्थळ**—कृष्णदेवरायाचा दिवाणखाना.

[ कृष्णदेवराय व रुद्रदाम बोलत येतात ].

कृष्ण०:—आला सर्व मजकूर लक्षांत. एकूण हा बार चांगलाच उडला म्हणावयाचा! माधवाचार्य समजतो भीमसिंग बाहेर पहारा करतो म्हणून. आणि भीमसिंग पाहावा तर मीनाक्षीच्या बागेंत कटवाल्यांना सामील होऊन त्याचेच पाहारेकरी त्याच्यावर उलटवितो. वा:! माधवाचार्यांनं जन्मांत देखिली नाहीं अशी फजिती आज त्याची उडली असेल नाहीं?

रुद्र०:—अलबत; आणि शिवाय असं झालं कीं, वीरविजय वारंगळच्या तुरुंगांतून महाराजांच्या परवानगीशिवाय सुटून आला असं महाराजांना कळल्यापासून त्यांचा त्याच्यावर आधींच असलेला राग दुणावला आहे. आणि या आगींत हंसेश्वरीच्या अपमानकारक वर्तनानं तेल ओतलेलं आहे. झालं; काल रात्रीं अमात्यमाधवाचार्यांची वीरविजयानं जी गत केली, तीं स्वतः त्याचीच आजच्या रात्रीपूर्वी होणार. आणि हे सर्व खेळ माधवाचार्यांचेच आहेत अशी महाराजांची खात्री होऊन महाराजांचा आमच्यावर असलेला विश्वास दुणावणार. युवराजजी, पाहिलात का हा हुकूम! यांत वीरविजयाची काय व्यवस्था करावयाची तें स्पष्ट लिहिलंच आहे. तो कुठं दिसायचा अवकाश कीं, त्याला या हुकुमाच्या आधारावर मी एकदम पकडविणार. आणि फिरून तुरुंगाचा रस्ता दाखविणार. पुढचे सगळे सोहळे अर्थात् तिथंच होतील. तुरुंगांतून पळून येण्याची विद्या वीरविजयाला म्हणावं तुला एकवार साधली तितकीच. ती गोष्ट फिरून होणार नाहीं.

[देवडीवाला प्रवेश करतो.]

देव०:—सरकार, बाहेर कोणी एक अस्ताव्यस्त पोषाख केलेला, चमत्कारिक दिसणारा शिपाई आला आहे. दौडत आल्यामुळं तोंडांतून अक्ष-

रहि न निघे इतक्या धापा तो टाकतो आहे. तो म्हणतो सरकारनां मला जरूर भेटावयाचं आहे. परवानगी असल्यास आंत पाठवून देतों.

रुद्र०:—ठीक आहे, आंत पाठवून दे. पण थांब; आपले हत्यारबंद पाहारेवाले कुठं आहेत? त्यांना आधीं बाजूला आणून बशीव; आणि मग त्या शिपायाला आंत सोड. ( देवडीवाला जातो ). बहुधा तोच असावा; भीमसिंगाला मी या ठिकाणीं बसलों असेन इथंच बातमी सांगावयास ये असं म्हटलं होते; त्याप्रमाणें तोच आला असेल.

[ भीमसिंग प्रवेश करतो. ]

भीम०:—सरकार, फत्ते झाली. सर्व काम बिनभोभाट सोळा आणे पार पडलं. अमात्यमाधवाचार्यांच्या मरणाची पहिली बातमी मी आणली आहे. वचन दिल्याप्रमाणें सरदारकी आणि दहा हजार मोहरा सरकार मलाच देतील.

रुद्र०:—काय? माधवाचार्य मरण पावला! याबद्दल तुझी पुरी खात्री आहे?

भीम०:—खात्री नसायला काय झालं. मी ही गोष्ट प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिली आहे.

कृष्ण०:—त्याला कशा रीतीनं मरण आलं?

भीम०:—त्याच्यासारख्याला मरण यावं असंच आलं सरकार. त्याच्याच शालजोडीचा गळफांस त्याला घालून मारला. काम इतक्या सफाईनं झालं कीं, गडबड धडपड कांहीं नाहीं. रक्ताचा एक थेंबहि पडला असेल तर शपथ !

रुद्र०:—( कृष्णदेवरायाच्या कानास लागून नंतर रागाचा आविर्भाव आणून ) काय? माधवाचार्यांचा गळफास लावून प्राण घेतला? अरे अधमानों, असलं हें नीच खुनाचं कृत्य करून वरती खुनाचं बक्षीस मागतोस त्या तुला लाज कशी वाटत नाहीं! ( पाय आपटून स्फूण करतो ) कोण आहेरे तिकडं पाहाऱ्यावर? या चोराच्या आधीं मुसक्या आंवळा. ( भीमसिंगास ) खुनी मनुष्याला योग्य तें बक्षीस तुला लवकरच मिळेल. ( हत्यारबंद पाहारेकरी येतात आणि भीमसिंगाला कैद करितात; तो तर-

वार उपसून त्यांस अडथळा करितो.)—पहातां काय! तो एकटा तुम्हांला किती अडविणार? ( शिपाई त्यास पकडून त्याची तरवार काढून घेतात. ) शाबास, हरामखोराच्या मुसक्या बांधा. नाहीं; एवढ्यानं भागणार नाहीं. त्याची विषारी घातकी जीभ वाटेल तें बरळत सुटेल. ती छाटून टाकीपर्यंत त्याच्या तोंडावरून मुसक्या बांधा आणि त्याला तुरुंगाकडे घेऊन चला.

**भीम०**:—(धडपड करीत व ओरडून) अरे नीचा, आधीं वचन देऊन हें असं पाळतोस काय?

**रुद्र०**:—किती मगरूर आहे हा हरामखोर. मी याला वचन दिलं? याची जीभ बरळूं लागली. बांधा, तोंडावरून मुसक्या बांधा.

**भीम०**:—संभाळ, नीचा तुझाहि घात करील अशी चीज मजजवळ आहे. [ शिपाई मुसक्या बांधतात व भीमसिंगास घेऊन जातात. ]

**रुद्र०**:—एकाची तर व्यवस्था लावलीच. भीमसिंग आतां तुरुंगांतच मरणार, आणि तीच अवस्था वीरविजयाचीहि होणार. किरकोळ गरीब बापडे कटवाले आहेत. त्यांना भेडावून विजयनगराबाहेर पाठवून दिले म्हणजे काम झालं. मग कटाचा ग्रहि बाहेर उमटणार नाहीं.

**कृष्ण०**:—पण या कटवाल्यांनीं आपल्याला चांगली मदत केली आहे हें विसरतां कामा नये.

**रुद्र०**:—महाराज, या गोष्टींत आपल्याला समजत नाहीं. म्हणून माझ्याच धोरणानं जरासं घ्या. मोठीं कारस्थानं करणाराला असलीं हीं चिल्लर माणसं नडीचे वेळीं हाताशीं करावीं लागतात; परंतु नड भागतांच त्यांना झिडकारून दूर झाडून टाकिलं पाहिजे. नाहीं तर त्यांचा त्रास होतो.

**कृष्ण०**:—माधवाचार्य मेला यामुळं मार्गांतली मोठी अडचण नाहींशी झाली.

**रुद्र०**:—आणि तो जिवंत असता म्हणून काय झालं असतं! त्याच्या हातचा कारभार यापुढं एक दिवसभरहि त्याच्या हातीं राहिला नसता, आणि निर्माल्य झालेल्या या माधवाचार्याला मग विचारतो कोण! त्याच्या डोळ्यांदेखत वीरविजय फांसावर चढला असता. आणि त्या दोघांच्याहि देखत हंसेश्वरी आपली झाली असती. शिवाय माधवाचार्याच्या कारभाराची

समाप्ती, मलिककाफराच्या मुसलमानी सैन्याचा विजयनगरींत प्रवेश, आपल्या बंधुराजांची उचलबांगडी आणि आपला राज्याभिषेक या सर्वांची घटका ज्योतिष्यानं एकच वर्तविली आहे ती एक सोडून दहा माधवाचार्य जिवंत असते तरी त्यांना टाळतां आली नसती.

[ देवडीवाला प्रवेश करतो. ]

देव०:—सरकार बाहेर कोणी एक मुलगेलासा शिपाई आला आहे. मर्जी असल्यास—

कृष्ण०:—ठीक आहे आंत पाठीव त्याला. ( देवडीवाला जातो. ) खरंच हा कोण असावा बरं!

[ हनुमान प्रवेश करतो ]

रुद्र०:—अरे हा तर मीनाक्षीचा भाऊ. हरामखोरा तूं अजून इथं कसा? दाऊदखानाच्या छावणीच्या निम्या वाटेवर तूं या वेळीं असायचा तो अजून विजयनगरींतच कसा? आणि तो लखोटा कुठं आहे?

हनु०:—सरकार, मीनाक्षीच्या बागेंत तो मजपासून कोणीतरी हिसकावून घेतला खास. मी आपली तरवार चालविणार तोंच तो मनुष्य नाहींसा झाला.

रुद्र०:—तो चोरून टपून बसला असावा असं तुला वाटतं काय?

कृष्ण०:—त्याच्या अंगांत पोषाख कसला होता? बायकोचा कीं पुरुषाचा?

हनु०:—अंधेरांत मला नीटसं दिसलं नाहीं; पण त्यानं आपल्या तोंडावरून फेटा बांधिला होता असं वाटतं.

रुद्र०:—हरामखोरा, तूं सर्वस्वी घात केलास. पण जा. अजूनही जा आणि तो लखोटा असेल तेथून शोधून काढून माझ्या हातीं आणून दे. लखोटा परत आणलास तर बहाद्दरी, नाहीं तर गळफासाची दोरी हें लक्षांत ठेव. जा.

हनु०:—(स्वगत) अरे नीचा, त्या लखोट्याचा पत्ता लावणं हें जितकं तुला तितकंच मलाही इष्ट आहे. पण तो मिळेल तेव्हां खरं. ( जातो.)

कृष्ण०:—काय! एकूण लखोट्याची भानगड झाली! मुसलमानांच्या

हातीं न पडतां कटवाल्यांच्या हातीं तो अद्यापि खेळतो आहे! खचीत घात झाला यांत संशय नाहीं.

रुद्र०:—महाराज, धीर धरा. भिण्याचं कांहीं कारण नाहीं. लखोटा जातो कुठं? भीमसिंग तर तुरुंगांत पोंचला. त्याच्याजवळ लखोटा असेल तर तो आपलाच आहे. आणि वीरविजयाच्या हातीं असेल तरीहि भीति नाहीं. त्याला पकडण्याचा हुकूम सही शिक्क्यानिशीं आपल्या हातीं तयार आहेच.

कृष्ण०:—लखोटा महाराजांच्या हातीं गेला तर आपली काय वाट होईल ?

रुद्र०:—युवराज, घाबरूं नका. लखोटा माझ्या मुठींत आहे असं समजा. उद्यापर्यंत तो आपल्या हातीं खास परत येणार. चला. महाराजां-कडं जाऊन रागरंग पाहून पुढची घडी बसविली पाहिजे. युवराज, आपल्या सर्वांच्या परीक्षेची वेळ आतांच आहे.

कृष्ण०:—माधवाचार्यांच्या मृत्यूसंबंधानं महाराजांशीं आपण कोणच्या धोरणावर बोलावं हेंच मला समजत नाहीं.

रुद्र०:—त्यांत काय कठीण आहे? एक धोरण सांगतों तें लक्षांत ठेवा म्हणजे झालं. खुद्द महाराजांचा कल पाहून त्याप्रमाणं बोलायचं हेंच आम्हां दरबारी लोकांचं बाळबोध वळण. तें गिरवलं म्हणजे सगळ्या गोष्टी सुरक्षित. दगाफटका कांहीं नाहीं.

कृष्ण०:—पण महाराज तरी कोणत्या धोरणानं बोलतात याचा अंदा-जच मला लागत नाहीं.

रुद्र०:—एवढंच ना! तितक्यापुरती पूर्व तयारी मी करून देतों.

[ राजा राणी हरदेवराय व मानकरी प्रवेश करतात. कृष्णदेव व रुद्रदाम त्यास लवून प्रणाम करितात. ]

हर०:—एकूण, अमात्य माधवाचार्यांचा शेवट झाला, ही गोष्ट खरी तर!

रुद्र०:—अशी नुकतीच बातमी आली आहे खरी.

हर०:—मी ही बातमी ऐकल्याबरोबर शोधाला मनुष्य धाडला आहे. पण गोष्ट फारच वाईट झाली. असला कार्यधुरंधर मुत्सद्दी गमावला!

त्याची जागा कशी भरून निघेल ? एका अर्थानं विजयनगरी अनाथ झाली असंच म्हटलं पाहिजे.

राणी०:—(थट्टेच्या स्वरानें) हो, झाली खरी. असल्या कार्यकर्त्या पुरुषाची उणीव पावलो पावलीं भासणारच. माधवाचार्य म्हणजे मोठीच विभूती होती. खरोखरच विजयनगरी आज अनाथ झाली.

रुद्र०:—मी थोडसं मध्यें बोलतों याची महाराजांनीं मला क्षमा करावी. अमात्य माधवाचार्यांच्या मृत्यूमुळं विजयनगरी अनाथ झाली असं म्हणून, महाराज, आपला विनय व्यक्त होतो ही गोष्ट खरी. पण खरं बोलायचं म्हणजे असं नव्हे. मी तर उलटं म्हणतों. महाराजांनीं अमात्यराजांचा विनाकारण इतका मानसन्मान ठेविला होता कीं, सर्व दरबाराला ते डोईजड होऊन बसले यांत कांहीं नवल नाहीं. आम्ही दरबारच्या पटा-वरचीं यःकश्चित प्यादी मोहोरीं ! आमची ती काय कथा ? पण राज्यकारभा-रांत अलीकडं खुद्द महाराजांचा—खुद्द या गादीचाहि—शब्द खालीं पडूं लागला होता, हें पाहून मात्र सर्व दरबारी लोकांना विजयनगरी अनाथ झाली असं वाटत होतं खरं.

राणी०:—रुद्रदाम ह्मणतात तेंच खरं आतां जिवासारखा जीव म्हणून अमात्यराजांच्या मृत्यूबद्दल आम्हांलाहि दुःख वाटतं. पण खरं बोलायचं म्हणजे विजयनगरी अनाथ झाली होती ती फिरून सनाथ झाली असेंच म्हटलं पाहिजे. आम्हां दरबारी लोकांना झालं तरी या गादीपुढं खरं बोलण्याला केव्हांच हरकत नाहीं.

हर०:—तुम्ही म्हणतां तेंहि खरं आहे. पण माधवाचार्यांची आठवण झाली म्हणजे ही विजयनगरी शून्य झाली असं मला वाटतं. अमात्यराज तापट होते, आग्रही होते, यामुळं मला त्यांचं वर्चस्व मनांतून तर आवडत नसे. पण आजपर्यंतच्या सवईनं एकदम त्यांच्याविरुद्ध बोलवतहि नसे. कव्हां केव्हां तर, राजा असून मी परतंत्र आहें, माझ्याच अमात्याच्या इच्छाशक्तीचा मी दुर्बल दास आहें, या विचारानं माझ्या अंगाचा तिळपापड होऊन जाई, हें सर्व खरं. पण, अमात्यराज जिवंत असतांना जरी त्यांचा मला मत्सर वाटे, किंबहुना त्यांचा थोडाबहुत अपमान आपल्याला करतां

आला तर आपण पुरुषार्थ केलासा होईल, असंहि जरी वाटे, तरी त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकल्यापासून माझं मन अगदीं कावरंबावरं झालं आहे. मुसलमानांच्या प्रचंड धावत्या लाटेला बांध कोणी घातला! उत्तरेकडून दक्षिणेकडं पसरणारी आग कृष्णातीराच्या या दक्षिण तीराचा आश्रय करून कोणी दबविली! सात सातशें वर्षं नांदलेलीं बल्लाळ राजांच्यासारखीं मराठी राज्यं बुडलीं असतां, वारंगळ अनागोंदी या ठिकाणच्या राज्यरूपी इमारती ढासळल्या असतां, हें विजयनगर कोणी वसविलं! आणि दक्षिणेंतील मराठी राजसत्तेचं केंद्र असं स्वरूप या राजधानीला कोणीं आणिलं? मी विजयनगरीचा राजा खरा, पण माझ्या राजतेजाला अमात्य माधवाचार्यंच कारणीभूत झाला, हें मी कसं विसरूं! मी इतका कृतघ्न कसा होऊं! आर्य माधवाचार्य! तुम्ही कुठं गेलां? [ डोळ्याला पदर लावून जातो. ]

**राणी०:**—अगबाई, महाराजांना कृतज्ञतेची फिरून लहर आली वाटतं! या दुबळ्या बुदबळांतल्या राजांना आपला कर्ता सवर्ता अमात्य गेला म्हणजे आपण विधवा झालों असं वाटतं.

**रुद्र०:**—राणीसाहेब म्हणतात तेंच खरं आहे. [ सर्व जातात. ]

---

## प्रवेश सातवा

**स्थळ:**—रस्ता.

[ हनुमान प्रवेश करतो. ]

**हनु०:**—लखोटा परत मिळवीन म्हणून प्रतिज्ञा करून गुरुमहाराजांचा आशिर्वाद घेऊन तर निघालोंच. परंतु यशाचा मार्ग अजून दिसत नाहीं. कृष्णदेवराय किंवा रुद्रदाम यांच्यापाशीं तो लखोटा परत आला नाहीं, हें मात्र आतां निश्चित ठरलं. पण तो वीरविजयाजवळ आहे किंवा भीमसिंगाजवळ आहे याचा शोध मात्र अजून लागत नाहीं. काय करावं?

[ वीरविजय प्रवेश करतो. ]

वीर०:—( स्वगत ) एकूण रुद्रदामानं मला असं फसवलं काय ? मी चिंतेत असतां मला प्रेम दाखवून हंसेश्वरीविषयीं आणि माधवाचार्यांविषयीं त्यानं माझं मन कलुषित केल्यामुळं मी रागाच्या आधीन झालों. आणि त्याच्या आवेशांत केवढं तरी घोर कृत्य माझ्या हातून होणार होतं! अरेरे! काय करूं ? रुद्रदाम दृष्टीस पडूं दे, म्हणजे परनिंदा करणारी ती विषारी जीभ छाटूनच टाकतों. मग त्याला खुद्द महाराजांचा का आश्रय असेना.

हनु०:—( पुढें होऊन ) कोण तें? वीरविजयजी ?

वीर०:—(घाईनें) तूं कोण ? चल बाजूला हो. मला रुद्रदाम पाहिजे.

हनु०:—पण महाराज, कृपाकरून एक गोष्ट सांगा. देशद्रोही अधमांनीं दाऊदखानाकड पाठविण्याकरितां लिहिलेल्या खलित्याचा लखोटा आपल्या हातांत आला आहे काय ?

वीर०:—तूं हें काय म्हणतोस ?

हनु०:—वीरविजयजी, तुम्हीं मला अजून ओळखलं नाहीं असं दिसतं. कालरात्रीं तुम्ही खरे व मी खोटा असे आपण उभयतां माधवाचार्यांच्या मृत्यूच्या कटांत सामील होतों. सुदैवानं आज आपण दोघेहि अमात्य माधवाचार्यांचे प्रेमांकित दास या नात्यानं त्यांच्या कार्याला आपापल्यापरीनं मदत करीत आहोंत. तर कृपाकरून त्या लखोट्याची कांहीं माहिती असेल तर सांगा.

वीर०:—काय ? कालरात्रीं मीनाक्षीच्या बागेच्या दरवाजाच्या तोंडीं उभा होतास तो तूंच ? ( रुद्रदाम प्रवेश करितो. ) हा अधमा, मला सांपडलास. मी तुलाच शोधीत होतों.

हनु०:—वीरविजयजी, वीरविजयजी, अहो! राग असा अनावर होऊं देऊं नका. ते पहा महाराजहि मागोमाग आलेच. त्यांच्यासमोर रुद्रदामावर हत्यार चालवूं नका. तेवढा लखोटा हातीं आला म्हणजे माधवाचार्य खुद्द महाराजांचे तोंडूनच त्या नीचाला फाशीची शिक्षा सांगवितील. बोला, बोला. लखोटा कोणाजवळ दिलात ?

वीर०:—( घाईनें ) भीमासिंगाला विचार जा. ( हनुमानाला बाजूला

सारून ) हरामखोरा, घातक्या रुद्रदामा हें पहा तुझं सर्व कपटकारस्थान मी या तरवारीनं बाहेर काढितों.

**रुद्र०:**—अरे हें कसं काय झालं ? पण आधीं—

[ वीरविजय व रुद्रदाम लढतात. ]

**हनु०:**—( वीरविजयास उद्देशून ) पळा, पळा, लवकर येथून. ते पहा महाराज आलेच.

[ महाराज हरदेवराय प्रवेश करतो. त्याच्याबरोबर राणी किस्येक दरबारी लोक, मानकरी व सशस्त्र शिपाई प्रवेश करितात. )

**हर०:**—काय ? खुद्द राजवाड्यांत, खुद्द आमच्या समोर अशा तऱ्हेची ही यादवी! तुम्ही कोणाच्या हुकुमानं आपल्या तरवारी म्यानांतून बाहेर काढल्या ! अमात्य माधवाचार्य मेल्याबरोबर अशीहि बंडाळी सुरू झाली काय ? कोण तें ? रुद्रदाम !

**रुद्र०:**—( आपली तरवार हरदेवरायाच्या पायाशीं ठेवून ) महाराज, क्षमा करा. मी तरवार उपसली ती केवळ आपला जीव बचावण्याकरितां या कामीं खरा गुन्हेगार वीरविजयच आहे.

**राणीः**—डोळे झांकून सुद्धां हें कोणीहि सांगेल.

**हर०:**—काय ? हा वीरविजय ? आजपर्यंत या गादीचे त्यानं जे गुन्हे केले ते पुरे झाले नाहींत वाटतं ? गादीचा गुन्हेगार होऊन वीरविजय उजळ माथ्यानं माझ्यासमोर हत्यारबंद येतो काय !

[रुद्रदामाकडे पहातो; रुद्रदाम पाहारेवाल्यांच्या नाइकाजवळ जाऊन त्याच्या हातीं लेखी हुकूम देतो; नाईक वीरविजयास धरण्यास पुढें होतो. ]

**वीर०:**—महाराज, मला एक क्षणभर आपण बोलूंद्या. अमात्य माधवाचार्यांच्या पायांची शपथ—

**राणीः**—अमात्यांच्या जिवावर तो महाराजांच्या जिवावरहि उठेल.

**रुद्र०:**—अरे, पाहातां काय ? पकडा त्याला. घ्या त्याची तरवार काढून आणि न्या त्याला एकदम तुरुंगांत. ( वीरविजय आपली तरवार स्वाधीन करतो. इतक्यांत माधवाचार्य प्रवेश करतो. )

रुद्र०:—( आश्चर्यचकित होऊन स्वगत ) काय ? माधवाचार्य मेला होताना ? मग फिरून जिवंत कसा ?

हर०:—कोण ! अमात्य माधवाचार्य ! एकूण, आपल्या मरणाची बातमी खोटीच तर मग ?

माध०:—मी जिवंत आहें तेव्हां माझ्या मरणाची बातमी खोटी हें निराळें सांगायला नकोच. पण महाराज, मी मेलों नाहीं, जिवंत आहें, हें पाहून आपणांला आनंद न वाटतां उलट खेदच झाल्यासारखा दिसतो. मी बोलतों ही गोष्ट खरी आहे काय ? [ राणी हरदेवाचे कानास लागते ]

हर०:—अमात्यराज जिवंत आहेत या गोष्टीचा मला आनंदच आहे; पण खेद इतकाच वाटतो कीं, वर्चस्व ठेवण्याच्या आपल्या मोहानं स्वतःच्या मरणाची खोटी बातमी पसरून आमचा असा अपमान करण्याला देखील अमात्यांना कांहीं शंका वाटली नाहीं.

राणीः—बरं झालं बाई एकदां स्वतःलाच अनुभव आला एकदांचा.

वीर०:—अमात्यराज–

माध०:—( इकडे तिकडे पाहून शिपायांच्या नाइकाजवळ जातो व त्याच्या हातांतील हुकुमाचा कागद हिसकावून घेतो. ) हें काय आहे ? महाराज, निरापराधी प्रजेचा जीव घेणें हा न्यायी राजे पोरखेळ मानीत नाहींत. हें काय ? असा ढळढळीत अन्याय करणं महाराजांच्या न्याय बुद्धीला शोभत नाहीं.

राणीः—( हरदेवरायाच्या कानांशीं लागून ) महाराज, खंबीरी दाखविण्याची हीच वेळ आहे.

हर०:—अमात्यराज, न्यायान्यायाच्या कामीं आपण मला थोडी तरी स्वतंत्रता ठेविली पाहिजे. राजदंड हा राजाच्या हातीं असला पाहिजे हें आपण विसरतां.

माध०:—हें मी विसरत नाहीं. परंतु राजदंडाचा उपयोग अनीतीनं होणं हें योग्य नाहीं एवढंच मी महाराजांना सुचवितों. महाराज, जुने खोटेनाटे अपराध उकरून काढून आपल्या दरबारच्या एका उत्कृष्ट सरदाराच्या जिवावर आपण उठलां यांत आपल्या बुद्धीपेक्षां आसपासच्या बदसल्लागा-



हर०:—तसं नव्हे. पण हें असं कपट काय म्हणून ? [ पृ० ७३

रांचीच करामत अधिक असली पाहिजे. आपल्या भाबड्या स्वभावाचा फायदा घेऊन आपल्या भोंवतालचं हें कुटिल मंडळ आपल्या कीर्तीला कलंक लावीत आहे हें मी उघड म्हणतों. वीरविजयानं पोरबुद्धीनं जरी एखादी चूक केली असली तरी तिला मूळ कारण कोण हें या रुद्रदामांनाच विचारा म्हणजे ते सांगतील. तें कांहीं नाहीं. मी वीरविजयाला माफी दिली आहे, ती महाराजांनींहि कायम करावी.

राणी:—अगबाई इथवर कां आली मजल!

हर०:—अशा तऱ्हेची माफी देण्याला अमात्यराजांना मी केव्हांहि अधिकार दिलेला नव्हता. ज्यानं त्यानं आपली पायरी संभाळली पाहिजे. एरवी राजभक्ति हें निव्वळ थोतांड होतं हें आपल्याला मी सांगायला पाहिजे असं नाहीं. ( शिपायांस उद्देशून ) जा, तुमच्या हातांत लेखी हुकूम नसला तरी हरकत नाहीं मी तोंडीं हुकूम देतों; वीरविजयाला असाच तुरुंगांत पोहोंचवा. ( शिपाई वीरविजयाला घेऊन जातात ) अमात्यराज, स्वतःच्या मृत्यूसंबंधानं अशा तऱ्हेची खोटी बातमी आपण पसरून मला संशयांत टाकलं याबद्दल आपलं काय म्हणणं आहे?

माध०:—एकूण मी अद्यापि जिवंत आहें याचं महाराजांना वाईट वाटतं तर?

हर०:—तसं नव्हे. पण असं हें कपट काय म्हणून?

माध०:—कपट? मी कशाला करूं? कपटाचे मूर्तिमंत पुतळे शेजारींच उभे आहेत त्यानांच महाराजांनीं विचारावं. माझ्या मृत्यूची वार्ता महाराजांचे कानीं आली पण त्याजबरोबर कालरात्रीं माझ्या होमशाळेंत मारेकऱ्यांनीं घुसून गर्दी केली ही गोष्ट मात्र महाराजांच्या कानावर आली नाहींसं दिसतं.

रुद्र०:—तें काय म्हणून? महाराजांना सर्व गोष्टी विदित आहेत. एवढंच नव्हे पण भीमसिंगाला आपण येण्यापूर्वींच आम्हीं तुरुंगांत पाठविला. अमात्यराजांच्या प्राणाबद्दल आम्हांला किती काळजी आहे हें दिसून येईलच.

माध०:—पण नुसता भीमसिंग तुरुंगांत जाऊन कसं भागेल? भीमसिंग हा नोकर मनुष्य. त्याचे धनी महाराजांचे जवळ उभे आहेत

त्यांचीहि व्यवस्था तशीच झाली पाहिजे. नाहीं तर चोर सुटून संन्यासी सुळीं गेला असंच म्हणावं लागेल.

रुद्र०:—आपल्या दरबारी प्रतिस्पर्ध्यांवर भलते सलते दोषारोप करून त्यांचा पाणउतारा करणं आणि अशा रीतीनं त्यांना आपल्या मार्गांतून दूर करणं ही कला अमात्यराजांना चांगली माहीत आहे, हें सर्व विजयनगर जाणतं.

राणी:—इकडं मात्र अजून संशय होता. तो एकदांचा फिटला बरं झालं!

माध०:—काय ? मला प्रतिस्पर्धि ? दुर्दैवानं मला प्रतिस्पर्धि कोणीच नाहीं. आजपर्यंत माझ्या मनानं विजयनगरावर प्रीति करण्यापलीकडं कोणताच व्यवसाय केला नाहीं. माझ्या राजभक्तीला खरा प्रतिस्पर्धि कोणी आहे कीं काय हें महाराजांनीं आपल्या मनालाच विचारून पहावं. तसा प्रतिस्पर्धि मला मिळेल तर मी आनंदच मानीन.

हर०:—अमात्यराज, आपण म्हणतां ही गोष्ट खरी असली तरी ती बोलून दाखविणं हा अहंकार नव्हे काय ? मी आपल्याला लावून बोलूं इच्छीत नाहीं. पण अशा तऱ्हेचा अहंकार गादीपुढं बोलून दाखविणं हा गादीचा एक अपमानच आहे.

राणी:— गादीपुढं सर्व नोकरच आहेत. कोणाला कोणताहि अधिकार देणं, तसाच तो पुढं चालविणं न चालविणं ही गादीच्या अखत्यारींतली गोष्ट आहे हें अमात्यराज विसरतात!

माध०:—हें मी मुळींच विसरत नाहीं पण ज्याला अधिकार मिळाल्याचं सुख त्याला तो गेल्याचं दुःख ! राणासाहबांनीं गादीच्या अधिकाराचं वर्णन या गरीब भिक्षुक ब्राह्मणापुढं केलं, पण, महाराज, निस्पृह ब्राह्मणाचा अधिकार काय असतो हें राणीसाहेब विसरल्या असंच म्हटलं पाहिजे. महाराजांनीं मला अमात्यपद दिलं हें त्यांना मी अमात्य पाहिजे होतों म्हणून; मला स्वतःला त्या पदाचा अभिलाष होता म्हणून नव्हे. माझं अमात्यपद काढून घेण्याचा अधिकार महाराजांनीं खुशाल बजवावा. मला त्याची क्षिति नाहीं. यापूर्वीच मी सन्यासाची तयारी किती तरी वेळां केली होती, हें, महाराज, आपण विसरलां नसाल. अमात्याचं पद हें महाराजांचे हातीं

आहे, पण माझी राजभक्ति आणि माझी कीर्ति यांवर महाराजांचा अधिकार खचित नाहीं. निस्पृह प्रजाजनांपुढं राजदंड फिका पडलाच पाहिजे. विजयनगरचे भावी इतिहासकार तरी माझा यथायोग्य न्याय करतील. आणि असं असल्यावर महाराजांना कुटिल सल्लागारांचा मोह पडून त्यांनीं आपली न्यायबुद्धि बाजूला ठेविली तरी त्याची मी बिलकुल फिकीर करीत नाहीं.

हर०:—न्याय मागण्याची ही रीत नव्हे व हें स्थानहि नव्हे हें अमात्यराज जाणत असतीलच.

माध०:—खरी न्यायदेवता असल्या क्षुल्लक सबबींना कधींहि भीक घालीत नाहीं. सर्व प्रजाजनांना केव्हांहि न्याय देणं हें राजांचं कर्तव्यच आहे. राजेलोक जिथं उभे असतील त्या ठिकाणीं तें न्यायमंदिरच आहे असं समजलं पाहिजे. प्रजाजनांनीं झालं तरी अमुकच रीतीनं न्याय मागितला पाहिजे असं तरी शास्त्र कुठं आहे ? गादीच्या खुद्द अमात्याचा खून करण्याचा हरामखोर दरबारी लोक कट करितात. असं असतां महाराज तिकडे कानाडोळा करितात. जो न्याय यःकश्चित् प्रजाजनहि हक्कानं मागूं शकेल तो मागण्याला मी खुद्द अमात्य लाचार झालों काय ?

राणी:—अमात्यांनाहि न्याय मिळेल, पण त्यांनीं न्यायमंदिरांत येऊन इतर प्रजाजनांप्रमाणंच हजर झालं पाहिजे. चलावं आतां आणखी जास्त बोलून काय फायदा ?

[ हरदेवरायाच्या हाताला धरून त्याला ओढूं लागते.]

हर०:—चला. मला तर कांहींच सुचत नाहीं.

[ माधवाचार्यांशिवाय सर्व जातात. हंसेश्वरी प्रवेश करिते. ]

माध०:—बाळे, तूं इकडं कां आलीस ? जा, घरीं जा.

हंसे०:—बाबा ! मी घरीं जाऊन काय करूं ? आतां माझं घरीं काय राहिलं आहे ? मीं दुष्ट वार्ता ऐकली ती खरी कां ? बाबा, तुम्ही बोलत नाहीं ! वीरविजयांनां फिरून तुरुंगांत नेलं हें खरं आहे काय ? तुम्हीं बोलत नाहीं पण तुमच्या चेहऱ्यावरून तें खरं आहे यांत शंकाच वाटत नाहीं. ( माधवाचार्य सचिंत उभा राहतो; ) तुम्ही बोलत नाहीं, पण

बोलण्याचं तरी कारण काय उरलं आहे ! ते पहा तुमचे ओठ रागानं आणि दुःखानं कसे थरथरत आहेत ! बाबा, तुमच्या देखत त्यांना धरून तुरुंगांत नेलं तें तुम्हांला पहावलं काय ? (रडत) हरहर त्यांची आतां तुरुंगांत काय गत होईल ? बाबा मी तुम्हाला दोष ठेवण्याकरितां बोललें नाहीं. माफ करा. तुमच्या सत्तेवर तुमच्या दराऱ्यावर माझा भरंवसा होता म्हणून तसं म्हटलं.

माध०:—बाळे, धीर धर अशी दुःखाच्या आणि निराशेच्या आधीन होऊं नकोस. तूं वीरविजयाची पत्नी आणि माझी—या अमात्यमाधवाचार्यांची—कन्या आहेस ना ? मग ही अशी भीति तुला शोभत नाहीं. बाळे, ही सत्याची परीक्षा आहे. आपल्या शीलाची ही कसोटी आहे. या वेळीं असं गडबडून जातां कामा नये.

हंसे०:—बाबा, मी अमात्यमाधवाचार्यांची मुलगी आहें. पण तुम्ही अमात्यमाधवाचार्यच आहां ना ? तुमच्या तेजस्वितेनं—तुमच्या सद्दीनं आजच तुम्हाला दगा कसा दिला ?

माध०:—वेडे ! क्षणभर तसा देखावा दिससो आहे खरा. क्षणभर महाराजांना आपण स्वतंत्र व्हावं असं वाटलं आहे खरं. क्षणभर त्यांच्या बदसल्लागारांचा त्यांच्या मनावर पगडा बसला आहे खरा. पण तूं अशी निराश होऊं नको. शरदऋतूंतलं हें अभ्रपटल लवकरच दूर होईल. या माधवाचार्यांची सद्दी अजून संपली नाहीं. दिवा मालवताना जसा तो क्षणभर मोठा होतो, तसंच रुद्रदाम प्रभृति कुटिलांच्या कारस्थानाचा क्षणभर विजय झाल्यासारखा दिसत आहे. पण तो क्षणभरच टिकणार ! मला पाहिजे तो लखोटा हातीं येण्याचाच अवकाश कीं, पहा सर्व पारडं कसं फिरवून टाकतों तें !

[ रुद्रदाम प्रवेश करतो ]

रुद्र०:—अमात्यराज, आपण आणि कुमारी हंसेश्वरी एकत्र भेटलां हें फार चांगलं झालं.

माध०:—कां बरं ? इतकं चांगलं वाटायचं कारण काय ?

रुद्र०:—मी महाराजांचा निरोप घेऊन निघालों होतों. महाराजांनीं

कुमारीला याच पावलीं राजवाड्यांत येण्याचा हुकूम केला असून त्यांना सुखरूप तेथपर्यंत पोंचविण्याचं काम त्यांनीं मजकडं सोंपविलं आहे.

[ हंसेश्वरी माधवाचार्याला मिठी मारते ].

माध०:—वः रुद्रदाम ! तुम्हांला मोठी मनाजोगीच कामगिरी मिळाली म्हणायची नाहीं ? जा, तुमचा हेलपाटा व्यर्थ होणार याचं मात्र मला वाईट वाटतं—पण त्याला माझा नाईलाज आहे. जा! महाराजांकडं परत जा आणि त्यांना सांगा कीं ही सद्‌गुणी कुमारिका मजजवळ चांगली सुखरूप आहे. ती अनाथ असली तरी म्हणावं या माधवाचार्यांच्या कुडींत जीव आहे तोंपर्यंत तिच्याकड वांकड्या डोळ्यानं पहाण्याची कोणाचीहि छाति होणार नाहीं. या हृदयांतल्या पवित्र मंदिरांतली ती अढळ देवता आहे—जा, महाराजांना जाऊन सांगा कीं हे ढंग आतां पुरे झाले !

रुद्र०:—अमात्यराज, माझं हो काय जातं ? आपला निरोप मी जाऊन सांगेन; पण महाराज आज फार रागांत आहेत याचा विचार करा.

[ हंसेश्वरी रडत रडत माधवाचार्यास घट्ट मिठी मारते ]

हंसे०:—बाबा—मला वांचवा ! माझी धडगत दिसत नाहीं. असे धिंडवडे होण्यापेक्षां मी मरते तरी किती बरं झालं असतं !

माध०:—अरे अरे अरे, दुःखानं आणि भीतीनं इला मूर्छा आली, काय करावं ! रुद्रदाम इच्याकडं पाहून तुम्हाला खचीत तिची दयाच आली पाहिजे, इची ही स्थिति पाहून, तिच्या बापाचं माझ्यावरचं प्रेम, त्याची व माझी बालपणाची मैत्री अशा एक ना दोन—शेंकडों गोष्टींचं स्मरण होऊन कंठ दाटून येतो. ( अश्रु पुसून ) या सर्व जन्मांत माझ्या डोळ्यांना पाणी हें असं आजच काय तें आलं ! ममता ही मोठी कठीण आहे !

रुद्र०:—अमात्यराज आपली ही ममता पाहून मलाहि वाईट वाटतं ! पण काय करावं ! महाराजांचा हुकूम झाला तो बजावण्याचं काम आमचं आम्हाला करायला पाहिजे. त्यांत सुख का कांहीं आहे ? अमात्यराज ! मी केवळ आपल्या बऱ्याची म्हणून गोष्ट सांगतों. महाराजांना साऱ्या जन्मांत नाहीं तो आज राग आला आहे. त्यांची आशा मोडण्यापासून आपल्याला लाभ काय होणार ? कुमारी हंसेश्वरी, तूं तरी आपल्या वृद्ध पित्याला

दोन उपदेशाच्या गोष्टी सांग. महाराजहि तुला पित्यासारखेच आहेत कीं नाहीं? मग त्यांच्या आज्ञेप्रमाणं तेथपर्यंत जाण्यांत भय कसचं?

हंसे०:—बाबा—

माध०:—वेडे तूं गप्प रहा! स्त्रियांची जात किती तरी निष्कपट! रुद्रदाम, तुम्हाला एकवार सांगतों तुम्ही आलां तसे परत जा. हंसेश्वरी साफ येत नाहीं. हें पहा या रुद्राक्षमाळेनें या माझ्या प्रिय कन्येच्या भोंवतीं मंडळ काढतों. त्यांत पाऊल घालण्याची छाती करील त्यानं आपले प्राण गमावण्याला सिद्ध झालं पाहिजे.

रुद्र०:—माझं हो काय गेलं? मी असाच निरोप जाऊन सांगतों. पण त्याचे परिणाम मात्र फार वाईट होतील अशी मला भीति वाटते.

माध०:—अरे जारे! तुला एवढी पंचाईत सांगितली कुणीं? माझं हित मला चांगलं कळतं; समजलास! तूंच मात्र आपला पुरता विचार पहा म्हणजे झालं! उद्यां या घटकेला तुझं डोकं तुटून पडलं नाहीं म्हणजे तूं मिळविलीस असं समज.

रुद्र०:—(स्वगत) काय! माधवाचार्य माझ्यावर उलटला आणि इतक्या खात्रीनं दटावतो आहे तेव्हां लखोटा तर त्याच्या हातांत गेला नसेल ना? पण आपण भ्यालों असं दाखवितां कामा नये. (उघड) अरेरे, अमात्यराज! वार्धक्यानं तुमच्या शरीराप्रमाणंच मनावरहि चांगलाच अम्मल बसविला म्हणायचा.

माध०:—मूर्खा—जा आपल्या मार्गानं जा. माझ्या वृद्धपणाची टवाळकी करतोस, पण संभाळ माझ्यापेक्षां मृत्यु तुलाच अधिक जवळ आहे! हें भविष्य लक्षांत ठेव. आणि हें भविष्य सुद्धां एकदोन दिवसांतच तुझ्या प्रत्ययाला येईल.

रुद्र०:—बरं आहे. येईल तर मीहि पाहीन.

[ सर्व जातात ].

## अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

**स्थळः—तुरुंग.**

[ तुरुंगाचा दरोगा हातांत कंदील घेऊन येतो त्याच्या मागोमाग शामभट प्रवेश करतो. ]

दरो०:—थांब बाबा. लगट किती करतोस! तुरुंग म्हणजे कांहीं घर नव्हे समजलास! घरीं न सांगतां सवरतां तुझ्यासारखा ब्राह्मण थेट देवघरापर्यंत आला तरी हरकत होत नाहीं. वरती बसायला पाटहि मिळतो. तें ठाकच आहे. पण तुरुंगांत हें चालावयाचं नाहीं. येथें परवानगीशिवाय उंबऱ्याच्या आंत कोणीहि पाऊल घालतां कामा नये. घातलें तर धक्के बसतात ठाऊक आहे? मग तो अंत्यज असो, अधिकारी असो, वा तुझ्यासारखा ब्राह्मण असो. म्हणून म्हणतो थांब. मी तुरुंगाच्या सुभेदारसाहेबांना बोलावतों. त्यांनीं परवानगी दिली म्हणजे वाटेल तिकडं जा.

[ दरोगा जातो. ]

शाम०:—अहाहा! एवढी युक्ति जर का साधली तर मग माझं जन्माचं कल्याण होईल! गुरुमहाराजांना जो खलिता हवा तो तुरुंगांत पडलेल्या भीमसिंगाजवळ आहे हें तर खुद्द हनुमानाकडून कळलंच. तेव्हां तुरुंगांत प्रवेश करून त्याच्याकडून तो हस्तगत करून घ्यावा म्हणजे झालं. नाहीं तर हनुमानच तो हस्तगत करायचा. [ सुभेदार व दरोगा प्रवेश करतात. ]

सुभे०:—भटजीबुवा! आपलं काय म्हणणं आहे? आपणाला कैदी भीमसिंग याला भेटायची इच्छा आहे म्हणतां?

शाम०:—होयं. त्यालाच भेटायला मी आलों आहे.

सुभे०:—ठीक आहे, माझी हरकत नाहीं. ( शामभट आंत जाऊं लागतो. सुभेदार त्यास आडवितो. ) पण लेखी परवाना कुठं आहे ?

शाम०:—परवाना ? कुणाचा ? आणि तो कशाबद्दल ?

सुभे०:—या नगरच्या मुख्य अमात्याचा ! त्याच्या परवानगीशिवाय कैद्यांनां कोणाला भेटूं देत नाहींत हें आपणांला माहीत असेल. नसेल तर मी सांगतों.

शाम०:—परवाना तोंडी आहे. लेखी नाहीं.

सुभे०:—पण तो तरी कुणाचा आहे ? आपल्या शब्दावर विश्वास ठेवायला मला कांहीं हरकत वाटत नाहीं. परवाना कुणाचा आहे ?

शाम०:—कोणाचा म्हणजे ! अमात्य माधवाचार्यांचा.

सुभे०:—गोष्ट खोटी आहे. अमात्य माधवाचार्य असा तोंडी परवाना पाठवायचे नाहींत. शिवाय त्यांनीं पाठविला असं मानलं तरी तो मी जुमानणार नाहीं.

शाम०:—हं ! तें कां ?

सुभे०:—कारण ते काल अमात्य होते. आज नाहींत. आज अमात्यपदाची मुद्रा रुद्रदामांच्या हातीं आहे.

शाम०:—काय ! जन्मभर अमात्याचा कारभार ज्यानं केला त्याच्या हुकुमाला तुम्ही जुमानीत नाहीं ?

सुभे०:—अरे वेड्या, राज्यकारभारांत दाखले तेवढे जुने चालतात पण सत्ता नवी ताजी लागते. शिवाय मला नुकताच महाराज साहेबांकडून हुकूम मिळालेला आहे कीं अमात्य रुद्रदामांची सही आणि खुद्द राजेसाहेबांची मुद्रा ज्यावर आहे अशा लेखी हुकुमाशिवाय कोणालाहि तुरुंगांत कैद्याला भेटूं देऊं नये म्हणून. मग यापुढं माधवाचार्यांच्या तोंडी हुकुमाचा काय पाड तूच सांग बरं ! भटजीबुवा तुमच्या ह्या ब्रह्मचाऱ्याच्या वेषाकडं पाहूनच इतका वेळ मी ही हुजत घातली. दुसऱ्या तिसऱ्याशीं तुरुंगाचे सुभेदार इतकंहि बोलत नसतात.

शाम०:—( स्वगत ) शास्त्रांत साम दाम दंड भेद असे व्यवहाराचे प्रकार सांगितले आहेत. तर प्रथम साम करून पाहूं ( उघड ) हें पहा सुभे-

दार साहेब, तुमच्यासारखा कर्तव्यतत्पर अधिकारी सर्व विजयनगरांत नाहीं. तुमची कीर्ति सर्व लोक गातात. तुम्ही फार परोपकारीहि आहां. तर माझ्यावर उपकार करा आणि मला भीमसिंगाला भेटूं द्या. ( स्वगत ) हा सशास्त्र साम झाला.

सुभे०:—कर्तव्याच्या आड येणारा उपकार मी करीत नसतों. जा बाबा, हा स्तुतिपाठ वाचायचं काम दुसरा एखादा मूर्ख मनुष्य पाहून त्याच्या-पुढं कर.

शाम०:—( स्वगत ) सामानंतर दाम. ठीक आहे. ( उघड ) तसं नव्हे. सुभेदारसाहेब! मी कांहीं तोंड देखल्या स्तुति करीत नाहीं. खरंच मला तसं वाटतं. खोटं असेल तर हें पहा ( मोहरांची पिशवी देऊं लागतो. ) घ्या. नाहीं म्हणूं नका. ती पिशवी पवित्र आहे. तो गुरुमहाराजांचा प्रसाद आहे. खरंच त्यांत प्रसादाचं तुळसीपत्र–फूल नाहीं फुलाची पाकळी–आहे, घ्या.

सुभे०—( रागानें ) हा अधमा भटुरग्या! तूं मला आपल्या सारखा लोभी आणि हलक्या मनाचा समजतोस काय ? ठीक आहे. तुला तुरुं-गाचा कायदाच दाखविला पाहिजे. कोण आहे रे तिकडं, मारा या भटुर-ग्याला धक्के आणि द्या तुरुंगाच्या देवडी बाहेर घालवून. मूर्ख मला लांच लुचपत दाखवितो. माझा अपमान करितो.

शाम०:—( स्वगत ) हाहि उपाय फसला. आतां दंडाची योजना केली पाहिजे. ( उघड ) सुभेदारसाहेब, तुम्ही सामोपचार ऐकत नाहीं. ठीक आहे. तर आतां माझ्या ब्रह्मदंडाचा आघात सोसण्याला सिद्ध व्हा. हे पहा मी हातांत दर्भ घेतले. हें पहा त्यांच्यावर जल प्रोक्षण केलें. पहा अजून मला तुरुंगांत जाऊन भीमसिंगाला भेटूं द्या. नाहीं तर माझ्या गुरु-महाराजांच्या नांवाचा उच्चार करून प्रखर शापाचं या दर्भांवर अभिमंत्रण करून तो सोडीन. मग त्याचे काय परिणाम होतील तें मला माहीत नाहीं ( स्वगत ) या युक्तीनं हा वठणीला आलाच पाहिजे.

सुभे०:—हा पढतमूर्खा! तुझ्या शापाचे परिणाम काय होतील तें मी सांगतों. पहिला परिणाम असा होईल कीं, तुला धक्के मारून बाहेर घाल-

विण्यांत येईल ( त्याला धक्के मारून घालवितो. ) ब्राह्मणाला धक्के मारणं जिवावर येतं पण काय करूं ? माधवाचार्यांशीं संबंध असलेल्या कोणाहि माणसाला आंत सोडूंच नको असा मला आग्रहाचा हुकूम नुकताच मिळालेला आहे.

[ दरोगा प्रवेश करतो. ]

**दरो०:**—सुभेदारसाहेब ! बाहेर एक तरुण मुलगी आली आहे. सोळा सतरा वर्षांचीच असेल. कैदी भीमासिंग याची ती मुलगी आहे. ती म्हणते कृपा करून बापाला भेटूं द्या. आणि नुसती ओकसाबोकशी रडते आहे. आत्तां इतक्यांतल्या इतक्यांत तिच्या डोळ्यांतून कांहीं नाहीं तरी पसाभर पाणी गेलं असेल. तिचं दुःख पाहून माझ्या तर पाटांत कसं भडभडून आलं. बापाची भेट न झाली तर ती लवकरच प्राण टाकील कीं काय असं वाटतं.

**सुभे०:**—बोलाव, तिला आंत बोलाव. तिला हकीकत विचारून पाहूं.

[ रुद्रदाम प्रवेश करतो. त्याच्याबरोबर स्त्रीवेषधारी हनुमान रुद्रदामाच्या शेल्याचा पदर धरून रडत रडत येतो. ]

**रुद्र०:**—( स्वगत ) ही भीमसिंगाची मुलगी ? अहाहा ! किती देखणी व सुंदर आहे ! हिच्या तोंडावर तेज तरी किती अप्रतिम आहे. मी महत्त्वाच्या राजकारणांत गुंतलों नसतों तर मीच हिचा पदर धरून विनवावयाचं. पण बापाची भेट व्हावी म्हणून म्हणा कांहीं म्हणा हीच माझ्या शेल्याचा पदर धरून मला विनवीत आहे. ( उघड ) बाई ! सोड, सोड माझ्या शेल्याचा पदर ! तुझी काय इच्छा आहे ?

**हनु०:**—महाराज, आपण फार थोर मनाचे सत्पुरुष दिसतां. मी एक गरीब अनाथ स्त्री आहें. देवानं मला या जगांत माझ्या पित्याशिवाय दुसरं कोणीहि उरूं दिलं नाहीं. पण आज दैवानं तो माझा पिताहि मरणाच्या दारीं नेऊन बसविला आहे. मला आपणांपासून दुसरं तिसरं कांहीं नको. माझ्या बाबांची मरणापूर्वीं एक वेळ भेट घ्यावी अशी इच्छा आहे. आपल्या अंगीं राजतेज खास आहे असं आपल्या चेहऱ्यावरूनच दिसतं आहे. आपण मनावर घ्याल तर माझ्या बाबांचं अखेरचं दर्शन मला

घडेल. एवढी भिक्षा आपण मला घाला. हा पहा मी तुमच्यापुढं पदर पसरतें. [ रडूं लागतो.]

रुद्र०:—मुली, रडूं नको. मी तुझ्याकरितां सुभेदारसाहेबांजवळ रदबदली करीन. ( स्वगत ) तुझ्यासारख्या सुंदरस्त्रीची सेवा हातून घडणार असल्यास ती कोण बरं करणार नाहीं ? ( उघड ) चल मजबरोबर.

हनु०:—( स्वगत ) ठीक आहे. नीचा, या तुझ्या पापी विचाराचं प्रायश्चित्त तुला लवकरच भोगावं लागेल. ( उघड ) महाराज आपले माझ्यावर अनंत उपकार आहेत. [ दोघेहि आंत जातात.]

सुभे०:—( रुद्रदामास रामराम करितो ) अमात्यराज, बोलतो याची माफी असावी. पण आपणांबरोबर महाराज हरदेवराय यांची मुद्रा केलेली आज्ञा असेलच तुरुंगांत प्रवेश करण्याला !

रुद्र०:—किती मगरूर आहां हो तुम्ही ! तुम्ही कोण मी कोण याचा कांहीं विचार ! मला तुरुंगांत जाण्याला परवाना मागतां तुम्हांला कांहीं वाटत नाहीं ?

सुभे०:—माफ करा, पण महाराजांच्या मुद्रांकित हुकुमाशिवाय कुणालाहि आंत सोडूं नये असा मलाहि हुकूम आहे त्याला मीं काय करूं ?

रुद्र०:—ठीक आहे, तुमच्याशीं हुजत घालीत बसण्याला मला वेळ नाहीं. माझं काम फार निकडीचं आहे. याकरितां हा पहा मीं महाराजांच्या सहीशिक्याचा हुकूम आणला आहे. यांत एक सोडून दहा माणसांना माझ्याबरोबर आंत जाण्याची परवानगी आहे. आणि याच हुकुमाच्या आधारावर मीं या स्त्रीलाहि माझ्याबरोबर घेऊन आंत जाणार ! समजलांत !

सुभे०:—हुकूम असल्यावर माझं कांहीं म्हणणं नाहीं. ( रुद्रदाम व हनुमान आंतल्या भागांत प्रवेश करितात ) ( स्वगत ) या रुद्रदामाला पाहून मनाला अशी चीड येते कीं काय सांगूं ? पण जाऊं दे. खरोखरच प्रत्यक्ष महाराजांचा हुकूम यानं बरोबर आणला होता म्हणून बरी गोष्ट नाहीं तर जर कां विगर परवाना येऊन माझ्या गुन्हेगारींत सांपडून हा असा उद्दामपणा करता तर त्याला जागच्याजागीं लंबे करण्याला मीं कधींहि सोडलं नसतं. सुदैवानं त्यांतल्यात्यांत एक गोष्ट तर माझ्या मनासारखी

झाली. भीमसिंगाच्या या मुलीला तिच्या बापाची भेट घेऊं देण्याची मला फार इच्छा झाली होती. पण तसं करण्याला हुकुमाचा आधार नसल्यामुळं कर्तव्यबुद्धि आड येऊन जाच करीत होती. वास्तविक घटका दोन घटकांनीं मरूं घातलेल्या बापाला जर त्याची अनाथ मुलगी भेटायला आली तर तिला त्याला भेटूं द्यायला काय म्हणून हरकत असावी! कारण, अशी ही बिचारी राजदरबारीं जाणार कशी! तिचा तिथं प्रवेश होणार कसा! आणि राजमुद्रांकित परवाना तिला मिळणार कसा? पण हा तुरुंगाचा कायदा मोठा बिकट आहे. या कायद्याची अमलबजावणी करण्याचा अधिकार एकदां पत्करला म्हणजे मग सारासारबुद्धि आणि दयामाया चट सारी बाजूला गुंडाळून ठेवावी लागते. पण पहा, मनांत सद्बुद्धि उपजली म्हणजे तिचं फळ मिळण्याचा मार्ग ईश्वर कसा ना कसा तरी तयार करून देतोच. या वेळीं रुद्रदामच तिचा साहाय्यकर्ता झाला. (दरोग्यास) अरे, तूं इथं बैस. माझी तुरुंग हिंडण्याची वेळ झाली आहे. मी जाऊन येतों. दरम्यान कोणी जरूरीचंच काम आणलं तर मला येऊन कळीव. [जातो.] [ पडदा उघडतो. रुद्रदाम व हनुमान दिसतात.]

रुद्र०:––(स्वगत) माझ्या सुदैवाची या वेळीं चढती कळा आहे यांत शंका नाहीं. असली ही सुंदर सुबक बांध्याची तरुण स्त्री अवचित आपोआप कशी पहा माझ्या हाताला लागली ती. इचा बाप घटका दोन घटकांचा सोबती आणि त्याच्याशिवाय ती अनाथ आहे असं तिनंच आपल्या तोंडानं सांगितलं. अर्थात् तिचा बाप वारल्यावर तिला निराळ्या अर्थानं सनाथ करण्याचं काम कुणाला तरी करावं लागणारच. तें मींच कां करूं नये? ही आपोआप वश झाली तर ठीकच आहे. नाहींतर मीं बलात्कार केला तरी माझ्या विरुद्ध इची दाद कोण घेणार! असो. कसंहि असलं तरी तूर्त इला भीमसिंगाला भेटूं देतां कामा नये. त्याच्या जवळचा लखोटा तो कदाचित् इच्याजवळ द्यावयाचा; आणि मरणाऱ्या बापाची शेवटची आज्ञा, म्हणून ती पाळण्याचा अभिमान तिला चढून तिच्यामाझ्यामध्यें विरोधाचं नसतं कारण उत्पन्न होणार! शिवाय माझं भीमसिंगाशीं जें काम आहे तें मला या कानाचं त्या कानाला कळल्याशिवाय

पार पाडलं पाहिजे. राजद्रोही खलित्याचा मंत्र अजून षट्कर्णी झाला नाहीं तोंच तो आवरून हस्तगत करून परत घेतला पाहिजे. तेव्हां इला इथं बाहेरच उभी करून आपण एकटंच आंत जावं. परत आल्यावर मग इष्ट असेल त्याप्रमाणं इला भीमसिंगाला भेटायला आंत जाऊं द्यावी; अथवा तशीच मागच्यापायीं परतवून येथूनच पकडून द्यावी. ( उघड ) बाई, तूं या ठिकाणीं उभी रहा. मी पुढें होतों. आणि भीमसिंगाच्या कोठडीचा तपास करून मग तुला आंत त्याच्या भेटीला घेऊन जाईन. तुरुंगाची हा बोळवंडी जराशी अंधारी आणि भयाण आहे. तथापि मी परत येईपर्यंत धैर्य धरून रहा. तुझा पाठीराखा मी आहें असं समज. भिऊं नको. तुला पाहिल्यापासून माझ्या मनांत कांहीं विलक्षण ममता उत्पन्न झाली आहे. भिऊं नको.

हनु०:—महाराज, आपले माझ्यावर अनंत उपकार आहेत. ते मी तोंडानं बोलून किती दाखवूं ? ( रुद्रदाम आंत जातो ) खरंच, तोंडानं बोलण्यांत काय अर्थ आहे ? कृती करायला हे पहा माझे हात कसे वळवळताहेत ते ! बरं. पण रुद्रदाम आंत जाऊन भीमसिंगाशीं काय बोलतो-चालतो तें या इकडच्या जाळींतून दिसण्यासारखं आहे, तें नीट पाहिलं पाहिजे. रुद्रदाम खलिता घेतल्याशिवाय हात हालवीत परत आला तर भीमसिंगाची भेट घ्यायला हरप्रयत्न करून मला मागं राहिलं पाहिजे. बरं पण खलिता रुद्रदामाच्याच हस्तगत झाला तर—( इकडे तिकडे पाहून ) कांहीं हरकत नाहीं. ही बोळवंडी अंधारमय आहे आणि आसपास मनुष्यहि कोणी नाहीं. येऊन जाऊन रुद्रदाम आणि मी दोघांशीच गांठ आहे. पाहून घेईन. माझ्या हातून निसटून जाण्याची त्याची काय बिशाद !

[ डाव्या बाजूस जातो. ]

[ पडदा उघडतो. पायांत बेड्या घातलेला भीमसिंग व रुद्रदाम दिसतात. ]

भीम०:—हा दुष्टा घातक्या, माधवाचार्याला मारून तुला प्रिय असं कार्य केलं आणि त्याची बातमी प्रथम आणून दिली, त्याचं बक्षीस हा बंदीवास तूं मला मिळवून दिलास काय ?

रुद्र०:—मूर्खा, माधवाचार्य खरोखरच मरता तर हा बंदीवास तुला कशाला प्राप्त झाला असता?

भीम०:—काय? माधवाचार्य मेला नाहीं?

रुद्र०:—यांत काय संशय?

भीम०:—मीं आपल्या डोळ्यांनीं त्याचं शरीर पलंगावर मरून पडलेलं पाहिलं.

रुद्र०:—तूं पलंगावर त्याचं शरीर पडलेलं पाहिलंस. पण तें शरीर तुझ्या माझ्या शरीराइतकंच जिवंत होतं. वीरविजयानं तुला फसविलं. आणि मूर्खा तूं स्वतः फसून आमचा घात केलास. तूं आणलेल्या बातमीवर विश्वास टाकून आम्ही माधवाचार्याच्या मरणाचा पुकारा केला. पण आमच्या पुकाऱ्याचा प्रतिध्वनि जिरतो न जिरतो तोंच स्वतः माधवाचार्य आमच्या डोळ्यापुढं स्वतः येऊन उभा राहिला.

भीम०:—तो माधवाचार्य नसेल; तें त्याचं भूत असेल.

रुद्र०:—जिवंत आणि मेलेला मनुष्य यांच्यातलं अंतर न कळण्याइतका तूं मूर्ख बनलास. पण भूत आणि जिवंत मनुष्य यांच्यातलं अंतर न उमगण्याइतके आम्ही वेडे बनलों नाहीं.

भीम०:—( निराशेनें ) मग तुमचं म्हणणं तरी काय?

रुद्र०:—म्हणणं इतकंच कीं, वीरविजयानं तुझ्या स्वाधीन केलेला खलिता तूं उराशीं बाळगला आहेस तो इकडं आण.

भीम०:—तो मीं तुम्हाला कधींहि देणार नाहीं.


रुद्र०:—तो तुझ्यापासून घेतल्याशिवाय मीं येथून हलणार नाहीं.

भीम०:—ठीक आहे. कसा घेतोस तें पाहीन.

[ रुद्रदाम व भीमसिंग झगडतात. रुद्रदाम त्यास वार करून मारतो, व लखोटा हिसकावून घेतो. ]

हनु०:—ठीक झालं. रुद्रदामाच्या हातीं लखोटा तर आला, ये म्हणावं आतां पुढं. तुझ्या हातीं हा लखोटा कसा राहतो तें मीहि पहातों.

[ रुद्रदाम परत येतो तोंच हनुमान त्याच्यावर झडप घालून त्यास वार करतो व लखोटा हिसकावून घेतो. धडपड चालत असतां पडदा पडतो.]



हनु०:—तुझ्या हातीं हा लखोटा कसा राहतो तें मीहि पहातों .

[ पृ० ८६

## प्रवेश दुसरा

**स्थळ:—**माधवाचार्यांचें घर.

[ शामभट प्रवेश करितो. ]

**शाम०:—**( स्वगत ) मीनाक्षीला पाहिलं म्हणजे माझ्या मनाची फार चलबिचल होते. काय करावं ? आणि ती तर अशी आहे गमती, कीं इकडं गुरुजीकडं येते तेव्हां माझ्याशीं बोलल्याशिवाय म्हणून जातच नाहीं. खरंच, परवां मनुस्मृति चाळतांना अनुलोम विवाहाचीं वचनं वाचलीं तेव्हां पासून कांहीं नवीनच विचार माझ्या मनांत येऊं लागले आहेत. आज तिची गांठ पडली म्हणजे हळूंच गोष्ट काढून पाहतों काय म्हणते ती ! अरे ही आलीच वाटतं !

[ मीनाक्षी येते. ]

**मीना०:—**कांहो धाकटे गुरुजी ! थोरले गुरुजी कुठं आहेत ?

**शाम०:—**( रुसल्याचा आविर्भाव करून ) मी नाहीं जा तुझ्याशीं बोलत ! मला गुरुजी म्हणूं नको म्हणून मीं तुला किती वेळां सांगितलं ? पण तुझं आपलं फिरून तेंच !

**मीना०:—**( आश्चर्य दाखवून ) तुम्हाला गुरुजी म्हणूं नको ? तें कां ?

**शाम०:—**( गोडीनें ) तें मी काय सांगूं ? आपल्याच मनाला विचारून पहा म्हणजे समजेल !

**मीना०:—**( मान हलवून ) विद्येला विनय शोभतो म्हणतात तेंच खरं. पण थोरले गुरुजी अधिक विद्वान् कीं तुम्ही अधिक विद्वान् असा सुद्धां मला पुष्कळ वेळां भ्रम पडतो; असं असून तुम्हांला गुरूजी म्हणूं नको असं माझं मन मला कसं सांगेल ?

**शाम०:—**( चढून जाऊन) मीनाक्षी, विद्वत्तेचं असोग. पण गुरुमहाराजांच्या नांवाचा शब्द मीं आपल्या नांवाला लावून घेऊन त्यांचा उपमर्द कसा करूं ? तूंच सांग. शिवाय-( अडखळतो).

**मीना०:—**कां असे अडखळतां का ?

**शाम०:**—( अडखळत ) शिवाय गुरु–शिष्यीण हें नातं–जरा–अडचणीचं–आहे ग मीनाक्षी.

**मीना०:**—कां? आजपर्यंत कोणी स्त्रिया कोणा गुरूंच्या शिष्यीणी झाल्याच नाहींत वाटतं!

**शाम०:**—होय, पण गुरूचं आणि शिष्यिणीचं परस्पर प्रेम होतं असलं उदाहरण ठाऊक असलं तर मग बोल.

**मीना०:**—(मनांत) कसा लागला वेडा बोलायला! (उघड) कां बरं, अशींहि उदाहरणं सांपडतील! पण काहो गुरुजी, मला एक मात्र शंका येते. प्रेमी गुरु एक जातीचा आणि प्रेमी शिष्यीण दुसऱ्या जातीची असं उदाहरण तुम्हांला माहीत आहे का हो? धर्माची अडचण प्रेमांत नेहमीं येते. बरं ती न मानावी तर काय करावं?

**शाम०:**—(गोडीनें) पण मीनाक्षी–आपले ऋषी फार धूर्त—

**मीना०:**—काय धूर्त—

**शाम०:**—नाहीं, म्हटलं फार दूरदर्शी होते. त्यांनीं कीं नाहीं असल्या अडचणींतून आधींच मार्ग काढून ठेवलेला आहे.

**मीना०:**—(हंसून) तो कसा काय बाई!

**शाम०:**—ब्राह्मणाला तीन्ही वर्णांतली स्त्री बायको करून घेतां येते असं शास्त्र आहे.

**मीना०:**—( लबाडीनें ) तिन्ही वर्णांची म्हणजे? गोरी, निमगोरी आणि काळी ना? यांत तें मेलं शास्त्र कशाला पाहिजे? आवड गोड हेंच यांतलं शास्त्र!

**शाम०:**—वेडी आहेस तूं, अग वर्ण म्हणजे रंग नव्हे, जात.

**मीना०:**—(हंसून) अस्सं. मला काय माहीत बाई! म्हणजे ब्राह्मणाला–

**शाम०:**—हो माझ्यासारख्या ब्राह्मणाला, समज–तुझ्यासारखी शूद्र पण मोठ्या प्रेमाची—

**मीना०:**—अस्सं! गुरुजी–तुम्हाला नातं नडत होतं तें इथंच वाटतं! काय ग बाई तरी, तुम्हां विद्वान् लोकांचे आपले पोटांत पाय!

**शाम०:**—ते कसे?



**शाम०:** - ब्राह्मणाला तीन्ही वर्णांतली स्त्री बायको करून घेतां येते असं शास्त्र आहे ! [ पृ० ८८

मीना०:—माझ्यासारख्या आपल्या अज्ञान बायकोला पुढं दहा पावलं चालवून नेऊन बोलणार तो मजकूर आपला तुमच्या पोटांत आधींच तयार! पण काय हो गुरुजी—

शाम०:—( रुसून तोंड फिरवून ) इतकं सारं झालं तरी मला फिरून गुरुजी म्हटलंसच ना?

मीना०:—तर काय करूं?

शाम०:—गुरुजी नाहीं म्हणायचं–मला आपला शामभट म्हण, नाहीं तर नुसतं शामू म्हटलंस तरी चालेल. ( गोडीनें ) हें बघ, गुरु म्हटल्यानं मला दूर लोटल्यासारखं होतं. असं कां करतीस?

मीना०:—पण गुरुजी–नाहीं चुकलें–धाकटे गुरुजी–नाहीं तरीहि चुकलेंच–शामभटजी, तुम्हीं गृहस्थाश्रमांत पडल्यावर तुमचं ठीक होईल पण–विजयनगरची वाट काय! थोरल्या गुरुजींची–अमात्यमाधवाचार्यांची–गादी कोण चालवील याचा केला का कांहीं विचार?

शाम०:—( आढ्यतेनें ) मीनाक्षी, तूं म्हणतेस तेंहि कांहीं खोटं नाहीं. अमात्य माधवाचार्यांची गादी मीं नाहीं चालविली तर दुसरा कोण चालविणार?

मीना०:—( थट्टेच्या स्वरानें ) होय, मी झालं तरी तेंच म्हणतें. कारण माधवाचार्यांच्या गादीवर तुमच्यासारखा ब्रह्मचारीच बसायला हवा! तसं झालं म्हणजे माधवाचार्य संन्यास घेऊन गेले तरी, एका सूर्यामागोमाग दुसरा सूर्य उगवल्यासारखा विजयनगरीवर अखंड प्रकाश राहील!

शाम०:—( गर्वानें ) हो, मीनाक्षी तूं बोलतेस तें खरं आहे. ब्रह्मचर्याश्रम हाच सर्वांत श्रेष्ठ आहे! आणि मला तोच पत्करला पाहिजे.

मीना०:—( दुःखाचा आविर्भाव करून ) मग हेंच का तें तुमच्या शिष्यिणीवरचं प्रेम! विद्वानांचं तरी बोलण्यांत बोलणं असावं!

शाम०:—( गोडीनें ) तसं नव्हे ग मीनाक्षी. ब्रह्मचर्याचं मीं वर्णन केलं पण गृहस्थाश्रमहि तितकाच चांगला आहे. शास्त्रालाहि तो संमत आहे.

मीना०:—जा गडे, तुमचं बोलण्यांत बोलणं नाहीं. माझ्यासारखीनं

काय समजावं ? मला आपले थोरले गुरुजी कुठं आहेत तें सांगा, म्हणजे मी आपली जातें त्यांच्याकडं.

शाम०:—बरं बरं थांब, मी पाहून येऊन सांगतों.

[ जातो. ]

मीना०:—हनुमान परत आले कां पाहायला आले. ते दिसत नाहींत. चला आणखी कुठं तरी शोधूं. [ जाते ]

---

## प्रवेश तिसरा

**स्थळ**—राजवाडा.

[ रुद्रदाम प्रवेश करितो. ]

**रुद्र०**:—या घातक खलित्यानं तर माझा अगदीं पिच्छा पुरविला आहे. वीराविजयाजवळ तो खलिता नाहीं अशी मनाची पक्की खात्री करून मी भीमसिंगापासून तो हस्तगत करण्याकरितां स्वतः गेलों. मोठ्या प्रयासानं तो मी हस्तगतहि केला. इतक्यांत त्या कपटी स्त्रीनं मजवर घाला घालून, मला जखमी करून, डोळ्याचं पातं लवतं न लवतं तों, घारीनं लोण्याचा गोळा न्यावा तसा, शिताफीनं हिरावून नेला. ( जखमेकडे पाहून ) ही जखम तरी किती खोल झाली आहे आणि किती तरी दुःख देते. पण सर्व दुःख गिळून आजचा दिवस कसा तरी निभावून नेला पाहिजे. उद्यां माधवाचार्य वैतागानं संन्यास घेऊन या नगरांतून निघून जाणार अशी बातमी ऐकली आहे त्याप्रमाणं तो गेला आणि माझं अजून डळमळणारं प्रधानपद कायम झालं म्हणजे मग असे दहा लखोटे उघडकीला आले तरी मी त्यांना चांगलाच पुरा पडेन. कसलाहि पुरावा असला तरी तो दडपून टाकण्याचा अधिकार हातीं आल्यावर तो बिचारा कागद माझं

कायं करणार ! ( जखमेकडे पाहून ) अरेरे ! ही जखम फिरून दुःख देऊं लागली. आणि या जखमेची आठवण झाली म्हणजे तुरुंगांत भेटलेल्या त्या सुंदर स्त्रीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. खरंच, ती स्त्री कोण असावी बरं ? मला वार करतांना तिनं उच्चारलेले शब्द अजून माझ्या कानांत गांधीलमाशीच्या गुणगुणण्याप्रमाणं घुमताहेत " अरे नीचा ! माझ्या बापाचा घात करूं पहातोस काय ! हें घे तर त्याचं बक्षीस " होय. हेच ते तिचे खणखणीत शब्द होते. पण ती भीमसिंगाचीच मुलगी असेल तर लखोट्याबद्दल फारशी काळजी करायला नको. आपल्या बापाचा त्यांत कांहीं संबंध असेल अशा समजुतीनं तो हिसकावून घेतला असेल खरा, पण त्यांतल्या मजकुरापैकीं तिला ओ चं ठो कांहीं एक कळणार नाहीं; आणि असं पाहिलं म्हणजे तो ती बहुधा फाडूनच टाकील. पण अहाहा ! काय तिचं तें मोहक सुंदर स्वरूप ! पण इतक्या सुंदर स्वरूपाखालीं जर असं घातकीपणा छपून राहत असेल तर धिःकार असो त्या स्वरूपाला ! मी फिरून सुंदर स्त्रीचं तोंडहि पाहणार नाहीं अशी शपथ घेतो. ( हंसेश्वरी प्रवेश करिते ) अरे, पण ही पहा हंसेश्वरीच आली वाटतं ? माझी शपथ फुकट गेली. सुंदर स्त्रीचं दर्शनहि न घेण्याची आतां इतक्यांत मी जी शपथ वाहिली ती माझ्या हातून उच्चारून होते न होते तोंच ती मोडण्याला ईश्वरानंच इला इकडे पाठविली असावी. (हंसून) माझी शपथ सुंदर पण घातक अशा स्त्रीचं तोंड न पहाण्याची होती. हंसेश्वरी सुंदर आहे पण हंसेश्वरी घातक नाहीं. थोड्या वेळापूर्वीं मी तिला महाराजांच्या हुकुमावरून पाचारण करायला गेलों तेव्हां प्रथम ती भ्याली व नंतर ती मजबरोबर इकडे येण्यास तयार झालीशी दिसली. पण तो खवीस वृद्ध जांबुवंत–जादुगार जोगडा–तिच्याजवळ होता त्यानंच तिला प्रतिबंध केला. बहुदा त्याला आतां पश्चात्ताप झाला असेल किंवा ही तरी त्याचं तोंड चुकवून इकडं आली असेल. असो. आपण या कामीं प्रथम अगदीं उदासवृत्ति दाखवावी हेंच बरं.

हंसे:०—मला राजसेवकांनीं महाराज आंत आहेत म्हणून सांगितलं. पण इथं ते दिसत नाहींत. आतां महाराजांना कुठं बरं शोधावं

[ जाऊं लागते ]

रुद्र०:—आपण कशाला त्यांनां शोधण्याचे श्रम घेतां ? ते या वेळीं आपणांस भेटणार नाहींत.

हंसे०:—पण माझं त्यांच्याकडेच काम आहे.

रुद्र०:—असेल. पण प्रजाजनांनीं आपल्या प्रभुला भेटणं तें त्यांच्या प्रतिनिधींच्या द्वारानं भेटलं पाहिजे हें आपल्याला माहीत नसेल असं नाहीं. राजेलोकांनीं जर प्रत्येक फिर्याद स्वतः ऐकली तर मग त्यांचा निभाव कसा लागेल ? आणि मग आमच्यासारखे प्रतिनिधी नेमण्याचा तरी काय उपयोग ? निदान तुमचं काम राजकीय स्वरूपाचं नाहीं अशी माझी प्रथम खात्री झाली तर मग मी खुद्द राजेसाहेबांजवळ वर्दी नेऊन लावीन. अर्जदार स्त्री आहे म्हणून साध्या अनुचरानं वर्दी द्यावयाची ती मी स्वतः महाराजांचा प्रधान-प्रतिनिधि नेऊन देईन इतकंच काय तें.

हंसे०:—पण महाराजांनीं मला मगाशीं बोलाविण्याकरितां निरोप पाठविला होता.

रुद्र०:—होय. पण महाराज इथं समक्ष असते तर गोष्ट निराळी. त्यांच्या अभावीं त्यांच्या कामकाजाची व्यवस्था मलाच लावली पाहिजे. शिवाय तुमचं महाराजांशीं जें काम आहे तें जर मी बरोबर ताडलं असेल तर राजकीय स्वरूपाचंच आहे असं म्हटलं पाहिजे. राजाच्या अपराध्याला क्षमा करावयाची कीं नाहीं, आणि करावयाची तरी ती कोणत्या अटीवर करावयाची हें राज्यकारभारांतलं काम आहे. आणि म्हणून त्याचा विचार मलाच प्रथम करायला पाहिजे, हें तुमच्या प्रगल्भ बुद्धीला समजायला फारशी अडचण पडणार नाहीं.

हंसे०:—( काकुळतीनें ) रुद्रदाम—

रुद्र०:—( स्वगत ) असो, या प्रेमज्योतीचं तोंड तर आपल्याकडं फिरलं. तिचा प्रकाश आपल्यावर कायम धरून ठेवतां येतो कीं नाहीं हें यत्न करून पाहण्यासारखं आहे.

हंसे०:—रुद्रदाम—

रुद्र०:—हंसेश्वरी ! काय म्हणणं आहे तुझं ? राज्याधिकाराच्या नीरस वाणीनं मी तुझा परामर्ष घेतला याबद्दल क्षमा कर. पण या कामांत तुझं

म्हणणं समजावून घेऊन त्याचा निर्णय करण्याचं काम महाराजांनीं माझ्याकडंच सोंपविलं आहे, हींच खरी गोष्ट आहे. न्याय करण्यासारखं खडतर कर्तव्य दुसरं कोणतंच असत नाहीं. त्यांतून महाराज वृद्ध, त्यांचं मन अत्यंत कोमल, अर्जदार तरुण स्त्री, आणि न्यायाचा विषय म्हणजे खुद्द तिच्या प्रियतमाच्या गुन्हेगारीचा. या सर्व गोष्टींचा विचार करून या कामीं त्यांनीं निर्णय मजकडेच सोंपविला आहे यांत कांहीं विशेष नाहीं.

हंसे०:—ठीक आहे. प्रधान झाले तरी ते मानवी प्राणीच असतात. मग न्यायाला दयेची जोड करून देण्याची विनवणी त्यांच्यापाशीं केली तर ती फुकट जाईलच असं नाहीं, प्रतिनिधि महाराज ?

रुद्र०:—हंसेश्वरी ! पुरे, पुरे. अशा बहुमानाच्या पण रुक्ष नामाभिधानानं तूं मला बोलतेस तें ठीकच आहे. पण मी तरी काय करूं ?

हंसे०:—रुद्रदाम–तुम्ही राजमंत्री झालां तरी वीरविजयांचे तुम्ही मित्रच आहां.

रुद्र०:—हंसेश्वरी, खरं बोलायचं तर तसं नव्हे. मी वीरविजयाचा मित्र होतों. हल्लीं नाहीं.

हंसे०:—आपण असं निष्ठुर भाषण कां करितां ?

रुद्र०:—तें तूं स्वतःला विचारून पहा म्हणजे समजेल.

हंसे०:—माझ्यासारख्या अप्रगल्भ बुद्धीच्या–त्यांतूनहि दुःखानं व्यग्र झालेल्या मनाच्या–स्त्रीला हें गूढ कसं उकलणार ? कृपा करून आपणच तें सांगा !

रुद्र०:—हंसेश्वरी ! यांत गूढ असं फार थोडं आहे. वीरविजयाचा मी जिवलग मित्र होतों खरा—

हंसे०:—मी झालं तरी असंच म्हटलंनां ?

रुद्र०:—पण तुझ्यावर माझं प्रेम जडण्यापूर्वीं.

हंसे०:—( आश्चर्यानं ) काय ? माझ्यावर तुमचं प्रेम ?

रुद्र०:—होय हंसेश्वरी तुझ्यावरचं माझं प्रेम. या सर्व विजयनगरींत–या साऱ्या जगांत–मी तुजवांचून दुसऱ्या कुणावर प्रेम करूं ? आणि ही गोष्ट तुलाहि अगदींच अपरिचित असेल असं नाहीं.

हंसे०:—( स्वगत ) हाय हाय ! या दुष्टानं माझ्या अशा या संकटांत डाव साधला ! एरवीं क्षणभरहि जे शब्द कानांनीं ऐकून घेतले नसते ते हा माझ्यापुढं कसे दिमाखानं बोलून दाखवीत आहे.

रुद्र०:—हंसेश्वरी, तूं स्तब्ध बसलीस. एकूण मी बोललों ही गोष्ट, ही वस्तुस्थिति, तुला मान्य आहेना ? अलाकडं माझं भाषण, माझं वर्तन, माझा हा सर्व खटाटोप या सर्वांना हस्तगत करून त्यांनां वळण लावणारा तुझ्या प्रेमाशिवाय दुसरा कोणता हेतु होता ? हें तूं आपल्याच मनाला विचारून पहा म्हणजे तुझं तुलाच कळेल.

हंसे०:—रुद्रदाम, मला काय कळणार ? अलीकडं म्हणाल तर मी चिंतेनं आणि दुःखानं वेडी होऊन गेलेली आहें. मी काय बोलतें, काय करतें, याचं भान माझं मलाच रहात नाहीं. माझी स्मरणशक्ति नष्ट होऊन जाण्याच्या मार्गाला लागली आहे. मी भांबावलें आहे. माझ्यावर तुम्ही दया करणार नाहीं काय ? मी तुमची करुणा भाकतें—

रुद्र०:—छेः छेः हंसेश्वरी ! तुला करुणा भाकण्याचं काय कारण ? तुझ्यासारख्या स्त्रीच्या मनाला यत्किंचित्‌हि दुःख झालं तर आमचा काय उपयोग ? आमच्या पुरुषार्थाचं काय चीज ? प्रजाजन या नात्यानंहि तुला दुःख होणं हें माझ्यासारख्या राजप्रतिनिधीला लांछनास्पदच आहे असं मी समजतों. पण हे रूपसुंदरी ! राजांचं राजतेजहि तुझ्यापुढं फिक्कं पडेल, तर मजसारख्या क्षुद्र राजप्रतिनिधीची काय गोष्ट ! आमचा सर्व अधिकार—आमचा सर्व पुरुषार्थ—हा निर्माल्यवत् करून टाकण्याची शक्ति तुझ्या-सारख्या सुस्वरूप तरुणींच्या नुसत्या करांगुलींत सांठविलेली असते. अधिकार काराचा मद, द्वेषाचा उग्र विषारीपणा या सर्वांना तुझ्यासारख्या स्त्रीच्या नुसत्या एका बोटाचं दर्शन हा उत्कृष्ट उतारा होतो. नाग जसे नागसरा-पुढं आपली शक्ति विसरून जाऊन त्याच्याकडं टकमक पहात डोलत राहतात त्याचप्रमाणं तुझ्या दर्शनानं माझा सर्व अधिकारमद जिरून गेला. हंसेश्वरी, मीच उलट तुझी करुणा भाकण्याला योग्य आहें. हंसेश्वरी, मी तुजवर प्रेम करतों यामुळं तुजपुढं मला कपटाची भाषा बोलतां येत नाहीं. तुझ्या दर्शनानं माझं हृदयकमळ उमलून गेल्यामुळं माझ्या तोंडून

आत्मस्तुतीरूप एखादा शब्द निघून गेला तर त्याची क्षमा कर. हंसेश्वरी, तुझं प्रेम वीरविजयावर आहे. पण हंसेश्वरी, वीरविजयाहून आज माझ्यामध्यें कोणती गोष्ट कमी आहे ? मीहि तरुण आहें, वीरविजयाप्रमाणेंच माझा जन्म उच्च कुलांत झाला आहे, मी वीरविजयासारखाच शूर आहें. नाहीं काय ? उलट वीरविजय आज कैदेंत असून तो आतां क्षणाचा सोबती आहे, आणि महाराजांनीं तुझ्याकरितां त्याला क्षमा केली तरी त्याचा सर्व जन्म तुरुंगवासांतच जाणार. आणि मी आज महाराजांच्या कृपेच्या पुष्पशय्येवर लोळत असून प्रतिनिधिपदापर्यंत माझी मजल आतांच येऊन पोंचली आहे. पण सुदैवानं आज डोळे दिपविणारं असलं ऐश्वर्य मला लाभलं असूनहि तुला सुप्रसन्न करण्याकरितां तें मी टाकून द्यावं असं तुला वाटत असेल तर तसं करूनहि माझं तुझ्यावरचं निरपेक्ष प्रेम सिद्ध करून दाखविण्याला मी तयार आहें.

हंसे०:—रुद्रदाम, ईश्वराच्या मनांत तुम्हाला ऐश्वर्य देण्याचं आलं म्हणून तें तुम्हाला आज लाभलं आहे, याबद्दल मला खरोखर मनापासून फार आनंद होतो. दुसऱ्याचं वाईट चिंतण्याचा विचार सर्व जन्मांत माझ्या मनांत कधींहि आला नाहीं, पण ऐश्वर्याची सर्वांची दृष्टी सारखी नसते.

रुद्र०:—काय ? हंसेश्वरी, मी वर्णन केलेलं हें तुला—तुझ्या दृष्टीला—ऐश्वर्य असं वाटत नाहीं काय ?

हंसे०:—क्षमा करा. मला तसं वाटत नाहीं. या घटकेला माझं ऐश्वर्य—मला सुख देणारं ऐश्वर्य—निराळंच आहे.

रुद्र०:—सुंदरी, बोल बोल, मग विलंब कां करितेस ?

हंसे०:—वीरविजयाची सुटका होणं, त्यांना त्यांचे प्राण परत मिळणं, हाच या क्षणीं माझ्या सर्व सुखाचा, माझ्या सर्व ऐश्वर्याचा, ठेवा आहे. त्याला मी काय करूं ?

रुद्र०:—ठीक आहे. मग अशी रंजीस कां होतेस ! हेंहि ऐश्वर्य मिळविणं या क्षणीं सर्वस्वीं तुझ्याच हातीं आहे. वीरविजयाचे प्राण जाऊं नयेत एवढीच जर तुझी इच्छा असेल तर ती सफळ करणं माझ्या हातीं आहे. हंसेश्वरी, हरदेवरायमहाराज हे नांवाचे जरी राजे असले तरी त्यांच्या

इच्छाशक्तीची किल्ली आज माझ्या मुठींत आहे. वेडे, माझी मूठ तूं आपल्या सुखस्पर्शानं उघडण्याचा अवकाश, कीं पिंजऱ्यांतनं उडून गेलेल्या पाखराप्रमाणं वीरविजय स्वतंत्र झाला ह्मणून समज. काय? तूं स्तब्ध आहेस? तुला माझं बोलणं खरं वाटत नाहीं? पण वेडे तुला एकच गोष्ट सांगतों ह्मणजे तुझी खात्री होईल. वीरविजयाला कैद करण्याचा हुकूम तरी कुणी मिळविला? ज्यानं पिंजऱ्याचं दार लावलं तोच तें उघडील. यांत कसला संशय? हरदेवराय काय! तें बिचारं माझ्या हातचं बाहुलं आहे.

हंसे०:—(रागानं) हा दुष्टा! अधमा! तुझ्या खोल अंत:करणांत भिनून राहिलेलं काळकूट विष पहा तूंच कसं आत्मस्तुतीच्या मद्यप्राशनानं ओकून टाकलंस तें. धन्य त्या प्रजावत्सल राजाची आणि धन्य त्याच्या असल्या या कर्तव्यतत्पर प्रधानाची! अरे चांडाळा, प्रधानकीचा अधिकार असा गाजवून तूं कोणत्या नरकाचं साधन करणार? अथवा कोणत्या नरकाचं साधन करायचं तूं आतां बाकी ठेवलं आहेस! थांब, तूं आपल्या तोंडानं कबूल केलेल्या पापांचा पाढा मीहि अशीच जाऊन खुद्द महाराजांपुढं वाचतें, आणि मग पाहतें कीं, तुझ्या हातीं बाहुलीप्रमाणं खेळणाऱ्या त्या राजाला स्वत:ची कांहीं चेतना आहे कीं नाहीं ती. तूं खरा पुरुष असशील तर महाराजांपुढंहि मात्र असंच बोलशील. पहातें हे असले शब्द महाराजापुढं उच्चारण्याची तुझी कशी काय छाति होते ती!

रुद्र०:—अस्सं काय? प्रेमामुळं मोकळ्या मनानं मी तुला बोललों. माझ्यासारख्या राजप्रतिनिधीनं कधींहि कोणत्याहि प्रजाजनापुढं जो विनय धारण करूं नये तो मीं—तूं माझं सर्वस्व म्हणून—तुझ्यासारख्या स्त्रीपुढं धारण केला, त्याची फेड तूं अशा घातकीपणानं करणार काय? भोळे स्त्रिये, मीं तुझ्यापेक्षां चार पावसाळे खचित जास्त पाहिले आहेत. तुझ्यासारख्या स्त्रीच्या हातून जर मी असा फसला गेलों तर मग महाराजांनीं मोठाच मुत्सद्दी प्रधानपदावर नेमला म्हणायचा! काय? तूं महाराजांपुढं जाऊन मी बोललों तें बोलून दाखविशील? खुशाल दाखीव. मीहि महाराजांना ह्मणेन कीं, ही स्वार्थसाधु स्त्री आपलं काम साधण्याकरितां काय हवं तें बरळत सुटली आहे, ही शुद्ध वेडी पिशी आहे. इच्या अंगाची

आणि इच्या तोंडाची इला शुद्ध नाहीं. इचं काय ऐकतां! असं मीं सांगेन. मग पाहूं बरं महाराज कुणाचं ऐकतात तें! पण हंसेश्वरी, संभाळ तेवढ्यानं हा तंटा मग मिटणार नाहीं. हा पहा, हा कागद कसला आहे! आलं तुझ्या लक्षांत? या क्षणीं या कागदावरचीं अक्षरं काजळाच्या शाईनं लिहिलीं आहेत असं तुला दिसतं आहे. तींच क्षणार्धात वीरविजयाच्या काळजाच्या लाल रक्तानं लिहिलीं आहेत असं तुझ्या डोळ्यांना दिसूं लागेल. जा, महाराजाकडं खुशाल जा. आणि इतका वेळ तुझ्याशीं मीं बोललों तें अगदीं शब्दानशब्द महाराजांजवळ सांग. जा, महाराज वीरविजयाला क्षमा करतील अशी तुला भ्रांति आहेशी दिसते ती फेडून घे जा. हा पहा मी आपल्या अखत्यारीवर वीरविजयाचा शिरच्छेद करण्याचा हुकूम लिहितों. असेल कुणाची छाति तर म्हणावं हा खोडून काढा.

हंसे०:—(हरदेवरायाच्या दिवाणखान्याकडे पाहून) महाराज, महाराज. मजवर दया करा, मी तुमची धर्मकन्या आहे हो. दयाळूपणाबद्दल, उदार स्वभावाबद्दल सर्व जग आपली वाखाणणी करितं, असं असून महाराज, माझ्यापुरतांच निष्ठुरपणा आपल्याला आज कसा आठवला! महाराज, गर्भश्रीमंती आणि उपजत राजतेज यांच्यामुळं आपलं मन मोठं आहे. हळकुंड पिऊन गोऱ्या होणाऱ्या आपल्या या कालच्या प्रधानाप्रमाणं आपलं मन अधिकाराच्या मदानं कधींहि बेफाम होणार नाहीं. जे जन्मापासूनच हलके त्यांच्या हातीं मोठा अधिकार आला तरी त्यांचं मन मोठं कसं होणार! महाराज, वीरविजयांना वाटेल तर हद्दपारीची शिक्षा करा. त्यांना या राज्यांत राहून काय करायचं आहे? त्यांच्या अंगांत हिंदू राजवंशांचं रक्त खेळतं आहे. त्यांच्या हातांतल्या तरवारीनं ते बाहेर कुठंहि सरदारकी संपादन करतील, आणि सरदारकी न मिळाली तरी त्यांना जी काय कोंडा भाकरी मिळेल ती आम्ही दोघं सुखानं खाऊं. वाटलं तर त्यांच्याकरितां जी काय शिक्षा करायची ती मला करा. मीं ती आनंदानं सोशीन. जन्मापासून जी पोरकी पोर तिला या पुढं जगांत राहून तरी काय सुख मिळवायचं आहे! फार तर त्यांच्या वाटचा माझाच शिरच्छेद करा. महाराज, वीरविजयाची व माझी या लोकीं कायमची ताटातूट झालेली

पाहून आपली करडी न्यायबुद्धि, या आपल्या मुख्य प्रतिनिधींचा द्वेष आणि सूड घेण्याची त्यांची इच्छा या सर्वांचं खचित खचित समाधान होईल. पण महाराज, वीरविजयांचे प्राण वांचवा. आपण या गरीब गाईला एवढी भिक्षा घालण्याचं पुण्य पदरीं घेतलंत तर, महाराज, परलोकांत आपल्याला अक्षय सुख मिळेल.

**रुद्र०:**—( स्वगत ) मला खरोखर अशी भीति वाटूं लागली होती कीं या अप्सरेच्या करुण आक्रोशामुळं आमचे हे राजेंद्र राजवाड्याच्या गच्चीच्या स्वर्गावरून खरोखरच खालीं उतरून येतात कीं काय. ( उघड ) हंसेश्वरी, पुरे कर आतां हा आक्रोश आणि विलाप. तो अगदीं व्यर्थ आहे. महाराजांना जर माझं हें करणं पसंत नसतं तर त्यांनीं ही नाजूक कामगिरी माझ्याकडं सोपविलीच नसती. हं बोल, नीट विचार करून बोल. या माझ्या हाताचा आधार घेऊन वीरविजयाला तूं यमलोकांतून वर काढणार ! कीं माझा हात झिडकारून त्याबरोबर त्याला यमलोकांत ढकलून देणार ? केवळ वीरविजयाचे प्राणच तुला प्रिय असतील, तर या दोहोंपैकीं तूं कोणती गोष्ट पसंत करावी हें तुला सहजच कळून येणार आहे.

**हंसे०.**—नीचा, तूं म्हणतो आहेस तेंच खरं आहे. दोहोंतून काय पसंत करावं हें मला चांगलं समजतं. अधमा, तुझी मी इतका वेळ फुकट विनवणी केली. दगडाला पाझर फुटणार नाहीं हें मला पूर्वीच कळायला पाहिजे होतं. नीचा, वीरविजयाचे प्राण मला हवे आहेत आणि तुजजवळ मी ते मागितले, पण त्याकरितां माझ्या या शरीराचा सौदा करायला पाहतोस ? तूं आपल्या वळणावर अखेर गेलासच. महाराजांनीं तुला प्रतिनिधीपद दिलं; पण त्या पदाला शोभणारं औदार्य त्यांनीं तुला दिलं नाहीं. तें तुजजवळ कुठून येणार ? ठीक आहे. माझं हृदयच जर असं फुटायचं असेल तर तुला तरी सुबुद्धि कशी होणार! आपला दुष्ट अधिकार बजावण्याची आतां तूं खुशाल तयारी कर. तुला अक्षय अंधः-कारमय नरकाचा मार्ग दाखविणाऱ्या होमकुंडांत आमच्या दोघांच्याहि प्राणांच्या आहुत्या वाटेल तर पडूं देत. मी त्याला तयार आहे. या पृथ्वीवर



रुद्र०:—हंसेश्वरी, काय झाला हाच तुझा निश्चय ? [ पृ० ९९

पुढं जरी आमचे दोघांचे हात एकमेकांचे हातीं घालून राहणं आमच्या नशिबांत नसलं तर स्वर्गांत गेल्यावर तरी तें सुख आम्हाला अक्षय भोगायला मिळेल. त्या ठिकाणीं, नीचा, तुझा प्रवेशहि होणार नाहीं. मग तूं आमच्या सुखाच्या आड तिथें कसा येणार ? अन्यायी राजांनीं आणि त्यांच्या अधमाधम प्रधानांनीं आक्रमिलेली ही पृथ्वी त्यांची त्यांनाच खुशाल लखलाभ असो !

रुद्र०:—हंसेश्वरी, काय झाला हाच तुझा निश्चय ? नाहीं, तुझा निश्चय अजून कायम झाला असं मला वाटत नाहीं. हंसेश्वरी, नीट विचार कर. मीं कांहीं तूं म्हणतेस तसा हलक्या कुळांत जन्मलेला नाहीं. आज माझं ऐश्वर्य कसं काय हें तूं पहातेसच आहेस. पुढचं भविष्य आज या घटकेला काय सांगूं ? पण ज्याला यःकश्चित दरबारी खुषमस्कऱ्याच्या जागेपासून प्रधानपदापर्यंतची मजल इतकी लवकर गाठतां आली त्याला— माझ्यासारख्या कर्तृत्ववान हिंमतवान तरुणाला—पुढचं सर्व आयुष्य प्रधानपदावरच घालवावं लागेल हें संभवत नाहीं. मी राजा होईन असं म्हणण्यांत या घटकेला प्रत्यक्ष राजद्रोह होतो, तें पातक जिव्हेला लागतं, एवढ्याचकरितां त्या भावी ऐश्वर्याचा उच्चार आज मीं करीत नाहीं. पण माझ्या सर्व ऐश्वर्याचं ऐश्वर्य, माझ्या सर्व तेजाचं तेज, तूं आहेस असं मी मानतों. म्हणून सांगतों, हंसेश्वरी, तुझ्याकरितां वाटलं तर राजपदहि एखादे वेळीं गमावण्याला मीं तयार होईन, पण माझ्या हातीं आलेली तुला मी गमावीन ही गोष्ट मात्र आतां कालत्रयींहि घडणार नाहीं. म्हणून म्हणतों, फिरून विचार करून सांग, तुझा निश्चय काय ठरतो तो !

हंसे०:—नीचा आतां माझा अधिक अंत कां पाहतोस ?

रुद्र०:—( रुद्रदाम पाय आपटून खूण करितो. शिपाईलोक वीरविजयाला घेऊन येतात. ) हंसेश्वरी, तो पहा वीरविजय ! बोल. त्याच्या समक्ष सांगतों तें ऐक. त्याचे प्राण वांचविणं न वांचविणं हें सर्वस्वी तुझ्या हातांत आहे. ( हंसेश्वरी धांवत जाऊन वीरविजयाच्या गळ्याला मिठी मारून रडूं लागते. )

वीर०:—हंसेश्वरी, अशी घाबरूं नको. आर्य माधवाचार्यांची सद्दी, विद्यारण्याची पुण्याई, आजच संपली असं समजूं नको. आणि त्यांतूनहि

ती आमच्या दुर्दैवानं संपली असेलच तरी कांहीं चिंता नाहीं. तुझं हें अक्षय प्रेम पाहून मी सुखानं मरेन. माझ्यासारख्या अविचारी मनुष्याला—हतभागी प्राण्याला—माधवाचार्यांसारख्या विभूतीची सहानुभूति आणि तुझ्यासारख्या स्त्रीरत्नाचं निःसीम प्रेम या दोन गोष्टी मिळाल्या या विचारानं मला प्राण सोडतांनां तरी अलोट सुख होईल! हंसेश्वरी, प्रेमापेक्षां प्राणाची तुला काय आणि मला काय, काय पर्वा आहे!

रुद्र०:—मूर्खा, तुला मरण्यामध्यें सुख वाटत असेल तर खुशाल मर! पण या अप्सरेच्या प्राणावर उदक सोडण्याला तुला काय अधिकार आहे?

वीर०:— रुद्रदामाच्या अंगावर जाऊन) नीचा, डोळ्यांनीं तुझं तोंडहि पाहूं नये, कानांनीं तुझा शब्दहि ऐकूं नये म्हणून इच्छा करीत होतों. पण तुझ्यासारखीं विक्षिप्त अपवित्र घुबडं पावलोपावलीं अपशकुन केल्याशिवाय कशीं राहणार? अधमा, अन्यायी राजाची पापमय प्रधानकी गाजवीत खुशाल बैस जा. तुला आमच्या प्रेमाशीं काय कर्तव्य आहे? आमच्या प्राणांशीं तुला काय करावयाचं आहे?

रुद्र०:—दोरी जळून जाऊन राख होण्याच्या बेतांत आली. पण अजून मिशांप्रमाणं मनाचा पीळ कायमच आहे! ठीक. लवकरच तोहि निघून जाईल. गुन्हेगाराच्या मनाचा पीळ हटकून बिनबोभाट काढणारीं यंत्रं अद्यापि तुझ्या नजरेला पडलीं नाहींत म्हणूनच या तुझ्या गमज्या चाललेल्या दिसतात.

वीर०:—नीचा, छळाच्या बाह्य यंत्राप्रमाणंच मन हेंहि छळ करणारं एक यंत्र असतं. निदान या यंत्राचा तरी छळ मला किंवा हंसेश्वरीला कधींहि सोसावा लागला नाहीं व लागणार नाहीं. आम्हीं आमचा छळ सुखानं सोसूं. पण नीचा! तुझी घटका भरत आली आहे. तुला मात्र ह्या दोन्ही यंत्रांचा छळ सोसावा लागणार आहे, संभाळ.

रुद्र०:—ठीकच आहे. हात हातकड्यांनीं बांधले गेले तेव्हां तोंडालाच सर्व कामं करावीं लागणार! तुझ्या शिव्याशापांचं मला आश्चर्य वाटत नाहीं आणि भय तर त्याच्याहूनहि वाटत नाहीं (शिपायांस हुकूम

देतो. ) जा, आपला कैदी घेऊन तुरुंगांत परत जा आणि शिरच्छेदाचा हा हुकूम सुभेदाराच्या स्वाधीन करा. ( शिपाई जाऊं लागतात. )

हंसे०:—( रडत ) बाबा, धांवा हो धांवा. तुम्ही कुठं आहां ? ( इतक्यांत माधवाचार्य एका बाजूनें येतो त्याला पाहून हंसेश्वरी वीरविजयाच्या गळ्याची मिठी सोडून धांवत येऊन माधवाचार्यांच्या गळ्यास मिठी मारते. ) बाबा, बाबा तुमच्या समाधीचा भंग मी केला काय ? माझा आक्रोश, माझा विलाप, माझी दुःखाची हांक तुमची समाधी फोडून तुमच्या हृदयांत शिरली म्हणूनच तुम्ही धांवून आलां होयना ? तर मग आतां वीरविजयांचे—त्यांचे कसले माझे—प्राण खचीत वांचणार !

माध०:—(किंचित् हंसून)बाळे ! कुणाचे प्राण आणि कोण वांचविणार ! मी हा असा दुबळा म्हातारा भिक्षुक गडी; माझे स्वतःचे प्राण संपुष्टांत आलेले ! मला स्वतःलाच मुळीं परलोकच्या प्रकाशज्योति लिकलिक दिसूं लागल्या, तो मी, बाळे, वीरविजयाचे प्राण कसे वांचविणार ! माझ्या हातचा अधिकार तर गेलाच, तेव्हां आतां परमेश्वराची प्रार्थना करण्यापलीकडं मजजवळ कसलं सामर्थ्य राहिलं आहे ? पहातों ती प्रार्थना करून वीरविजयाचे प्राण वाचतात कां ! पण चुकलों. पृथ्वीवरचे, निदान विजयनगरींतले, परमेश्वर हे माझ्यापुढें उभे आहेत. या ईश्वराची प्रार्थना केल्याशिवाय स्वर्गांतल्या ईश्वराला माझी प्रार्थना कशी पोहोंचणार ? अमात्य रुद्रदाम, अहाहा ! अमात्य ही पदवी तुम्हाला, तुमच्या नांवाला, किती तरी शोभते ! अमात्यराज, आपण आतां अधिकारारूढ आहां. मी यःकश्चित् गरीब ब्राह्मण माधव वृद्ध आहें, गरजू आहें. आपणांजवळ एक भिक्षा मागायची आहे. ती घालण्याची ईश्वर आपल्याला सद्बुद्धि देवो. हें पहा हा शिपाई गडी वीरविजय माझ्या स्वतःचा जरी कोणी नसला तरी माझ्या या आवडत्या, पोटच्या नव्हे पण प्रेमाच्या, गोळ्याच्या प्रेमाचा ठेवा आहे. त्याला जीवदान द्या. ऐका ही एवढी प्रार्थना.

रुद्र०:—अहो आचार्य, अहो विद्यारण्य, आपण पूर्वी काय बोललां होतां याची आठवण आहे कां ? माझं डोकं उडण्याचं भविष्य केलं होतं नां ? आपलं भविष्य, नव्हे आपली प्रतिज्ञा, कुठं गेली ? अधिकारमदानं तरुण

जसे भांबावून जाऊं शकतात तसे अनुभवी म्हातारेहि भांबावतात याचा प्रत्यय आपणांला आला असेलच ! अहो विद्यारण्य आपण जन्मभर सर्व विद्यांचं अरण्य धुंडाळलं त्यांत ही गोष्ट, हें सत्यप्रमाण, आपल्या कुठं नज़रेला आलं नसावसं दिसतं. पण विद्येच्या आस्वादापेक्षां व्यवहाराचा अनुभवच खरा ठरतो ! आपला सर्व जन्म या राजकृपेच्या शीतळ छायेंत गेला तेव्हां दैवाच्या प्रखर उन्हाळ्याच्या तडाख्याची आपणाला कशानं कल्पना होणार ! पण मनुष्याला लांबलचक आयुष्य फुकट मिळत नाहीं. त्याला अपमान निराशा यांची किंमत अखेर तरी द्यावी लागते. अमात्य माधवाचार्यांनीं झालं तरी उचल जीभ लाव टाळ्याला असं धाडस करायला नको होतं. छे ! तें कांहीं नाहीं. मी आतां तुमच्या विनंतीला मुळींच मान देऊं शकत नाहीं. माझ्या हातीं असलेली फायद्याची गोष्ट गमवायला मी तयार नाहीं. ( शिपायांस ) कायरे ? पाहतां काय तुम्ही दगडासारखे ? चला घेऊन जा या कैद्याला येथून !

हंसे०:—( वीरविजयाच्या गळ्याला मिठी मारून ) नाहीं, नाहीं. माझे प्राण जाईपर्यंत मी त्यांनां येथून नेऊं देणार नाहीं.

[ राजा हरदेवराय व राणी व सेनापति प्रवेश करतात. ]

माध०:—( शिपायांस ) थांबा, चाललां कुठं ? हे पहा महाराज स्वतः आले. त्यांचा प्रत्यक्ष हुकूम होईपर्यंत तुम्हाला येथून पुढं एक पाऊलहि टाकतां कामा नये. ( राजास ) महाराज, झाला, अविचाराचा कडेलोट झाला. कृतघ्नपणाची कमाल झाली. आतां या राज्यांत यापुढं मला एक घोटभर पाणीहि प्यावयाचं नाहीं. ही विजयनगरी जरी मी वसविली असली तरी मला ती यापुढं स्मशानभूमीसारखी त्याज्यच झाली आहे. कालगतीच अशी असते कीं मनुष्याचं ऐश्वर्य किंवा वस्तूचं वैभव हे फार दिवस एक-सारखं सतत टिकूं शकत नाहीं. आणि त्याचप्रमाणं काल हा मनुष्याच्या मनांत प्रेरणा करितो. सुखासनावर जरी आपण बसलों असलों तरी इक-डचा पाय इकडं करावासा वाटतो, एरव्ही अंग भारावतं, तसाच प्रकार राजे लोकांचा असतो. हा देह या विजयनगरीच्या आणि या सिंहासनाच्या सेवेंत आजपर्यंत झिजला हें लक्षांत आणून महाराजांच्या मनांत मला विश्रांति

देण्याचं आलं आहे असं दिसतं. ठीक आहे. पण महाराजांनींहि लक्षांत ठेवावं कीं, हा विचार महाराजांच्या आधींच माझ्या मनांत येऊन चुकला होता. आणि याची प्रचितीहि पण महाराजांना या बैठकीलाच येऊन चुकेल. हें पहा या कमंडलूंतल्या उदकानं मी आपल्या सर्व अधिकारावर पाणी सोडलं.

हंसे०:—हाय! हाय! आतां मी कुणाच्या जीवावर आशा धरूं?

माध०:—आपल्या वार्धक्यामुळं युवराजपद आपण कृष्णदेवरायांच्या कडं देण्याचं ठरविलं आहे ही योजना आयतीच फार उत्तम आहे. तिला नांव कोण ठेवील? तसंच यापुढं प्रधानपदाचा अधिकार रुद्रदामांच्या हातीं जाणार ही योजनाहि सर्वोत्कृष्ट आहे. अशा या तरुण तरतरीत नूतन प्रधानाच्या हातीं जाणाऱ्या कारभाराबरोबर, आजपर्यंत माझ्याजवळ राहिलेलीं भूर्जपत्रें आपल्या समक्ष आणि खुद्द महाराजांच्या हातानं त्यांना द्यावी अशी माझी इच्छा आहे. तेवढी महाराजांनीं पुरवावी.

हर०:—ठीक आहे. याला कांहीं माझी हरकत नाहीं. कां रुद्रदाम?

रुद्र०:—ठीक आहे. तीं भूर्जपत्रं महाराजांनीं आपल्या स्वतःच्या हातानं मला दिल्यास मोठं भूषणच आहे.

माध०:—हें पहिलं भूर्जपत्र. द्वारा समुद्राचे अधिपति बल्लाळराज यांजकडून आलेलं आहे. ज्या वेळीं द्वारा समुद्रावर मलिकाफर याची स्वारी झालीं त्या वेळीं बल्लालराजाला मदत केल्याबद्दल उपकार स्मरून मला पाठविलेलं विज्ञप्तिपत्र—

[ माधवाचार्य एकामागून एक भूर्जपत्रें राजाचे हातीं व राजा तीं रुद्रदामाच्या हातीं टाकतो. इतक्यांत हनुमान धांवत आंत येतो व खलिता माधवाचार्यांचे हातीं टाकतो ].

माध०:—( खलिता हातांत घेऊन ) बाकीचे झाले. पण हा कागद फार महत्त्वाचा म्हणून तो माझ्या शिष्याचे हातीं आयत्या वेळीं मुद्दाम मागविला.

रुद्र०:—( चपापून ) अरे! ही तर तुरुंगांत मला जखमी करून खलिता घेऊन पळून गेलेली स्त्री! ही पुरुष केव्हां बनली! आणि हाच तो खलिता वाटतं!

माध०:—( खलिता राजाचे हातांत टाकून ) हा कागद मात्र रुद्रदामांच्या हातीं टाकण्याच्या आधीं महाराजांनीं तो नीट नजरेखालीं घालावा.

हर०:—( खलिता नीट न्याहाळून पाहून व वाचून ) अमात्यराज, हें काय ! यांत तर तुमच्या जुन्या कामगिरीचा कांहींच उल्लेख नाहीं.

माध०:—खरं आहे महाराज. जुन्या कामगिरीचा नाहीं, पण माझ्या नव्या–अगदीं ताज्या–कामगिरीचा उल्लेख यांत नसून आहे.

हर०:—यांत काय मजकूर आहे हें माझ्या डोक्यांत अद्यापि मुळींच शिरत नाहीं.

माध०:—तसं असेल तर महाराजांनीं भावी अमात्यांची मदत घ्यावी म्हणजे खुलासा होईल. राणी सरकारहि या कामीं थोडीबहुत मदत करूं शकतील.

रुद्र०:—( घाईनें हात पुढें करून ) महाराजांनीं तो खलिता इकडं द्यावा. मी पहातों त्यांत काय आहे तें !

माध०:—रुद्रदाम, तो खलिता आहे हें तुम्हाला मजकूर वाचल्याशिवाय कसं कळलं ? ( हरदेवराय खलिता रुद्रदामाच्या हातीं देणार इतक्यांत ) हां, हां, तो कागद महाराजांनीं इतक्यांत रुद्रदामाच्या हातीं देऊं नये. कदाचित् त्याचा नाश व्हायचा ! इतक्या परिश्रमानं माझ्या हनुमानानं पकडून आणलेल्या कागदाचा मी असा नाश होऊं देणार नाहीं ! हा घातक कागद जवळ बाळगल्यामुळं भीमसिंगाचा नाश झाला तितका पुरे !

हर०:—( खलिता फिरून वाचतो ) काय ? हें तर मलिक काफराला लिहिलेलं पत्र दिसतं. यावर सह्या कुणाच्या आहेत ?—( राणीकडे पाहून ) काय तुमच्या सहीचं मलिक काफराला पत्र ? आश्चर्यच आहे म्हणायचं ! ( रुद्रदामाकडे पाहून ) रुद्रदाम तुमचीहि मला सही दिसते ! आणि कृष्णदेवराय सुद्धां ? तुम्हां तिघांचं मलिक काफराकडं खलिता लिहिण्याइतकं काय काम निघालं बरं ?

रुद्र०:—अमात्यराजांचंच हें कांहीं तरी कपट असावं !

राणी:—महाराजांनीं तो कागद इकडं द्यावा; मी पहातें तरी त्यांत काय लिहिलं आहे तें ! एरवीं मला कसं कळणार ? [ हात पुढे करिते].

माध०:—नाहीं, महाराजांनीं त्या खलित्यांतला मजकूर सर्व वाचून पाहिल्याशिवाय तो राणीसाहेबांच्याहि हातांत देऊं नये. माझी हीच शेवटची कामगिरी, ती मी बिघडूं देणार नाहीं !

हर०:—( कागद वाचून ) काय ? मी काय वाचलं ? विजयनगरीवर चालून येण्याला दाउदखानाला निमंत्रण ? आणि तें ( राणी व रुद्रदाम यांजकडे पाहून ) तुमच्याकडून ? ( हनुमानाकडे पाहून ) आणि हा कोण ? कायरे हा खलिता तूं कुठून आणलास ?

हनु०:—खुद्द रुद्रदामांजवळून, महाराज !

हर०:—त्यानं तो तुजजवळ दिला ?

हनु०:—नाहीं महाराज, तुरुंगांत पडलेल्या भीमसिंगाला मारून रुद्रदामांनीं तो पळविला, पण रुद्रदामांशीं झगडून अखेर मी तो हस्तगत केला.

रुद्र०:—हा मुलगा साफ खोटं बोलतो. याला मीं पूर्वीं केव्हांहि पाहिला नाहीं.

हनु०:—पुरुष वेषांत पाहिला नाहीं हें खरं !

रुद्र०:—तर मग काय स्त्रीवेषांत ? पहा, महाराज, हा सर्व कपटाचा खेळ.

माध०:—रुद्रदाम, तुमच्यासारख्या नीच घातक्यांशीं वागतांना कपटहि केलं पाहिजे. रुद्रदाम, हनुमानाची ओळख तुम्ही विसरलां असाल, पण त्यानं केलेली जखम तुम्हाला नाकबूल करितां यायची नाहीं ! सेनापति पुढं या, आणि रुद्रदामाचा अंगरखा बाजूला सारून त्यांला या खलित्याच्यापायीं उजव्या बरगडींत झालेली जखम महाराजांनां पाहूं द्याच. ( सेनापति तरवार सरसावून जातो व रुद्रदामाला धरून त्याचा अंगरखा बाजूस सारतो ) महाराज, पहा, पहा ती जखम ! रुद्रदाम, बोला या पुराव्याबद्दल तुमचं काय म्हणणं आहे ?

रुद्र०:—काय म्हणायचं ? अमात्यांनां आपल्या शिष्यांकडून प्रतिपक्षांचे खूनहि करण्याला दिक्कत वाटत नाहीं; दुसरं काय म्हणायचं ?

माध०:—खून ? रुद्रदाम, दुसऱ्यांकडून तिसऱ्यांचे खून करावे ही तुमची राजनीति आहे, माझी नव्हे. ( हनुमान रक्तस्रावामुळें कोसळून जमिनीवर

पडतो ) पहा, खलिता हातचा जाऊं नये म्हणून याला तुम्हीं जखम केली तिचा परिणाम ! ( हनुमानाजवळ जाऊन व त्याच्या अंगावरून हात फिरवून ) अरेरे ! रक्तस्त्रावामुळं याला मूर्छा आली. महाराज, ही पहा रुद्रदामानं हनुमानाला केलेली जखम !

[ त्याला वारा घालतो. तुरुंगाचा सुभेदार प्रवेश करितो ].

**सुभे०**:—महाराजांच्या चरणापाशीं विनंति आहे.

**हर०**:—काय ? बोला ! या वेळीं तुरुंगाचं काय काम ?

**सुभे०**:—तुरुंगांत महाराजांच्या आज्ञेवरून ठेवलेला कैदी भीमसिंग याचा खून झाला.

**हर०**:—भीमसिंग कोण ? त्याला तुरुंगांत टाकण्याची आज्ञा मीं केव्हां दिली ?

**सुभे०**:—ही आज्ञा पहावी महाराजांनीं !

[ मुद्रांकित आज्ञा हरदेवरायापुढं टाकतो. ]

**हर०**:—( मुद्रेकडे व नंतर राणीकडे पाहून ) मला तर असल्या आज्ञेवर मुद्रा केलेली आठवत नाहीं. मला वाटतं, तुम्हीं हा मुद्रा केली ?

**राणी०**:—होय, रुद्रदामांच्या सांगण्यावरनं

**रुद्र०**:—काय, राणीसाहेब मीं एकट्यानंच हें केलं ?

**हर०**:—पण भीमसिंग कोण ?

**राणी०**:—अमात्यमाधवाचार्यांच्या मृत्यूची खोटी बातमी आणणारा मनुष्य !

**माध०**:—नाहीं, राणीसाहेब, माझा मृत्यु खरा आहे अशीच तर तेव्हां आपली समजूत होती ! भीमसिंग म्हणजे माझा खून करण्याकरितां आपण व रुद्रदाम यांनीं पाठविलेला मारेकरी असं वर्णन करा, कारण तेंच खरं आहे. माझा मृत्यु टळला, पण त्याचं श्रय जसं आपणाला किंवा या रुद्रदामाला नाहीं, तसंच या भीमसिंगालाहि नाहीं !

**हर०**:—हें झालं. पण, सुभेदार, भीमसिंगांचा खून कुणी केला ?

**सुभे०**:—नूतन अमात्य रुद्रदाम हे तुरुंगांत महाराजांची मुद्रांकित आज्ञा घेऊन आले होते त्यांनीं केला.

माध०:—पहा, महाराज, यापेक्षां आणखी कोणता पुरावा हवा ?

हर०:—यांनीं आधीं दाउदखानाकडं पाठविण्याकरितां खलिता लिहिण्याचा गुन्हा केला, आणि तो छपावा, खलिता आपल्या हातीं यावा, म्हणून खून केला ! पण हा खलिता दाउदखानाकडं पाठविला तर तो त्याच्यापर्यंत पोंचला कसा नाहीं ? तो इथंल्या इथंच कसा राहिला ?

हनु०:—( कण्हत ) महाराज, मी मध्यें बोलूं नये, पण बोलतों. बाहेर जवळच वीरविजय सैनिकांच्या ताब्यांत बंदिवान् आहेत त्यांना आंत आणून विचारा. ते त्याचा उलगडा करतील !

हर०:—कोण आहेरे तिकडं ? जा वीरविजयाला माझ्या समोर घेऊन या ! ( शिपाई जातो. ) काय रुद्रदाम ? बोला या खलित्यासंबंधानं तुमचं काय म्हणणं आहे ?

रुद्र०:—मीं काय हुकूमाचा ताबेदार ! राणीसाहेबांनीं आज्ञा केली तरी ती राजाज्ञा म्हणून मला पाळलीच पाहिजे.

हर०:—( राणीकडे पाहून ) हे कारभार तुम्हांला कुणी सांगितले ? दाउदखानाला आणून माझ्या मानेवर सुरी ठेवून तुम्हांला काय साधायचं .होतं ?

राणी:—( मनांत ) आतां स्पष्ट बोललं तरच कांहीं काम भागेल. ( उघड ) मला काय साधायचं होतं माझ्या स्वत: करितां ? महाराजांची माझ्यावर इतकी कृपा असल्यावर मला स्वत:ला काय कमी गेलं ? मला जर खरोखरच साधायचं असलं तर, महाराज, आपला मान दरबारांत राहावा हेंच साधायचं होतं.

हर०:—( आश्चर्यानें ) माझा मान राखण्याकरितां माझ्या शत्रूला सैन्य घेऊन राजधानीवर बोलवायचं या बिकट राजकारणाचं मर्म माझ्या नाहीं आलं लक्षांत ! कृपा करून सांगाल तर बरं होईल !

राणी:—( रडण्याचें सोंग करून ) असं घालून पाडून बोलायला मीं काय केलं आहे ?

माध०:—सेनापति, तुमचा अपमान राणीसाहेबांचे अश्रु पुसून टाकतील असं मीं पूर्वीं सांगितलं होतं तें आठवतं ना ?

**राणी०:**—( जोरानें रडून ) घ्या, महाराज, घ्या आपल्या अर्धांगीचा आपल्या डोळ्यासमोर अपमान ! ठीकच आहे ! आम्ही बायका रडण्याशिवाय दुसरं काय करणार ?

**माध०:**—कां बरं ? स्त्रियांना शत्रूला खलिते पाठवून फंद फितूर करितां येतात हें आतांच दिसून आलं आहे.

**हर०:**—होय, अमात्यराज, मीहि तेंच म्हणणार होतों.

**राणी०:**—( ओकसा बोकशी रडून ) घरच्याच माणसांनीं अशी आग पाखडण्याला सुरुवात केल्यावर बायका रडण्याशिवाय दुसरं काय करणार ?

**हर०:**—पण दाउदखानाला बोलावून काय साधायचं होतं तें अजून सांगितलंच नाहींत !

**राणी०:**—( रागानें ) दुसरं काय साधायचं ? एक तर अमात्य माधवाचार्यांचं पारडं आपल्यालाहि डोईजड झालं आहे—

**हर०:**—तें परतवायचं असंच ना ?

**माध०:**—राणीसाहेब, म्हाताऱ्या माणसांना जर खरोखरच कांहीं शहाणपण असेल तर त्यांनीं प्रथम हें ओळखलं पाहिजे कीं, आपण अमर नाहीं, येवढंच काय पण तरुण माणसांच्या आधीं आपण मरणार ! हें मी तरी ओळखतों; आणि महाराजहि बहुधा ओळखतातच. आणि म्हणूनच मीं संन्यास घेऊन जाणार हें आपणाला माझ्या पायांनीं चालत येऊन पूर्वीं सांगितलंहि. पण आपला माझ्या शब्दावर विश्वास बसला नाहीं त्याला मीं काय करूं ? महाराजहि आतां पिकलेलं पान झाले आहेत ! आपली अधिकाराची हौस पुरायला आपणाला माझ्याकडून तर नाहींच पण महाराजांकडूनहि फारसा विलंब होणार नाहीं.

**हर०:**—माझ्याच मनचे शब्द; पण अमात्यराज, तुम्ही ब्रह्मचारी म्हणून तुमच्या तोंडून ते निर्भीडपणानं निघतात. मीं वृद्धपणीं तरुणासारखा विषयलंपट राहिल्यानं माझी जीभ माझ्या मनावर दडपण घालते. ( सुस्कारा टाकून ) असो; बरं, दाउदखानाची मदत घेण्याचा दुसरा हेतु कोणता ?

**राणी०:**—बाळ कृष्णदेवरायाला युवराजपद द्यायचं ! यांत मी

काय स्वार्थ साधणार होतें ! आपणाला पुष्कळ वेळ म्हणून पाहिलं पण अमात्यराजांच्या भिडेमुळं आपला निश्चय होईना. त्यांचा ओढा राजद्रोही वीरविजयाकडं ! [ शिपाई वीरविजयाला आंत आणतात.]

माध०:—राजद्रोही खरोखर कोण तें आतां आपोआपच कळेल. हा पहा वीरविजयच आला. महाराजांना त्याला खलित्याविषयीं काय विचारायचं आहे तें विचारावं.

हर०:—वीरविजया, या खलित्यासंबंधानं तुला काय माहीत आहे सांग.

वीर०:—महाराज, खलिता दाउतखानाकडं पाठविण्याचा आहे असं मला समजतांच मीं तो हनुमानाच्या हातून पकडून भीमसिंगाच्या हातीं दिला. अमात्यराजांच्या जिवावर मी उठलों होतों, हें मी कबूल करितों. आणि त्या काम्मांत मीं रुद्रदामाला मदत करणार होतों. पण शत्रूला विजयनगरीवर बोलावण्याच्या यांच्या राजद्रोहाच्या कटाची मला मुळींच बातमी नव्हती.

हर०:—काय, वीरविजया, तूं अमात्यराजांचा खून करण्याला प्रवृत्त झाला होतास ?

वीर०:—होय, महाराज, मला तुरुंगवास प्राप्त झाला तो अमात्यराजांच्यामुळं, असा मला भ्रम झाला होता.

हर०:—वः उलट अमात्यराज तर मीं तुला तुरुंगांत टाकल्याबद्दल माझ्याशीं किती तरी भांडले, आणि शेवटीं स्वतःचा हुकूम चालवून माझ्या इच्छेविरुद्ध त्यांनींच तर तुझी सुटका केली !

वीर०:—हें सर्व खरं आहे, महाराज, पण रुद्रदामानं याच्या उलट प्रकार माझ्या मनांत भरवून दिला, आणि मीं मूर्खानं त्याच्यावर विश्वास ठेवला !

माध०:—काय, महाराज, वीरविजयाबद्दल आपल्या मनाची आतां खात्री झाली ? महाराजांनीं आजवर त्याच्यावर विनाकारण राग धरला.

हर०:—होय, पण खरा राजद्रोही कोण आणि राजभक्त कोण याचा निर्णय आतां एका क्षणांत झाला ! सेनापति, वीरविजयाला बंधमुक्त करा आणि रुद्रदामाला कैद करा. [हंसेश्वरी, मीनाक्षी घाईघाईनें प्रवेश करितात.]

हंसे०:—( हरदेवरायाचे पाय धरून ) महाराज, आपली गांठ पडावी म्हणून मी किती प्रयत्न केला. पण—

हर०:—तुला प्रतिबंध कुणी केला ?

हंसे०:—आपल्या नवीन अमात्यांनीं.

हर०:—कोण नवीन अमात्य ? ( तिरस्कारानें ) रुद्रदाम वाटतं ?

हंसे०:—महाराज, या पोरक्या पोरीचा संभाळ आपण जन्मापासून केला,तिचा छळ अशा अधमांच्या हातून झालेला आपणांला कसा पाहवतो ?

हर०:—वः अमात्यगिरी हातीं येण्याच्या आधींच प्रजेच्या छळाला सुरुवात ! ती तरी माझीच चूक. पण असो; रुद्रदामाच्या अमात्यगिरीचा प्रारंभ होण्यापूर्वींच तिचा शेवट झाला. मीं मूर्खपणाच्या डोहांत पुरा बुडण्यापूर्वी ईश्वरानं मला वाचविलं. त्याचे माझ्यावर अनंत उपकार आहेत.

माध०:—बाळे हंसेश्वरी, ये, पहा, खऱ्या राजकृपेच्या एका किरणानं प्रजेवरच्या संकटाचं सारं अभ्रपटल क्षणांत वितळून जातं तें असं. (ती जवळ जाते) ( मीनाक्षीकडे पाहून ) मीनाक्षी, हनुमानाला तुझा तात्पुरता भाऊ म्हटल्यानं तें कपटी नातं तुझ्या आड यायचं नाहीं तूं काळजी करूं नको. ये, हनुमानावर तुझं प्रेम आहे हें मला माहीत होतं. हा घे तुझा प्रियकर मी तुझ्या स्वाधीन करतों. जखमेंतून रक्तस्राव झाल्यामुळं तो बेशुद्ध झाला आहे, पण तूं त्याला आपल्या घरीं नेऊन त्याची शुश्रूषा कर म्हणजे लवकरच बरा होईल. महाराज तुला आणि त्याला जन्माचीं सुखीं करतील ! जा, न्यारे याला.

[ शिपाई जखमी हनुमानाला घेऊन जातात. मीनाक्षी सर्वांस नमस्कार करून त्याजबरोबर जाते. ]

राणी:—( आश्चर्यानें ) काय, ही मीनाक्षीसुद्धां यांच्या कटांत सामील होती कीं काय ? ही तर माझ्या विश्वासांतली असं मी समजत होतें !

माध०:—राणीसाहेब, पहा आवेशांत तुम्हीं काय बोलून गेलां तें ! कट आमचा कसला ? कट आपण करीत होतां. तो आम्हांला असा मोडून काढावा लागला इतकंच. राजकारणाचा डाव मी आजवर पुष्कळांशीं खेळलों. पण स्त्रीशीं हा डाव खेळण्याचा हा पहिलाच प्रसंग !

आपल्या कटाची कळेल ती बातमी आणून ही मीनाक्षी मला देत होती. राणी-साहेब, आपण सिंहासनावर बसलेल्या, आणि ही मीनाक्षी पिढीजाद कळा-वंतीण ! पण खरं राजकारणाचं ज्ञान आणि खरी राजभक्ति आपल्यापेक्षां तिनंच अधिक दाखविली यांत शंका नाहीं !

हर:०—अमात्यराज, तिला दोष कां देतां ? ( कपाळावर हात मारून घेऊन ) मीं स्वत: राजा असतां राज्याचं खरं कल्याण जर असं पाहिलं तर ती तर काय बोलून चालून हलक्या परघराण्यांतून राजघरा-ण्यांत आलेली !

राणी:—अस्सं कां ? बरं. ( हातपाय आपटीत रडत निघून जाते ).

हर०:—( कपाळावर हात मारुन ) हाय हाय, अमात्यराज मला क्षमा करा. मी तुमचा सर्वस्वी अपराधी आहें. माझं स्वत:चं शहाणपण आणि तुमचा उपदेश हीं दोन्हीं व्यर्थ गेलीं.

माध०:—महाराज, हें असं भलतंच आपण काय बोलतां ? क्षमा आपणच करायची, आणि आपण या वीरविजयाला क्षमा केली म्हणजे सर्व कांहीं त्यांत आलं. मीं अनधिकारानं वीरविजयाची तुरुंगांतून सुटका केली त्याचं कारण हेंच कीं युवराजपदावर स्थापायला तोच योग्य. शत्रू-पासून विजयनगरचं संरक्षण करण्याला तोच समर्थ आहे. रुद्रदामानं द्रोह केला आणि नगरावर परचक्र आणण्याचा कट केला तो सद्‌गुरुकृपेनं उघडकीस आला. आतां यापुढं तरी महाराज कधीं अपात्रीं विश्वासदान करणार नाहींत अशी माझी खात्री आहे. आतां मी सुखानं संन्यास घेणार. पण चुकलों, त्या पूर्वीं एक गोष्ट मला अजून करायची आहे. ( हंसेश्वरीचा हात आपल्या हातांत घेऊन ) हा वीरविजय आणि ही हंसेश्वरी, दोघांचं परस्परांवर प्रेम आहे. त्यांचा गांधर्व विवाह मीं पूर्वींच लावून दिला आहे. तरी पण माझ्याप्रमाणं ती महाराजांचीहि धर्मकन्या असल्यामुळं महाराजांनींहि या उभयतांना आशीर्वाद दिला पाहिजे.

[ उभयतांचे हात एकमेकांच्या हातीं देतो ]

हर०:—( सिंहासनावरून उतरून ) वीरविजया, दुर्दैवानं मन दूषित होऊन मी तुझा छळ केला याची तूं मला क्षमा कर. माझ्या वाडवडिलांचं

रक्त तुझ्या अंगांत खेळत आहे त्याला योग्य असंच तुझं शौर्य आणि तुझी राजनिष्ठा आहे. ये आणि माझ्या या धर्मकन्येसह मीं मोकळ्या केलेल्या सिंहासनावर बैस. हंसेश्वरीबरोबर विजयनगरीहि मी तुझ्या स्वाधीन करतों.

[ वीरविजयाला व हंसेश्वरीला सिंहासनावर बसवितो ].

**सेना०:**—( तरवारीनें मुजरा करून ) युवराजांना माझा प्रणाम असो !

**माध०:**—महाराज, सेनापति, वीरविजय, हंसेश्वरी आतां मला सर्वजण मिळून संन्यास घेण्याला परवानगी द्या म्हणजे मी धन्य होईन.

[ पडद्यांत कर्णे, शंख, टाळ वगैरे वाजूं लागतात ].

**हर०:**—सेनापति, हा आवाज कसला ?

**सेना०:**—( तरवार सरसावून ) मी पाहून येतों काय प्रकार आहे तो.

[ जातो ].

**माध०:**—( स्वगत ) काय श्रीजगद्गुरूंनीं माझी आठवण याच वेळेस केली ?

**हर०:**—जारे या रुद्रदामाला माझ्यापुढून घेऊन जा. आणि त्याला हत्तीच्या पायीं देऊन मारा.

**माध०:**—नको, महाराज, त्याला मारून तरी काय करायचं ? मी संन्यासोन्मुख झालों असतां हत्येला अनुमोदन कसं देऊं ? महाराज, रुद्रदाम हें काय घुंगुरटं आहे ! महाराज आणि राणीसाहेब यांची त्याच्यावर अर्वाचित् कृपादृष्टी पडल्यामुळं तें फुगून जाऊन पीडा करीत होतं झालं. ती कृपा संपली, आतां त्याच्या हातून काय होणार ? फार तर त्याला अनागुंदीच्या तुरुंगांत नेऊन ठेवा म्हणजे झालं !

[ सेनापति प्रवेश करितो ].

**सेना०:**—महामठ श्रीशृंगेरी येथून जगद्गुरूंचे सर्वाधिकारी पालखी घेऊन आले आहेत.

[ मिलिंदाचार्य प्रवेश करितो; त्याजबरोबर पालखीसरंजाम शिष्यवर्ग वगैरे येतात ].

**मिलिं०:**—( हरदेवराय व माधवाचार्य यांस नमस्कार करून श्रीचें आज्ञापत्र हरदेवरायाच्या हातीं टाकतो ).



हर०:—( पत्र वाचून )अमात्यराजांचं केवढं हें भाग्य ?     [ पृ० ११२

हर०:—( पत्र वाचून ) अमात्यराजांचं केवढं हें भाग्य !

[ माधवाचार्यांच्या हातीं आज्ञापत्र देतो ].

माध०:—( वाचून हंसून ) मला पालखी! अमात्यपद सोडून संन्यास घेण्याला निघालों तरी माझ्या अहंकाराची विटंबनाच व्हावी ना ?

मिलिं०:—छे: महाराज, ही अहंकाराची विटंबना नव्हे तर हा केवळ विद्येचा बहुमान आहे.

माध०:—विद्येचा बहुमान असेल तर तो विद्येलाच मिळो. मिलिंदाचार्य, मी आजवर श्रीशारदाप्रसादामुळं जे बरे वाईट चार ग्रंथ केले आहेत त्यांनां जगद्गुरूंच्या पादुकांच्या पायाशीं या पालखींत घालून नेण्याची आणि जगद्गुरूंच्या पायांवर अर्पण करण्याची मला परवानगी असावी.

शाम०:—( पुढं होऊन ) संन्यास घेऊन जातांना बरोबर नेण्याकरितां, गुरुमहाराजांनीं सांगितल्याप्रमाणं, गुरुमहाराजांच्या ग्रंथांचं दप्तर बांधून मीं हें आणलं आहे.

माध०:—शामभट ठेव तें दप्तर त्या पादुकांच्या पुढं. ( हरदेवरायास ) महाराज आतां मी येतों मला अनुज्ञा मिळावी.

हर०:—( डोळ्यांना पाणी आणून ) अमात्यराज, याचं नांव खरं ब्राह्मण्य. सरस्वतीनं आपले नेत्र उघडले म्हणजे लक्ष्मीचं तेज फिक्कंच पडणार ! जन्मभर विद्यासाधन आणि परोपकार या वांचून ज्यांनीं कांहींच केलं नाहीं ते स्वयंभू जगद्गुरुच आहेत. त्यांनां जगद्गुरूंच्या गादीवर तरी बसायला कशाला हवं ? असो, अमात्यराज—नाहीं चुकलों—कैवल्यमूर्ति परमहंस यतिराज, माझा हा शेवटचा प्रणाम स्वीकारावा.

हंसे०:—( सिंहासनावरून उतरून धांवत जाऊन माधवाचार्यांच्या गळ्याला मिठी मारून स्फुंदून ) बाबा, आतां मी बाबा कुणाला म्हणूं ? संन्यास घेऊन तुम्ही माझा त्याग करणार हें भविष्य खरं झालंच ना !

**माध०:**—( तिला कुरवाळून ) बाळे, पण तुझ्या प्रेमाचा विषय तुला मिळवून दिल्याशिवाय मी संन्यास घेणार नाहीं ही माझीहि प्रतिज्ञा पुरी झालीना ? जा. वीरविजयावर प्रेम कर आणि विजयनगरीच्या कल्याणाविषयीं निरंतर दक्ष रहा ! मी येतों आतां. नारायण, नारायण ! शिवः केवलोहं, शिवः केवलोहं, शिवः केवलोहं !

[ पडदा पडतो ].

समाप्त.